स्त्रीगीतरत्नाकर

अथवा

आबालवृद्ध स्त्रियांनीं म्हणण्यास व ऐकण्यास योग्य अशीं देवादिकांचीं वगैरे गाणीं.

भाग २ रा.

हें पुस्तक

पार्वतीबाई गोखले यांनीं

स्टेट ग्वाल्हेर येथें 'सेन्ट्रल जेल प्रिंटिंग प्रेस'.मध्यें व पुणें येथें गंगाधर गोविंद गोंधळेकर यांचे "भारतभूषण" छा. छा. प्रसिद्ध केलें.

सन १९०९

किंमत १२ आणे.

प्रस्तावना.

पहिल्या भागाच्या प्रती थोडक्याच दिवसांत संप-ल्यामुळें दुसरा भाग काढण्याची उमेद आली. पहिल्या भागाप्रमाणें ह्या भागांतही गोड चालींचीं व सुबोध अर्थाचीं अशीं देवादिकांचीं सुरेख गाणीं आहेत. हीं गाणीं जुन्याकाळच्या बायकांकडून परिश्रमानें मिळविलीं आहेत; व सर्वांस संग्रहीं ठेवितां यावीं, म्हणून छापिलीं आहेत. साधल्यास तिसरा भागही काढण्याचा विचार आहे.

प्रकाशक.

‘ स्त्रीगीतरत्नाकार ’ भाग १ ला व भाग २ रा व अमृताष्टक हीं पुस्तकें रा. रा. र. चिं. सोहनी घर नं. ७८७ सदाशिव पेठ पुणें यांजकडे मिळतील.

अनुक्रमणिका.

* ही फुली ज्या गाण्यांवर आहे तीं गाणीं फेरावर देखील म्हणतां येतात.

'स्त्रीगीतरत्नाकार' भाग १ ला. व भाग २ रा. व अमृताष्टक हीं पुस्तकें रा. रा. र. चिं. सोहनी घ. नं. ७८७ सदाशिव पेठ पुणें यांजकडे मिळतील.

अनुक्रमणिका.

* ही फुली ज्या गाण्यांवर आहे तीं गाणीं फेरावर देखील ह्मणतां येतात.

गाणीं कृष्णाचीं.

गाणी शांकराची:—

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥



गाणें १ लें गणपती.

चाल (नाम देव कीर्तनांत गोश)

त्रिभुवनसुन्दर तो रुपराशी, मम शिशु तो झाला. आगम निगम ज्या गाता थकले, नकळे विभुलीला ॥ अ० क० ॥ घडी घडी उतरा लोण सख्यानों, अनुपम या बाळा ॥ रक्षालावा सत्वर भाळा, कालांच्या काळा ॥ १ ॥ बहुविध येती विघ्नें ज्यावरि, पंचाक्षरि आणा ॥ दिसेनाचि मज उपर याहुनी, मांत्रिक बहुशहाणा ॥ घडि घडि० ॥ २ ॥ घेउनि अंकीं, श्रीहेरंबा कुरवाळी अंबा ॥ म्हणे जानकी क्रीडाकौतुकें तोषवि विभुसांबा ॥ घडि० ॥ ३ ॥

॥ श्रीरामचंद्रायनमः ॥



गाणें २ रें (रामाचें ध्यान)

चाल (आरती भुवन० २ चरण पुढें कटावाची.)

जय जय राम भद्र भगवन्, त्रिभुवन सार्वभौम भूमन ॥ विमलागण्यपुण्यमहिमन्, सत्तारकब्रह्म नामन् ॥ अतसीकुसुमश्याममनोहर, मन्मथसुन्दर, पंकेरुह नवपलाशपेशल, पादयुगल नखरत्नचंद्रिका ॥ धवलित दिक्चक्रवाल मंजुळ, सिंजन्नूपुर पीतवसन, परिलसत्किंकिणी, मणिगणपारिणत किरणचित्रदामन्

॥ त्रिभुवन० ॥ १ ॥ जय जय पाप ताप वारिन्, रत्न विशाल मालधारिन् ॥ मुनिहृद पद्म संचारिन्, दुर्जन सर्प दर्पहारिन् ॥ नलिननाभ रोमालि मलिनवल्ली, नम्रजठर हरिमणिप्रथस्तन ॥ बृहतकपाट विशंकट वक्षःपीठपिवरस्कंध, नंदन द्रुमोत्थसुमनोहार विराजित मलयजचर्चित, वलयविभूषित, बाहुयुगल परी, ललितकलितशर, जरठकमठवर, पृष्टघोरधुन्वन् ॥ त्रि० ॥ २ ॥ जय जय भक्तजनत्रातः ॥ निर्मल तर ज्ञानदातः ॥ स्वामिन् सर्वलोकधातः ॥ भावुक बाल वंद्य मातः ॥ कंबुप्रतिभटकंधर सुन्दरतनु हनुमंडल, चारुचुबुक, बिंबाधर. मंदस्मितविकसितशशि लांछन शकलकपोल सुनासिककुंदकुड्मलाग्र रदन्, सरसिजप्रसन्नलोचन, मणिमयकुंडल मृगमद. तिलकित विशालभाल कुटिलतरकुंतल, मणिगणखचित स्वर्णकिरीट, स्थूलमौक्तिकावतंसविलसित, सकलसौख्य धामन् ॥ त्रिभुवन० ॥ ३ ॥ जय जय पूर्णकृपासिंधो ॥ भव दाव तप्त दीन बंधो ॥ सज्जन चक्रपद्मबंधो ॥ मूर्तप्रणवनादबिंदो ॥ त्रिजगन्मंगल अनंगजनितर मंगल नाशन् जगद्वंद्य जगदाद्य निखिलवेदांतवेद्य अनवद्यरूप सद्भक्तिनम्रतनु, सुरासुरव्रजकिरीटसन्मणी मरिचीनीराजितपदनीराज, नित्य निरंजन

निर्गुण निष्क्रिय निष्प्रपंच निर्वासन निर्भय निर्विकल्प निर्माय निरामय निश्चल निर्मल शुद्ध बुद्ध परीपूर्ण परात्पर जयदाशरथे सीतावल्लभ जयनारायण रावण-मर्दन जय सर्वोत्तम रामरघूत्तम अनंतशंतम पंत विठ्ठलत्राणवज्रवर्मन् ॥ त्रिभुवन० ॥ ४ ॥

गाणें ३ रें (राम)

चाल (अमोल काया जाइल वाया०)

पुष्प समय मधुमास पुण्यतम शुक्लपक्ष तिथि ते नवमीं ॥ रवि मंगळ गुरु शुक्र शनैश्चर ग्रह होते हे उच्च तमीं ॥ कर्कलग्न नक्षत्र पुनर्वसु मेष राशि गत खररश्मी ॥ उदगामी जीवेन्दु मध्यदिन असतांना संकुल कुसमीं ॥ हृत्पद्मीं दृढ योगें युगमुनि चिंतिताति ज्या यम नियमीं ॥ चिन्मय निष्कल एक शुद्ध इति विविध गाइला जो निगमीं ॥ भक्त काम कल्पद्रुम तो प्रभु करुणारसें पूर्ण द्रवला ॥ अ० क० ॥ श्रीमदयोध्या नगरीं दशरथ राज गृहीं हरि अवतरला ॥ १ ॥ सांद्र पयोधर श्याममनोहररूप जया मन्मथलाजे ॥ हिरे-जडित शिरपेंच तुरा वरि शिरीं किरीट बरवा साजे ॥ भाळीं तिलक कविजना न वदवें कुटिलालक कुंतल शोभाजे ॥ मकराकृति कुंडलें श्रवणयुगीं सुप्रसन्न लोचन बलजे ॥ इंदुवदन नवकुंदरदन शुचि मंदहास अधरीं

भ्राजे ॥ ग्रामत्रयमधुरिमार्यकंठीं जडलाजणु रेखा-
व्याजें ॥ मौक्तिकहार उदारसुशोभित मध्यें कौस्तुभ-
मणि रूळला ॥ श्रीमदयोध्या० ॥ २ ॥ कटि तटि
उद्दाम पीतपट मंजुकिंकिणी गजबजती ॥ जानुजंघ
सुकुमार गुल्फयुग वलयनुपुरें रुणझुणती ॥ सहज
मृदु आरक्त पदतल ध्वजादिचिन्हें विराजती ॥
रम्यमनोहर सरळ अंगुली पूर्णचंद्रसी नख कांति ॥
त्रिभुवनकलुशक्षपणानिपुणतर मंदाकिनि झुळझुळ श्रव-
ती ॥ पादयुगुल यत्क्षणीक चिंतनें कर्मबन्ध सहसा
तुटती ॥ दिव्य रूप पाहतां जननींच्या प्रेमपूर हृद-
यीं भरला ॥ श्रीमदयो० ॥ ३ ॥ प्रसन्न दिक चक्रवाल
सुंदर मंद गन्ध वह समुवहती ॥ स्वयें हुताशन आय-
तनातः प्रदक्षणार्चिः प्रज्वलती ॥ शृंगारुनी गृह रत्नें-
तोरणें नागरिक ध्वज उभारिती ॥ द्वार पारिसरी
कुंभ दासिका शांति कुंभजल निषिंचती ॥ उजळुनि
दीपज्योती कारुजन नीरांजन विधि आचरती ॥ वार-
बधू सालंकृति नाचति मुंजुल हरिहर गुण गाती ॥
तननं तननं धिगिनि धिगेति धिक् थय्य थय्य रव
धुंबरला ॥ श्री मदयो ० ॥ ४ ॥

गाणें ४ थें (राम)

रामजन्म रामनवमी नक्षत्र पुनर्वसु ॥ समय

माध्यान्ह दिवा अवतार जाहला ॥ अ० क० ॥ राम दर्शनास चला, लाभ जाहला ॥ रा० ॥ १ ॥ दशरथास दाशरथी पुत्र जन्मला ॥ त्रिभुवनांत जयजयकार जाहला ॥ रा० ॥ २ ॥ भजकाचे कोटि अन्याय हा क्षमाकरी ॥ उद्धारिता महाराज नाहि भागला ॥ रा० ॥ ३ ॥ शबरि कबरि बदरि फले पदरि घेउनी ॥ भावबळें भुक्षेनियां भक्षुलागला ॥ रा० ॥ ४ ॥ महाविष त्र्यंबकासि अमृत लाधला ॥ पार्वतीस थोर आनंद जाहला ॥ रा० ॥ ५ ॥

गाणें ५ वें (राम)

चाल (दावि विश्वरूपतुझें)

घेतलास अवतार कौसल्येच्या उदरीं ॥ उजवे बाजू लक्षुमण डावेबाजुं सिता नारी ॥ बैसलासे सिंव्हासनी कायंतुझीमहिभा ॥ अ० क० ॥ दाखविसि दिव्यपाय दयानिधे रामा ॥ १ ॥ तुजवाचुन इतरांतें शरण कुणां जावूं ॥ काया वाचामनें करुनि चरण तुझे पाहूं ॥ व्यर्थ कारे बुडविसी संसारी आंम्हा ॥ दाख० ॥ २ ॥ वसंत ऋतु चैत्रमास गुडया उभारिती ॥ जन्मलाशि नवमिसी नांव सितापती ॥ मारुती समोर उभा दास कमलनयना ॥ दाख० ॥ ३ ॥ पाहतांचि पाय तुझे मन माझें धालें ॥ एकतांच

श्रवणिं किर्तन कर्ण निवाले ॥ धांव पाव भक्तांसी पूर्ण सनातना ॥ दास० ॥ ४ ॥ पाहतांच मूर्त तुझी केली मीं स्तुती ॥ ऐकतांच श्रवण किर्तन देइ मज सुमती ॥ हात जोडुनि कवन करी नांव तिचें यमुना ॥ दास० ॥ ५ ॥

गाणें ६ वें (राम)

सुखरुप खेळत होते निज भुवनीं सारिंगपाट अवचित उभरले नाचुके कर्म अचाट ॥ ऐशीं मीं रामा धीट चरणी पडली तूट ॥ कोण संकट पोटीं राघवा ॥ अ० क०॥ कोदंडधारी रामा कां माझी सांडकेली ॥ आयोध्या वासी राघवा. ॥ १ ॥ वनवासीं नाहीं रामा सेवाचि तुझी मी केली ॥ तुझें हें स्वरूप पाहतां मनीं प्रीति नाहीं झाली ॥ को० ॥ २ ॥ तेव्हांतें स्मरण नाहीं अहोणा लक्षुमण दीरा ॥ माझी कां करुणा नाहीं तुम्हांला रघुवीरा ॥ को० ॥ ३ ॥ कोदंड घेउनी हातीं राम लागे मृगा पाठीं ॥ कैसा तो रावण आला हावेष धरुनी कपटी ॥ त्यालागी आशय देतां मजनेली उठा उठीं ॥ को० ॥ ४ ॥

गाणें ७ वें (राम)

चाल (जो चिदानंद आनंद कंद त्यानंद)

सुंदर शरिर सुकुमार, तुला जटाभार कसा सोसेल ॥ एकांति स्वरूप विटेल ॥ कोमल तनु साजिरी, चरण गोजिरे पादकमला ॥ चालशी कसा घन-नीळा ॥ चा० ॥ वनवास कठिण राजसा ॥ राज० ॥ नंकोजाउं हृदयनिवासा ॥ निवा० ॥ दोन्हि कर कमल जोडितें तुला मी स्तुते रामराया ॥ अ० क०॥ कोमल तुझि काया ॥ कौसल्या विनवी रघुराया, लागतें पाया रामराया ॥ को० ॥ १ ॥ श्रीरामा तुम्हाविण आम्हा, कोण विश्रामा येइल कामां ॥ सखया तू मेघश्यामा ॥ तुझें स्मरण मला घडोघडी, होतसे तातडी हृदय आत्मा, जगजीवन तूं परमात्मा ॥ चा० ॥ असे म्हणुन बसविते धरून ॥ अहोघन० ॥ श्रीरामावीण मनि झुरून ॥ अहोझु० ॥ श्रीराम म्हणे हो ताता, येतों मी आतां माते श्रीया ॥ कोम०॥ २ ॥ दोन्हिकर कमळ जोडुन, चरण भिडून, उभा राहे ॥ तव नेत्रीं अश्रू वाहे ॥ घेउनि सिता सुंदर, लक्षुमण वीर, संगे आहे ॥ मातेसि विनवीता हे ॥ चा० ॥ श्रीराम म्हणे मातेसि ॥ हो मा० ॥ समजावि परोपरी तिसी ॥ होऊी० ॥ हें कार्य आहे देवासी आज्ञा द्यावि हो आम्हां जाया ॥ कोम० ॥ ॥३॥ राम लक्षुमण तैय्यार, रथावर स्वार होउनीया॥ तव शरणांगत जन पाया ॥ राम सिता लक्षुमण तीघे

वनासी निघे, तया समया ॥ पातले त्वरित भेटाया ॥ चा० ॥ जनकरिती पंचारती ॥ हो आ० ॥ रथि बैमुनया सारथी ॥ हो सा० ॥ कबिराम मनाचा छंद राघवा प्रबंध गाउनिया ॥ कोमल० ॥ ४ ॥

गाणें ८ वें (राम)

ज्याचापाय पडतादगड, दिव्यकाय झाला ॥ या नूकाय स्वसुखदायक रघुराजयाला ॥ अ० क० ॥ प्रियधाम बहुत काम तुजसी राम फुकाचा ॥ कारे नाठविसी तूं हा उपदेश मुखाचा ॥ प्री० ॥ १ ॥ ऋषिसंग धरुनिरंग धनु भंगकरोनीं ॥ अयोध्येस ये रमेश जनजेसिवरोनी ॥ प्री० ॥ २ ॥ गेल्या वक्र होंचि तक्र नमिळे नक्र दिल्यानें ॥ हरीस आवडे भक्त बहु आसक्त मनानें ॥ प्री० ॥ ३ ॥ तरले भाउक किति दावूं चरित कांहो कळेना ॥ अमुन ठाउक तुज ह्या उपाय कां हो जडेना ॥ प्री० ॥ ४ ॥ एक गोडनाम जोड सकल सोड मदासी ॥ राजा रामि लीन प्रासादिकपदासी ॥ प्री० ॥ ५ ॥

गाणें ९ वें (राम)

चाल (हेरे काय कृष्णा लंपट झाले)

दैत्य मातले भूमिझाला भार ॥ देवा संकट पडलें

सर्व थोर ॥ स्तवन करिती तुझे रघुवीर ॥ घेइ आवतार उतरी भूमिभार ॥ अ० क० ॥ पयोधर रामा वीनंति माझी ॥ दुष्ट स्तारिते शेषासहित तुझी ॥ १ ॥ कौसल्येचेकुशि' आवतार झाला ॥ शेषासहित राम ऋषि गृहा गेला ॥ यज्ञ रक्षुनियां वधिलि त्राटिकेला ॥ श्राप भंगुनिया प्रणिलि जानकीला ॥ पयो० ॥ २ ॥ जनकाचे नगरीं आनंद झाला ॥ मूळ पाठविलें त्यानीं आयोध्यला ॥ जानकि माळ घाली राघवाला ॥ पयो० ॥ ३ ॥

गाणें १० वें राम.

चाल (श्रीपाद श्री वल्लभ.) यासती अध्यायाचे चालीवर.

सर्वगुणसंपन्न निपुण श्रीराम विद्येमध्यें ॥ करुन विशिष्टें प्रविण कळेना सत्वाच्या उदरें ॥ तेहतीस कोटी देव बंधि लंकें मध्यें होते आधीं ॥ राम येउनि या स्थळासि आमुचि सुटका व्हावि कधीं ॥ विकल्पाशीं शिकवुन धाडि मग अयोध्येशि तो विधी ॥ चा० ॥ प्रवेश होइना अयोध्येंत करी विकल्प नाना कळा ॥ हिवरतरुवर जाउन बैसले पुष्प वाटिके स्थळा ॥

हृदयीं करी संचार मंथरा पाहुनी ती कुबळा ॥ चा० ॥ री ॥ येउन देह टाकी कैकइच्या आंगणीं ॥ वक्षस्थळघेइ बडऊन जिवा करी हानी ॥ आवदसा आलि तुजला कैकइ चांडाळिणी ॥ चा० २ री ॥ धाडुन भरत शत्रुघ्न बंधु गृहासि स्थापितिल सिंव्हासनि रघुनंदन ॥ कसे हित कळेना तुझ्या जिवाचि मी दासी ॥ दोह लेकरासी करिशिल दृढबंधन ॥ चा० २ री ॥ दासिची असि वचनें ऐकुनि हृदयीं धरिली ॥ काढुन सर्व श्रृंगार विकल्परुपें भरली ॥ शुक्रापरि पुसे कांता मंथरा कुठे गेली ॥ संकेतात दावि संतप्त होउन निजली ॥ नको विघ्न आणू आतां मर्म वृत्ती घाबरली ॥ दशरथ पदर पसरी पुसे माती मुखावरली ॥ चा० १ ली ॥ चरण धरी घडो घाडि नको जाऊ कीर्ती दाखवू जनीं ॥ राज्यासनीं वैसतो राम पहा दृष्टिभरे येउनी ॥ अ० कु० ॥ आक्रांतझाला थोर निघुन श्रीराम जाता वनीं ॥ धांय मोकलुन रडे मुखीं धुळ कौसल्या घालुनीं ॥ १ ॥ युद्ध समयीं जो दिला वरतो आठवुन प्राणेश्वरा ॥ क्रिया भ्रष्ट होउनका आज तुम्हि सत्य करावा खरा ॥ मन संख्या पर्यंत राम वनवासि पाठवा बरा ॥ भरत बसो सिंव्हासनि माझा मज आवडतो हिरा ॥ वृथा डाग लाविता सूर्यवंशासी अजकुमरा ॥ राज्य

गुंछ मानून मलाचा मागितल्या दोंवरा ॥ वृत्तांत झाला रात्रि एवढयां कैकइ सदना प्रती ॥ शिघ्र करुन सामुग्री पातले सुमंत सत्वर गती ॥ बद्ध पाणि जोडून विनंती करिति नानाप्रती ॥ येउन ऋषेश्वर बसले सभामंडपीं छत्र देशि चे भूप आचांतर तपी ॥ कां स्वामि चिंतातुर कोमलरुपीं ॥ चा० १ ली ॥ कैकइ ह्मणे सुमंताप्रती आणि रामा ॥ सांगेन तयाला युद्ध कालिचि वार्ता ॥ दशरथ करि स्फुंदन रुदन निजधामा ॥ पाचारि येथवर सिताहरण जो करितां ॥ चा० २ री ॥ स्वानंद सौख्य सदनीं पाहिला राम डोळा ॥ घालुनि मिठी कंठीं वांदिले चरण कमला ॥ एकांत तुह्मा जनानि बोलाविले हेचिवेळां ॥ ह्मणे राम पितृआज्ञा पुरविन सकल सोहळा ॥ चा० १ ली ॥ नमुन कैकइस राम सुमित्रासूत संवे घेउनी ॥ समाधान वाटले तयाला कौसल्या पाहुनी ॥ आक्रांत ॥ २ ॥ दैत्य वधा कारणें धरुनिया पाशांकुश गणपती ॥ संवें षडानन घेउन आले वंदुनियां पार्वती ॥ तसें नमस्कारुनि राम लक्ष्मण माते प्रती ॥ शनि मला टाकोनि नको जाउं प्राण त्यागीन निश्चिती ॥ राहा पुष्पवाटिकेंत चतुरदशवर्ष रघुपती ॥ जन्म घेउन जननिच्या पोटि अपकीर्ती करुनयें अशी ॥ सत्य करिन वचनांत नको अडथळा

घालु मशी ॥ ह्मणे सुमित्रा संगे लक्षुमण, न्यावा अपु-
ल्या पाशीं ॥ चा० १ ली ॥ कारि समाधान उर्मिळेचें
सुमित्र पुत्र ॥ सांगोन गुज कुरवाळी हाती मुखचंद्र ॥
कौसल्या आंगटाकी धरणिवर पवित्र ॥ पहा पहा उल्लंघुन
मागे गुणसमुद्र ॥ चा० २ री ॥ मंडित मुगुट
बरवा घालोनि जटा वेष्टीं ॥ अनवाणि सुकुमारा ला-
विसि भस्म कंठीं ॥ राक्षस तुला छळती रक्षिल कोण
पाठीं ॥ हाय हाय ह्मणुन जननी लल्लाट भूमिपिटि ॥
आणुन मंत्रदोरे बाहेसि बांधि दृष्टी ॥ प्रार्थिते पंचभूतां
रक्षा हो राम सृष्टीं ॥ चा० १ ली ॥ शोक पाहुनि झाली
ध्वनिवर थोर आकाशातुनी ॥ भयनाहिं कल्पांति
तयाला निर्बंध असावें मनीं ॥ आक्रांत० ॥ २ ॥

गाणें ११ वें (राम.)

चाल (राधिका पुन्हे सुंदरी ॥ सावळया सरुपा तूं)
ज्यास्थानि गौतमें पाप ताप संहारी ॥ अति निर्मळ
जीचे वारी ॥ जी मधे सुवासिक पुष्प कमलिनी भारी
॥ आली कुळें बहुत झंकारी ॥ तट विचे बहुत ते
रम्य वृक्ष शेजारी ॥ वनि पसरे छाया सारी ॥
॥ चा० ॥ किति मयुर कोकिळी रावे हो कि० ॥

फळ ध्वंस सारिखे राहे.हो रा० ॥ असे पक्षी किती सांगावे पवर्ध मृदुवाहे ॥ अ० क० ॥ जानकी सहित तो सहे ॥ १ ॥ श्रीरामसुजन विश्राम पंचवटी पाहे ॥ ज० ॥ बांधिता पर्णगृह दिव्य लक्ष्मण रानीं ॥ राघवा तोष बहु मनीं ॥ देउनि आलिंगन भार तयाचे मनीं ॥ हर लागे ज्याचे ध्यानीं ॥ म्हणे जाइ लक्ष्मण त्वरित कंद फल आणी ॥ पावलि जानकि ग्लानी ॥ चा० ॥ रामाचे वंदुनि पाय हो रा० ॥ वन फळें आणाया जाय हो रा० ॥ ही भक्ति मी वर्णू काहीं बंधनासि वाहे ॥ जानकी० ॥ २ ॥ देइ फळें आणुनिया नित्य आपण उपवासी ॥ कधि निद्रा नाहि त्यासी ॥ जो उभा रक्षणा लागि आश्रमा पाशी ॥ लावुनि बाण चापा शीं ॥ सितेचा भाव हारोनि भक्षि कंदासी ॥ मग पुसणे कश्याला त्यासी ॥ चाल० ॥ रघुराज न बोले कांहीं हो र० ॥ लक्ष्मणा क्षुधा कधि नाहीं शांति नदी वाहे ॥ जानकी० ॥ ३ ॥ हे तीघे पर्ण शाळेस वसति श्रीमंत ॥ पावला ऋतु हेमंत ॥ थंडिचा फार कडाका नसे हो अंत ॥ वाजवि दारिद्री दंत ॥ त्या मध्ये पावति सौख्य लोक धनवंत ॥ चा० ॥ सोसि भरत सुमंत्र रामाला हो सो० ॥ वंदुनि मनिं लक्ष्मणाला हो व० ॥ राम सिता लक्ष्मण गोदावरि

तटि वसताहे ॥ जानकी० ॥ ४ ॥

गाणें १२ वें (राम)

चाल (नृपाल कोप शांतविन)

क्षणभंगुर वय करें व्यर्थ दवडिसी ॥ नाशवंत विषयसूख सत्य माानिसी ॥ प्रपंची कसे गढले मूढ हे जन ॥ निशी दिनी स्मरी मनी, स्मरीरे प्रभू दृढ चरणा ॥ अ०क० ॥ राम नाम नित्य स्मरा तो दयाघन त्रिविधताप शमवुनि तुज करील पावन ॥ १ ॥ भूमि भार हारावया अवतरे क्षिती ॥ शेषशयन कमलनयन अयोध्यापती ॥ रविवंशी रविकुल भूषण तो रघोत्तम ॥ भवाब्धि हा तरावया निजभक्तां द्रावि रूप सगुण ॥ रामनाम० ॥ २ ॥ पदरजें मुक्त करी अहिल्या सती ॥ सनकादिक नारदमुनि ज्याशी वंदिती ॥ वरी जो ज्यानाकिला शिवचाप भंगुन ॥ शरणांगता रक्षि स्वतां धरीरे दाशरथि प्रभू दृढ चरणा ॥ राम नाम० ॥ ३ ॥ पितृ वचन पाळुनि जो सेवि कानन ॥ लक्ष्मण जानकिला संगे घेउन ॥ उद्धरिजो वृक्ष पाषाण चरणि चालुन ॥ धनुर्धरा स्मरा नरा धरा हा गर्व भाव खंडून ॥ राम नाम० ॥ ४ ॥

भस्म अंगि लावि शिरी जटा भारतो वल्कलाशि वेष्टुन करि घेइ चाप तो ॥ किस्किंधा दिली सुग्रिवा वालि मर्दुन ॥ सिता शुद्धि स्तव जलधि वरी जो पाषाण तारी रघुनंदन ॥ राम नाम० ॥ ५ ॥ दशानन वधुन भक्ततारी बिभीषण ॥ नाम स्मरणि वाल्याकोळि होई पावन ॥ तयाचा दास जो वायु नंदन ॥ तया वरि प्रीति करिरे दृढ भाव रूंडुन ॥ राम नाम० ॥ ६ ॥ परब्रह्म निर्विकल्प तो निरामय ॥ भक्त काज कल्पद्रुम तारि भव भय ॥ जयाचे ध्यान करी पंचवदन ॥ तयासि हो भजा किं हो दुर्गा. हिं अ.ळनि रावगुण ॥ राम नाम० ॥ ७ ॥

गाणें. १३ वें (राम)

चौदा वर्षे घोरकाननीं दुस्तर प्रेम भोगिलें ॥ पुत्र धर्म रक्षुनि पित्याच्या वचना सांभाळिलें ॥ सुरसअन्न वर्जुनि तरूची शुष्क सेविलीं फळें ॥ शिरी जटाचे भार शोभती नवि नूतन वल्कलें ॥ भस्मोद्धूलित तनु प्रकाशित रविमंडल लोपलें ॥ शीत उष्ण पर्जन्य पीडितां निज धैर्यें साहिले ॥ आलख निरंजन ध्यान पाहिलें ब्रह्मांडा वेगळें ॥ अद्‌भुत दृढ वैराग्य पाहुनि

तटस्थ ऋपिची कुळें ॥ चा० ॥ सुकुमार तनु सांवळी हो ॥ जो दुर्लभ भूमंडळी हो ॥ ती पहुडे वृक्षातळीहो ॥ सुरादिकांच्या कार्या तत्पर कधि नपडे विस्मृती ॥ अ० क० ॥ भक्त जना कारणें प्रभू तूं क्रीडाशि अवनी प्रती ॥ म्हणे जनक नंदिनी सुरशा रघुराया भूपती ॥ भक्त० ॥ १ ॥ हीनशा प्रसंगी दुष्ट निशाचर मज गेला घेउनी ॥ सहजची मज दुबळीचा झाला शोक तुम्हा दारुण ॥ ते समयीं तुज काहिंच नगमें हरले मी तू पण ॥ अहा सिता वल्लभें म्हणुनी द्रुम धरीले कवटाळुन ॥ रात्रंदिवस नाकळे स्त्रीयेचे लोभें गुंतलें मन ॥ परब्रम्ह परी तुम्हा घेतलें मायेने मोहुन ॥ पुढिल कृत्य जाणुनि वर्तती हे तो मुळची खुण ॥ प्राकृत हा रघुराज बोलती अल्प बुध्धीचे जन ॥ चा० ॥ मग मिळवुन कपीचे दळ हो ॥ उतरुनि सिंधु तुंबळहो ॥ पाहिला सुवेळा चवहो ॥ वक्र दृष्टी फिरवुनि हरीली असुरांची आहंकृती ॥भक्त०॥२॥ रथारूढ होउनी बिरासनि भक्तांचि माउली ॥ क्षीर सिंधु सोडुनी सुरास्तव लंके मधें पावली ॥ रणी शत्रुची शिरें शरानें काळ मुखीं निवाविलीं ॥ कुंभकर्ण दशकंठ इंद्राजित वीर घेतले बळी ॥ बिभीषणासि राज्यिं स्थापुनि काढीशि मनिची मळी ॥ तशीच मजदासिची

दयाळा सर्व लाज राखिली ॥ चा० ॥ केले सुरवर मुनिजन सुखिहो ॥ नाहिं, जगांत उरला दुखि हो ॥ बोलती सिद्धजन मुखींहो ॥ ब्रह्मादिक सुर आनंद पाउनी सुमन भार वर्षिती ॥भक्त०॥३॥ म्हणे दि८ पूर्ण होता तो पुढे येउन मारुती ॥ विजश्रीचा वृत्तांत अवघा भरतातें कळविती ॥ चंद्र उदय पावता जळांतिल नलिनी उल्हासिती ॥. ताशिच तुज भेटतां इंद्रियें भरताचीं तोषतीं ॥ पुत्र मुख चुंबुनी हर्षली कौसल्या गुणवती ॥ सर्व दुःख निरसुनी सागर हेलावती ॥ स्वराज्य पद भोगितां जनां मध्यें दाविसी उत्तम नीती ॥ प्रताप महिमा थोर दुरात्मे सन्मार्गे वर्तती ॥ चा० ॥ नाहिं भेद कुणाचे मनि हो ॥ षड्रिपुची केली धुनि हो ॥ लागले आत्म चिंतनी हो ॥ एकाचि आत्माराम सनातन भाविती सर्वा भुतीं॥भक्त०॥४॥हरि वंशा पूर्ण प्रकशा नरपति वेषाहरी ॥ अगाध तुमाचि लीळा स्मरुनि मज-सुख वाटे अंतरीं ॥ द्वापारांती दुर्जन वधिले शस्त्र न धरितां करीं ॥ नानापरिच्या युक्ती साधुनि समस्त आणिले हरी ॥ कलियुगा मध्यें विश्रांतिस्तव प्रगटुन भीमातिरीं ॥ निवांतस्थळ पाहुनीं नादसी निश्चल पंढरपुरीं ॥ विटेवरी निट उभा विठोबा मूर्ति तुझी गोजिरी ॥ भल्या बुऱ्याशि दर्शन देउनी

तारिशी भव सागरीं ॥ चा० ॥ तूं आनंत करुणा घन रे ॥ दासा वर तुझे मनरे ॥ गीतात गुणा सज्जनरे ॥ अरी मित्रासी समान देसी ॥ अति शुभा सद्गति ॥भक्त०५ ॥ तूं ब्रम्हा विष्णू सदाशिव गणेश जगदंबिका ॥ तूंचि सूर्य तूं चंद्र यम कुबेर वरदायका ॥ तूंच स्वर्ग तूं आकाश वायू पृथ्वी सकल मालिका ॥ तूंच विश्व तूं सर्व चराचर नरनारी होई का ॥ एक ब्रह्म अनेक होउनी रमविशि रघुतिलका ॥ अतर्क्य माया तुमची रामा नकळे ब्रह्मादिका ॥ त्वत्पद भजनीं निमग्न जाहले तेच पावले सुखा ॥ आहं ममतेने प्राणि ठकुनी-जाति वाया फुका ॥ चा० ॥ तुझी माया अति दुर्घटरे ॥ परिणामीं तूंच शेवटरे ॥ सोडुनि अन्य खटपटरे ॥ आन-न्य भावें शरण तुम्हाशीं तोंचि तृप्ति निश्चिती॥भक्त०॥६॥

गाणें १४ वें राम, अहिल्योद्धार

—

चाल (उत्तम जन्मा येउनि रामा०)

बा श्रीरामा पाहुनियां तव पदपद्माचीं धूल ॥ गंगा करिते सकल जनांचें निखिल पाप निर्मूल ॥ आज-मजवरि तत्प्रसाद हें तो कैवल्याचें मूळ ॥ काय मी वर्णू रामा आपुलें जन्मांतरिचे भाग्य ॥ अ० क० ॥

आवंका मी बा तुझे जाणी तत्व कैसें काय ॥ यास्तव बा राघबा नमितें शतधा' तुझे पाय ॥ अ० ॥ १ ॥ सत्यज्ञानानंत वागूमनसा गोचर जगदाद्य ॥ स्वरूप चिन्मय जेकां केवळ आत्मानुभस्वाद्य ॥ दाखविलें तें मजला डोळां वेदशिरः प्रतिपाद्य ॥ कायमीं होऊं तुजला जन्मोजन्मीं उतराय ॥ अब० ॥ २ ॥ आतां करुणासिंधो माझी परिसावी विंनती ॥ अमृतकटाक्षें तुझिया सर्वहि आजी निमाल्या वृत्ति ॥ मेघश्यामल हें तव कोमल रुपवसो मच्चित्तीं ॥ दे तव भक्तिच रामा जेकां साधुजानाची माय ॥ अब० ॥ ३ ॥ नमोनमस्ते रघुकुल तिलका भूषित् भास्करवंशा ॥ नमोनमस्ते पुराणपुरुषा मुनिजनमानसहंसा ॥ नमोनमस्ते साचिद्रूपा भुवनत्रियोत्तंसा ऐसेस्तवुनीं साध्वी गेली स्तविती विठ्ठलराय ॥ अब० ॥ ४ ॥

गाणें १५ वे सीतास्वयंवर

चाल (सावळ्या नाथ मौंजेचा पाहग तुझीं)

राघव कोमलतनू सखेग रघुवर कोमलतनू ॥ परमकठिण हें कमठपृष्टि सम कठोर हें शिवधनू ॥ किशोर हा सुख धनु स० किशोर ॥ अति कोमल नव पल्लव

सम हीं करकमले लहानू ॥ चा० ॥ मुखचंद्राची शोभा सखेग मु०॥ पूर्ण शशी सम प्रभा ॥स०॥पू०॥ सुनीळ नभाचा गाभा सखेग सु० ॥ ऋषिगणांमध्ये हा उभा स० ॥ ऋ० ॥ ठाणमाण रेखिलें धनुर्धर मम हृदयी बैसला ॥ अ० क० ॥ श्रीराम मी प्रणियला सखेग रघुविरभी प्रणियला ॥ या विरहित भूपाळ सख्यानों जनका समान मला ॥ १ ॥ तळमळ बहुलागली स० त० ॥ झर झर झर झर झर झर नेत्रीं आश्रुधारा चालली ॥ सदगद अंतरीं झाली सखे ग स० ॥ चळ चळ चळ चळ कापतिगात्रें धरणी वर पडली ॥ चा० ॥ सकळसख्या धांवती ग बाई स० ॥ एकसावध उठउनी बसविती ग एक०॥एक विंझणवारा घालिती ग एक०॥एक मधुर वचने बोलिती॥ स० ए० ॥काय काय सखेबाई येवढा आनर्थ का मांडिला ॥राघवमी०॥२॥ सख्यानों तुम्ही जा जा ग बाई सखय्यानों ० ॥ ममजनकातें झडकरी सांगा वृत्तांत सर्वहि माझा ॥ म्यां वरिला रामराजा स० म्यां० निश्चय हा दृढ अंतरी समजुनि प्रेमें त्याची भाजा ॥ चा० ॥ सांडि सांडि सांडि हा पण गं बाई सां० ॥ काठिण धनु हा जाण ग बाई ॥ क० ॥ चढविल कसा गुण ग बाई च० ॥ मी त्यजिन अपुला प्राण ॥ निश्चय हा दृढ अंतरी समजुनि अभय द्या हो मला

॥ राघव ० ॥ ३ ॥ जय जय श्री त्रिपुरारी ज० ॥ तवकार्मुकीं हें हळवट व्हावें कृपा युक्त अंतरीं ॥ तूं आपुल्या निजकरी वारे तूं ० ॥ मज निरवावें करुणा अंतरी श्रीरामाचे करी॥चा०॥जय पार्वति धावागे तूं ज०॥ सांबसदाशिव पावारे सांब० ॥ योग्या विधी वैभवारे यो ० ॥ गोविंदी दृढ ठेवारे गो० ॥ इतुकें बोलुनियां अंतरी मग प्रेम पूर लोटला ॥ राघव० ॥ ४ ॥ गर्वी बहु रावण स० ॥ ग० ॥ उठे उठे उठे उठे सभे तूनियां बाहू सावरुन ॥ दृढचापा पाहून स०दृ० ॥ चाल० ॥ आली घेरी पडे धरणिसी गे आ० ॥ कोदंड जडे हृदयासी ग कौ० ॥ पाहे कौतुक ऋषिकेशी ग या० ॥ फर फर फर फर फेस रावणे तोंडासी आणियेला ॥ राघव० ॥ ५ ॥ तें पाहुनि रामानी स० ते० ॥ झाले तुकडे गेलें भंगुनि कौतुक झालें मनीं ॥ ते सि- तेने पाहुनि स सि० ॥ चा० ॥ उठि उठि प्राण सुकुमारे ग उ० ॥ माळघालि सभारंगाणि ग मा० ॥ तुजबाहे कोदंड पाणि ग तूं० ॥ आदिमायेनें वरदेवुनि राखिले भानुला॥ राघव ० ॥ ६ ॥

गाणें १६ वें मृग.

चाल (हेंरे काय कृष्णा लंपट झालें)

जडभाराचा असुनी पळतो ॥ एक स्थानी कटकेंच वळतो ॥ अ० क० ॥ कनकमृगाला पाहून नयनीं ॥ सीता विनवी प्रभुला शयनीं ॥ क० ॥ १ ॥ आणून द्या मज सारंगाला ॥ पाहुन भुलले तदरंगाला ॥ कनक० ॥ २ ॥ मृग देहाच्या काढुन चर्मा ॥ कंचुकी द्या मज मेघश्यामा ॥ कनक० ॥ ३ ॥ दुःख ही मम गति कर्माची ॥ कंचुकी द्या मज मृगचर्माची ॥ कनक० ॥ ४ ॥ लक्षुमण बंधु तुम्हि सितेकडे पाहवें राक्षस येउनी साधिति दावे ॥ कनक ०॥ ५ ॥ रामचंद्र लागे मृगाचें पाठीं ॥ मृग वधीला कंचुकि साठीं ॥ कनक० ॥६॥ लक्षुमण लक्षुमण मृगाचि वाणी ॥ सीता बाई म्हणे रघुवीरस्वामी ॥ कनक० ॥ ७ ॥ धनुशर घेऊन सत्वर यावें ॥ रामचंद्रबंधु तुम्हि सत्वर जावें ॥ कनक० ॥ ८ ॥

गाणे १७ वें शिकार.

चाल (पुरुषोत्तम शेषशार्यी)

हाती घेऊंनी धनुष्यबाण रेघ मंत्राची ओढोनी ॥ सीतेला ठेऊनीया निघाला मग तेथुनी ॥ सोन्याचें हरण झालें रामानें देखिलें ॥ सिताम्हणे कंचुकी आणा

मुगावा केला धुंडावा दीलां ॥ अ० क० ॥ संगे घेऊन लक्षुमणाला ॥ राम गेले शीकारीला ॥ संगे० ॥ १ ॥ मंत्राचि आर्धि प्रादेरी रावण पातला वैरी ॥ अंतिताचें रूप धरी ॥ रावण आला मग दारी ॥ गर्जुन बोलला कपटी, स्त्रायांचींजात खोटी ॥ तूं दिससी मोठी धाटी, अंतिताला करिशी कष्टी, कोप मग आला ॥ संगे० ॥ २ ॥ पाहेरीवर पाय टाकीला उचलून घेइ कडेला ॥ घेऊन जाइ लंकेशी ठेविली अशोकवनासी ॥ मग राम लक्षुमण आले वनधुंडुन कष्टी झाले ॥ सिता मोठी पतिव्रता, रोखचा ठिकाण पहता, कायकरूं देवाआतां लागली चिंता श्रीरामाला ॥ संगे० ॥ ३ ॥ हनुमंत चिमणेबाळ खेळतसे वृक्ष वर ॥ जसेअग्नीचे कल्लोळ सांगेरामकथा रसाळ ॥ रामानें दिली मुद्रीका सीतेला नेउन देगा ॥ मारिला जंबूमाळी आला मारुति दिलि आरोळी ॥ सीतेची शुद्धी आणिली, वानरेंआर्लि नामिति रामला ॥ संगे० ॥ ४ ॥

गाणे १८ वें शबरी.

चाल (हरि मुजला चालवेना)

माझे गुरुजी मातंग, ऋषि बोलिले श्रीरंग, वेगें

भेटेल अभंगते वचन गुणासीं येइना ॥ र० क० ॥ रघुपति कांहो भेटेना ॥ १ ॥ ज्याच्या विलोकनासाठीं, करूनियां पर्णकुटी, वनी तपेंकरी मोठी, परिकार्य सफल होइना ॥ रघु० ॥ २ ॥ तनु पाहतां न बरी, फार मलीन कबरी, भार असे ही शबरी, तारि म्हणून पारि निकट नेइना ॥ रघु० ॥ ३ ॥ दास राजारामीं लीन, झालें प्रासादीक दीन, जैसे जळावीण मीन, विभु कसा येउन यश घेइना ॥ रघु० ॥ ४ ॥

गाणें १९ वें, रावण मारीच संवाद.

चाल (अर्जुना इतर मज कांहीं,)

मारीच आश्रमीं बसला, सत्वीश दशानन आला ॥ तेधवां ॥ सन्मानुनि आदरें त्याला, बोलिला काय वचनाला ॥ तेधवां ॥ स्वामि कां एकले आलां, सेनेविण या समयाला ॥ रावण ॥ चा० ॥ ही सुरी, काळजी उरी, काय अंतरी, वदा दासाला ॥ अ० क० ॥ करिनाचि त्या सत्कार्याला ॥ रावणा ॥ जे मान्य असे जगताला ॥ कारि० ॥ १ ॥ दशवदन वदे बा ताता, एक मी सांगतों आतां ॥ मरिचा ॥ पंचवटी श्री रघुनाथा, मोहुनिया आणणें सीता ॥ मारिचा ॥ मारिला जयाने भ्राता, वर्तली

असे ही चिंता ॥ मारिचा ॥ चा० ॥ तूं तरी, मृगरुपा धरी, जाय सत्वरी, तया ठायाला ॥ अ० क० ॥ झडकरी करी कार्याला ॥ मारिचा ॥ भुलवुनी रामरायाला ॥ झड० ॥ मा० ॥ २ ॥ दचकुनिया मारिच बोले, तुज कुणी काय शिकविलें ॥ रावणा ॥ कौशिक मख करि त्या वेळे, रक्षणा रघुविर आले ॥ रावणा ॥ सहजची सुबाहुस वधिलें, सागरी मला ढकलीलें ॥ रावणा ॥ चा० ॥ तो शूर, वीर रणधीर, प्रतापी थोर, वंद्य जगताला ॥ करिनाचि० ॥ रा० ॥ ३ ॥ हाराम कोण तुज ठावें, जरि असेल तरि सांगावें ॥ मारिचा॥ मी लंकापती या नावें, त्रैलोकीं कीर्ती मिरवे ॥ मारिचा॥ मानवा भक्ष समजावे, राक्षसि हें कृत्य करावें ॥ मारिचा ॥ चा० ॥ वैदेहि, आणि लवलाहि, साह्य तूं होइ, अशा समयाल ॥ झडकरी० ॥ मा० ॥ ४ ॥ रामनाम वदतां पाही, शतखंड हृदय हें होई ॥ रावणा ॥ ज्या शब्दा रकार येई, ते सर्व वर्जिले देहीं ॥ रावणा ॥ हें राज्य रत्न रमणी ही, रथ आदी करुनी पाही ॥ रावणा ॥ चा० ॥ हे भोग, सुखाचे योग, परि करि त्याग, भिउनि रामाला ॥ करिनाचि० ॥ रा० ॥ ५ ॥ बोलसी सत्य वचनाला, परि ऐके एक पणाला ॥ मारिचा ॥ रणि पाडिन रघुनाथाला, नातरी आत्म जिविताला ॥ मारिचा ॥

या उपरी बोलसि बोला, तरि खचित वधिन रे तूजला ॥ मारिचा ॥ चा० ॥ करित्वारा, काननांतरा, जाय सत्वरा वेष धरण्याला ॥ झडकरी० ॥ मा० ॥ ६ ॥ राक्षसें तनू ही वधितां, दुर्गती होइल मज आतां ॥ खचितची ॥ जो सकलां मुक्तीदाता, श्रीराम जगाची माता ॥ खचितची ॥ त्याकरी करिन देहांता, करि विचार ऐसा पुरता ॥ खचितची ॥ चा० ॥ या परी, मारिचा बरी, मुक्तिदे हरी, रक्षि गंगाला ॥ राघवा दावि चरणाला ॥ झडकरी० ॥ जें मान्य० ॥ ७ ॥



गाणे २० वें मारुती.

चाल (शुभांगे तुला बराया०)

कनक कुरंगा पाठी स्मरतां, प्रभू सर्वज्ञ काम ॥ अ० क० ॥ षडगुण तर आराम ॥ सबांधव रांम ॥ कपींद्र सुखी असेंकीं ॥१॥ निज कांतेतें दुष्टें हरिलें ॥ स्मरतो मंगळधाम ॥ कपिं० ॥ २ ॥ सुमित्रा दुर्वाक्ये छळिलें ॥

त्याचा हा परिणाम ॥ कपिं० ॥ ३ ॥ मजविरहे त्या त्या चिंता कैची ॥ अखिल लोक अभिराम ॥ कपिं० ॥ ४ ॥ त्र्यंबक भंगी एका जनार्दन ॥ करितो विबुध प्रमाण ॥ कपिं० ॥ ५ ॥

गाणे २१ वें. मारुती.

मी अपराधी, वचन प्रसंगीं ॥ दुःखी असे नरपती ॥ अ० क० ॥ किं मजला सांगा बा मारुती ॥ कधि भेटतिल रघुपती ॥ किं म० ॥ १ ॥ सुवर्ण कंचुकिची हाउस मजला ॥ इच्छा केली अती ॥ किं मज० ॥ २ ॥ साधुस छळिलें मनि मज कळलें ॥ वनि रक्षिसि गांजिती ॥ किं मज० ॥ ३ ॥ बुडते मी आतां या भवसागरीं ॥ उतरू कोणे रिती ॥ किं म० ॥ ४ ॥

गाणे २२ वें मारुती.

वायुसुता आतां रे मला वियोग साहेना ॥ क्षणो क्षणी ॥ क्षणो क्षणी श्रीरामा विणें चैन पडेना ॥ कसें करूं ॥ कसेंकरू रामाचें स्मरण मज जाईना ॥ क्लेश झाले ॥ क्लेश झाले परंतु मृत्यु कांहीं येईना ॥

मारुती ॥ चा०॥ युग समान घटका जाती, ॥ मारुती॥ घालु आगळ मनाला किती ॥ मा० ॥ रघुविरास ममता असती ॥ मा० ॥ अ० क० ॥ मारुती केंव्हां रघुपती चरण पाहिन रे ॥ मा० ॥ १ ॥ आश्रमीं रक्षणा ठेउन कनिष्ठ बंधू ॥ मृग वधा ॥ मृग वधास गेले रघुपति करुणासिंधू ॥ ऐकिली ॥ ऐकिली निशाचर वाचा करुणा शब्द ॥ मा० ॥ चा० ॥ निज श्रवणीं अक्षर पडलें ॥ मा० ॥ मी बहूत घाबरी झालें ॥मा०॥ मुखपंकज उतरुनगेलें ॥ मा० ॥ लक्षुमणास तेंव्हां कठिण उत्तरीं वदलें ॥ मा० ॥ मारुती केंव्हां ॥ व० ॥ ॥ २ ॥ नसे मनुष्यवार्ता मज लंकेसी नेता ॥ ठेविलें ॥ ठेविलें ॥ आशोकवनीं दुःखी मीं असतां ॥ क्षणोक्षणी ॥ क्षणींक्षणी जीव घाबरा विणें रघुनाथा ॥ वर्तली ॥ वर्तली चिंता बहुत तयाच्या चित्ता ॥ मा० ॥ चा० ॥ क्षणो क्षणीं मुख कुरवाळी ॥ मा० ॥ श्रीराम वनी त्या काळीं ॥ मा० ॥ बहु कठिण समय या वेळीं ॥ मा० ॥ मारुती के० ॥ ॥ ३ ॥ स्वामिच्या चरणीं हेतू पुरवित होते ॥ मा० ॥ पायासीं सेवक सत्वर तत्पर होते ॥ मा० ॥ मग हार कंठिचे असतां सोसत नव्हतें ॥ मा० ॥ हा समुद्र पडला आड अम्हां दोघांचें ॥ मा० ॥ चा० ॥ रघुपती मुक्तहार कंठीं ॥ मा० ॥ श्रीराम कधीं भेटती ॥ मा० ॥

॥ हें हृदय कळवळें अती ॥ मा० ॥ कोप आला त्याच्या बंधुला बोलले म्हणुन त्यागीलें ॥ मा० ॥ मारुती केव्हां० ॥ ४ ॥

गाणें २३ वें मुद्रिका.

होतो पंचवटीं मध्यें तिघे सुखाचे योगें ॥ सुवर्णमृगाचे पाठि.धाडिले दोघे ॥ दशकंठ हरता झाला सत्वर वेगें ॥ चोरोनि मला घेऊन निघाला संगे ॥ चा० ॥ जटायुने युद्ध केलें ॥ मुद्रिके ॥ आशोकि मला ठेवीलें ॥ मु० ॥ श्रीजटेस राखण ठेवियलें मजपासी ॥ अ० क० ॥ कुठें आहित प्राणनाथ सांग अम्हासी ॥ मुद्रिके सखे तूं कां. त्यजिलें रामसी ॥ कुठें० ॥ १ ॥ कुठें अवचित. पडलिस हतात सखये बाई ॥ मोकलिले सम लक्ष्मण कोणते ठायीं ॥ मजसाठीं वेगे वनी हिंडती पायीं ॥ मज घडी क्रमेना त्याविण करु गत कायीं ॥ चा० ॥ किंवा संन्यासी झाले ॥ मु० ॥ श्रीराम कुणिकडे गेले ॥ मु० ॥ कीं बनांत व्याघ्रें वधिलें ॥ मु० ॥ कां दैत्य दुर्मती घेउन गेले त्यासीं ॥ कुठें० ॥ २ ॥ मुद्रिके सखे तूं श्रीरामाच्या करिची ॥ आज कुठुन आलिस मजपाशि होउन अंतरिची ॥ कुठें

आहेत दोघे सांग शुद्धि हो त्यांची ॥ मुखवार्ता कळवी निववि काळजी जिविची ॥ चा० ॥ तुज पाठविलें पहायासी ॥ मु०॥ मीं येथें आहे लंकेसी ॥ मु० ॥ रावणाचें अशोक वनासीं ॥ मु० ॥ जाम्बरीत वेगें सांगे श्रीरामासी ॥ कुठें० ॥ ३ ॥ मुद्रिके आवड की माझि रामाला मोठी ॥ म्हणुनया हिंडती राम वनीं मजसाठीं ॥ काननीं उपवनीं किंवा नदीचे काठीं ॥ दरि डोंगरि फिरती ममता धरुनीं पोटीं ॥ चा० ॥ त्यजुपाहे प्राण झडकरी ॥ मु० ॥ श्रीराम दावि झड-करी ॥ मु ०॥ कुठें त्यजुन आलिस तूं तरी ॥ मु० ॥ महादेव विनंती करितो श्रीरामासी ॥ कुठें ० ॥ ४ ॥

गाणें २४ वें मुद्रिका.

चाल (तुम्हि थोराचे अहां परंतु०)

रामचंद्र बरे आहेत काय, लक्ष्मणासह सुखरूपानें ॥ यापरि सीतादेवि विचारी, रामनाम मुदि पाहोनीं ॥ अ० क० ॥ हे मुद्रे मजप्रती बोल; बसलिस कांगे मौनानें ॥ हे मु० ॥ १ ॥ विवाह झाल्या दिवसा पासुनि, भेटी होतिस तिकडोनी ॥ आज कांगे आलिस इकडे श्रीरामाला सोडोनी ॥ हे मु० ॥ २ ॥ जनकें दिधलें

श्रीरामाला, त्याही दिवसा पासोनी ॥ नव्हतें क्षणदुर आतां विसरले माझ्या पुर्विच्च्या पापानीं ॥ हे मु० ॥ ३ ॥ यापरि सीता देवी बोले, यापरि झाले मीं दीन ॥ कोटिचि होतिस हस्ति कंडयापारि झालिस रघुविर विरहानें ॥ हे मु० ॥ ४ ॥ अशोक वृक्षा खालीं सीता, राम नामाचि करि स्मरण ॥ रामाजवळी हनुमंत सदा उभा असे कर जोडुन ॥ हे मु० ॥ ५ ॥ वानरसैन्यें मिळवुन रघुविर निघातिल रावण मर्दुनीं ॥ माझ्या समोर सेतु बांधुनी नेति अयोध्ये लागोनी ॥ हे मु० ॥ ६ ॥ गोदावरी नदीमधें मी सीतजलानें नाहींन ॥ माझ्या सामोर मोर येउनी नाचति पंखें पसरोनी ॥ हे मु० ॥ ७ ॥ प्रातः काळीं उठुनी पढिलें काव्य वाल्मिकी रामायण ॥ सुंदर कांडी प्रथम कथाहे पुण्य बहू ऐकिल्यानें ॥ हे मु० ॥ ८ ॥

गाणें २५ वें मुद्रिका.

कुशली कीं रामराजा सखे सांग मुद्रे ॥ कुशली कीं० ॥ धृ० ॥ मी एक पापिणी गे, मुकलीसे राम पाया ॥ पारि तुवा कैसा त्यजिला सखाराम माझा ॥ कु० ॥ १ ॥ गांजिती राक्षसि ह्या, पैरि तें मी संगुं कायीं ॥ विसरलें

दुःख सारे दर्शनें तुझिया ॥ कु० ॥ २ ॥ राम मनीं रामध्यानीं, वचनीं हि चाप पाणी ॥ पंत विठ्ठलाख्य कविची पाहि पूजा ॥ कु० ॥ ३ ॥

गाणें २६ वें, मंडोदरी.

रावणासी करी विनंती सत्य मंडोदारिराणी ॥ स्वयमेव ती जोडून पाणी ॥ राया लंकापती भूपतीप्रति बोलतसे मंजुळवाणीं ॥ परिसा विनंती कानीं ॥ अचल राज्य हें संतति संपति दिली असे भगवंतानीं ॥ हरि० हर प्रभु शिव सांबानीं ॥ एकाछत्रीं राज्य चालिलें शत्रु नाहीं तुम्हाला ॥ अ० क० ॥ सांगतें मि येइन कामाला ॥ सिता माता परतुन धावी शरण जा तुम्ही रामाला ॥ सांग० ॥ १ ॥ काय हो तुमचा प्रताप इंद्र पुष्पें आणितो लवलाही ॥ ब्रम्हा पंचांग पाही ॥ चंद्र धरितो छत्र सूर्य दिप आणि तारा रचनाही ॥ नारद तुंबर पुढें गाई ॥ तेहेतिस कोटी बंदि घातिले कोण भीतो यमाला ॥ सांगतें ॥ २ ॥ काय तुमचा पराक्रम नमविधी धर्म आंतरले ॥ काय हो म्हणुन पुण्य सरलें ॥ रात्री मजला स्वप्न पडलें भासतसे कर्मचि फिरलें ॥ वानर लंकेमधि शिरले ॥ कांचन नगरी त्यानि वेढिली

सुचना देतें मि तुम्हाला ॥ सांग० ॥ ३ ॥ परललना अभिलाष करीतां अंगाची हो रांगोळी ॥ होइल लंकेची होळी ॥ बांही शिरें संभाळुन खेळा फांसा तुमचे कर कमळीं ॥ अहेव पण राखावें कूळी ॥ बोले दशानन मुक्तीसाठी विरोध भक्ती हे समुळीं ॥ केलि येउन राक्षस कूळीं ॥ पुढिले जन्मीं तुम्ही आम्ही मिळूं विष्णुच्या पदकमला ॥ सांग० ॥ ४ ॥

गाणें २७ वें, मंडोदरी.

मंडोदरी बोधकरी, प्राणनाथ श्रवण करी ॥ मंदिरांत अग्निकुंड, ठेउ नकोरे ॥ सिता सोडरे ॥ सि० ॥ आज कलह मांडु नकोरे ॥ सि० ॥ १ ॥ रावण ह्मणे मंडोदरी, प्राणप्रिये श्रवणकरी ॥ राम मसी काय करी, भिऊ नको ग ॥ सि० ॥ २ ॥ राज्ञा आदि राज्यधर, वचन माझे ऐका स्थिर ॥ आपण आपलें स्वकूळ, मारुनकोरे ॥ सि० ॥ ३ ॥ रावण ह्मणे प्राण सखे, सदनास जाइ सुखें ॥ सीतेचें नाव मुखें, घेउ नको ग ॥ सि० ॥ ४ ॥ दाशरथी राम जरी, येइल तो लंकेवरी ॥ युद्ध होइल नाना परी, आटपेना तुह्मातो ॥ सि० ॥ ५ ॥ श्रीरामाचा दूत जरी, येइल तो लंकेवरी ॥ ॥ वायुसूत युद्धकरी, भिऊ नको ग ॥ सि० ॥ ६ ॥

गाणें २८ वें, मंडोदरी

चाल- (पहा दुष्ट दुःशासन माझी०)

सागर उतरुन रामचंद्र तो पैल तिरा पातले ॥ नळ नीळ अंगद सुग्रिव परतुनि हनुमंत तोही आले० ॥ शिष्टा-ईसी अंगद धाडून दशकंठ बोधिले ॥ त्याचें वचन तुम्हि न ऐका म्हणुनी राम युद्धासीं आले ॥ चा० ॥ एक अर्जि माझि ऐकाविहो ॥ तुम्ही ऐ० ॥ ही सिता तुम्ही सोडावीहो ॥ तु० सो० ॥ ही मृत्युवाट मोडा विहो ॥ तु० मो० ॥ ऋषिकुळीं तुम्हि जन्म घेतिला दुष्टबुद्धि धरुनका ॥ मित्रादिक वर्णिती परंतु त्यांचि गोष्ट नायका ॥ अ० क० ॥ बोले मंडोदरि ऐक रावण गोष्ट माझि आयका ॥ द्यावि सिता सोडून रामासी वैर वाढवूं नका ॥ १ ॥ राक्षस कूळीं भक्त शिरोमणि बलिराजा पाहाना ॥ त्याच वंशि प्रऱ्हाद आपण स्मरती नारायणा ॥ भक्तिबळें वश त्यानि करूनया ठेवि समिप वामना ॥ दंड हाती घेऊनु तयाचे रक्षि-ग्राम भुवना ॥ चा० ॥ अशि भक्ति करावी स्वामि हो ॥ क० स्वा० ॥ हीराखा लंका भुमिहो ॥ ल० ॥ जा शरण तुम्ही रघुरामि हो ॥ तु० ॥ बंधू तुमचा बिभिषण यानीं राम जोडिला सखा ॥ गेला शरण तो झाला

चिरजिव त्याचें वचन नायका ॥ बोले० ॥ २ ॥ कुळ स्वामिहा शंकर तुमचा रामभजनि लागला ॥ कुळ स्वामिचा कोपहि झाला कुलक्षय मांडिला ॥ ज्या-रामासि वैराचि धरितां शंकर तो कोपला ॥ याचि चिंता सोडून तुम्हापुढें पदर मी पसरिला ॥ हा काम शंभुचा वैरि हो ॥ शं ० ॥ तो केला तुम्ही दरबारि हो ॥ तु० ॥ आम्हा कोपला मदनारिहो ॥ म० ॥ इंद्रजीत हा ज्येष्ठ सुत तुम्हि विचार अंतारि करा ॥ कलंक लाऊनका कुळासी विचार चित्तीं धरा ॥ बोले० ॥ ३ ॥ प्रिये बोलसी वचन परंतु हें मजला ठाउकें ॥ होणार असेलतें होइल सखेग प्रारब्धा सारखें ॥ आदिनारा-यण राम वार्तेने ऐकीलें बहुमुखें ॥ मरण कधीं येईल सखेग रामाच्या सन्मुखें ॥ चा० ॥ प्रिये आतां गृहासी जावें हो ॥ गृ० ॥ मम पराक्रमा ऐकावें हो ॥ तु० ऐ० ॥ अंतरी स्वस्थ राहावेंहो ॥ तु० रा० ॥ बैसुन शिबिके स्वस्थानासी गेली मयकन्यका ॥ राम दास म्हणे रक्षी रघुबिर अपुल्या निज सेवका ॥ बोले ० ॥ ४ ॥

गाणें २९ वें, सुलोचना.

शिरासि वीर मशर्यी रणी जो न मिळे ॥ पुढें अशुभ

होणार नकळे ॥ पूर्वी वाटतें ऐसें मनाला ॥ अ० क० ॥ जाउनका तुम्ही समरंगणाला ॥ प्राणनाथ विनवितें आजि आपणाला ॥ हो आ० ॥ जाउ२ ॥ १ ॥ सहाय युद्धासि येतो सहोदर घातकी मारुति आला अगोदर ॥ दैव निरंतर सहाय्य कुणाला ॥ जाउ० ॥ २ ॥ युद्ध रामासह तुम्ही न करावें ॥ वैर रामासि तुम्ही न धरावें ॥ अभय वर देई मम कंकणाला ॥ जाउ० ॥ ३ ॥ सति वीर शौर्य होतसे साचे ॥ समरंगणि भय हें कशाचें ॥ अविकार्थ पाहिन श्रीरामाला ॥ जाउ० ॥ ४ ॥

गाणें ३० वें, सुलोचना.

जयआशा धरुनि दृढ मी गूढस्थलि करितां हवन ॥ देवता तुष्ट बई झाल्या फल देति मज आणून ॥ वाजिसह अर्धा रथ तो निघतांना कुंडातून ॥ चाल० ॥ ऐसे फल येता मजला ॥ श्रुत झालें मम शत्रुला ॥ तें येउनि घालिती घाला ॥ कोपविती आराध्यांतें ॥ अ० क० ॥ सुलोचनें आयके कांति ॥ रण वृत्त सांगतो तूतें ॥ ॥ १ ॥ अब्धितें लंघुन जाता विरातें बुडवो प्राणी ॥ चढता तो पर्वत सारा कोसळला शिखराहूनी ॥ संपताचि यज्ञा-

अंति चरु नेई श्वान येउनी ॥ चा० ॥ विपरित असे हें घडलें ॥ शिर रामा जवळीं पडलें ॥ तें मागुन घेई अबले ॥ करि सत्वर सह गमनातें ॥ सु० ॥ २ ॥ सांडोनिया प्रपंच मजासि ॥ ये सत्वर भेटायासी ॥ तुज वाचून सखये आतां जिव होतो कासाविशी ॥ ह्मणुनिया मूळ कर आला तुज लागि भेटायासी ॥ चा० ॥ करी भक्षण अग्नी काष्ट ॥ मोक्षाचि धरुनि वाट ॥ उभयतां जाउमें नीट ॥ ये सत्वर पल भरतातें ॥ ३ ॥

गाणें ३१ वें, सुलोचना.

चाल (नंद गृहाच्या जवळ.)

लोपा मुद्रा सम ही तारा ॥ करिते आपुल्या स्वकुलोद्धारा ॥ तत्पतिच्या तूं दे शिरकमला ॥ होउन कनवाळु तिजवरी ॥ अ० क० ॥ इंद्रजिताचि दारा पाहुनि बिभिषण गहिंवरला ॥ समर्थी त्या ॥ १ ॥ ऐके जानकी वल्लभ वीरा दर्शन हेतु तिज मनीं झाला ॥ मुक्त करावें या जननीला ॥ ह्मणुनि हें अबला येत से ॥ इंद्र० ॥ २ ॥ ऐसे वदतां धाउन आली ॥ जय रघुवीरा ह्मणुनि वदली ॥ श्रीरामाच्या चरणी पडली ॥ उठेनाच बाळा तेव्हां ती ॥ इंद्र० ॥ ३ ॥

गाणें ३२ वें, सुलोचना.

सुलोचना पतिव्रता इंद्रजिताची राणी ॥ सुखसदनीं असतां अंगणीं पडे पतिभुज येउनी ॥ घाबरोनि मग आली बाहेरी पाहे न्याहाळोनीं ॥ ओळखोन मग पती करातें पडे मुर्छागत होउनी ॥ सावध होउन पति गुणातें आठवित चित्तीं ॥ अहा प्राण प्रिया कोणा कारणे झाली ऐशी गती ॥ दौत लेखणी आणुन स्वरतें विनवी प्राणपती ॥ काय वृत्तांत झाला सर्व हि सांगा मजप्रती ॥ अ० क० ॥ सुलोचना पतिव्रता इंद्रजिताची सती ॥ शिर हंसवुन कीर्ति केली त्रयभुवानाप्रती ॥ १ ॥ निर्जिव करीं पत्र लिहिलें वाची. सुलोचना ॥ निकुंबळेसीं हवन मांडिले काढाया स्यंदना ॥ इतक्यामध्ये सौमित्रानें युद्ध केलें दारुणा ॥ त्याच्या हस्तें पडलो रणांगणीं जातो स्वर्ग भूवना ॥ राम विरोधें वैकुंठ प्राप्ती मज नाहीं पुनरावृत्ती ॥ मार्ग प्रतीक्षा करितो तुझि मीं येई शिघ्रगती ॥ सुलो० ॥ २ ॥ सुलोचना मगत्वरित चालली सासूश्वशुर गृहीं ॥ चरणीं मस्तक ठेउन आज्ञा मागे ते समयीं ॥ शीर राहिलें तें येइल कैशा रिती ॥ शीर आणाया जाइन परिमीं होइल कैशी

गती ॥ इतकें ऐकुन म्हणे मंडोदरी संशय न धरि चित्तीं ॥ राम पूर्ण परब्रम्ह अवतार मुनिजन बोलती ॥ निष्कपट निष्कलंक राम हा प्रेमळ भक्ता प्रती ॥ सुलो० ॥ ३ ॥ पंथ क्रमित सुलोचना ती कटका समीप पातली ॥ पाहुन राम बिभीषणातें पुसती ते वेळीं ॥ कोण कुणाची भार्या येते कटका समीपती ॥ पाहुन बिभिषण आधो वदनें बोले रामा प्रती ॥ रावण स्नुषा ही इंद्रजित जाया शेषाची बाळी ॥ शिर मागाया येते तुम्हाकडे सहगमना चालली ॥ जिच्या स्वरुपास चंद्र सुर्य हे तुळना न पावती ॥ अहा दैवा काय अशी हे विचित्र कर्मगती ॥ सुलो ० ॥ ४ ॥ चरणीं मस्तक ठेउन सुलोचना रामरूप न्याहाळी ॥ शिर मागतसे बहु विनयानें जोडुन बद्धांजुळी ॥ समरांगणीचें वृत्त कसें हें श्रुत झाले तुजसी ॥ निर्जिव करी पत्र लिहूनी दाखविलें मजसी ॥ असत्य म्हणुनी वानर सर्वहि खदखदा हसती ॥ सत्य पतिव्रता असशी तरी तूं हंसवी शीराप्रती ॥ सुलो० ५ ॥ शीर घेउनी मांडीवरती विलाप करि सुंदरी ॥ अहा प्राणप्रिया सोडुन जाता मजला वनांतरीं ॥ नाना परिचे विलाप करी परि शीर हसें नातें ॥ करुणा शब्दें करुनी विनवी ऐका तुम्हि श्रोते ॥ मम पिता तरि शेष पाचा-

रुन आणिते जरि येथें ॥ मम कनवाळे करुनी तुमच्या साद्यातें॥ संजिवनि मणी स्पर्शुन दे चुडेदान मजतें ॥ इतके बोलता शीर हंसलें पाहती सर्वहितें ॥ नेत्र उघडुन रामरुपातें इंद्रजीत न्याहाळी ॥ वानर सर्वहि पिटिती मग टाळी ॥ सत्य सुलोचना पतिव्रताही यश कीर्ति गाती ॥रामचरणि कृष्णा अनु दिनीं मागे सायुज्यगती ॥ सुलो० ॥ ६ ॥

गाणे ३३ वें, सुलोचना.

सौमित्राचे बाणि इंद्राजित निकुंबळी पडला ॥ बाहु तयाचा सुलोचने प्रति सांगू पाठविला ॥ सुख समयीं साति असतां येउन भुज दारी पडला ॥ ओळखिला कर पतिचा जिव सुमतीचा घाबरला ॥ चा० ॥ अकस्मात विज अकाशिची पडली काय ॥ पडे मूर्छित धरणीवर मोकली धाय ॥ जशि गार जळाची पडतां विरोन जाय ॥ कशि गत घडली प्राणनाथ कळवा हो तुमची ॥ प्रौढप्रतापें देशधडी तुम्ही केली सुरचमुची ॥ अ० क० ॥ सुलोचना सुंदरा पतिव्रता दुहिता शेषाची ॥ इंद्रजिताची कांता गेली गुडि उभवुन यशाची ॥ १ ॥ घेउन कागद दौत लेखणीं भुजे समिप आली ॥

खांगाजी मज लिहुन दाखव। कैसी गत पडली ॥ भेत करें घेउन लेखणी अक्षरें वर लिहिली ॥ निकुंबळे काळाची घेउन उडि मजवर पडली ॥ चा० ॥ वीर लक्षुमणाचे बाणीं पडलें शिर ॥ धडाची शकलें केली मारुन तिर ॥ शिर घेउन गेले जेथें आहे रघुविर ॥ स्मरण झालिया माफ पाहिजे एकांति तुझि आमुची ॥ उभा तिष्ठतो वाट पहातो तव आगमनाची ॥ सुलो० ॥ २ ॥ जाणुन या लिखितार्थ मनी मग गौरी हर स्मरला ॥ मृत्युलोकाची वस्ति अमुची ऋणानुबंध सरला ॥ सखयानोंगे कर मज पतिनें मुराळि पाठविला ॥ उभा तिष्ठतो धनीं अमुचा उशीर पै झाला ॥ चा० ॥ फोडिलें भांडार वाटिलें धन ॥ शुक सारिका मयुरं दिले सोडुन ॥ लिहिलि भिंतिवर चित्रें करिति रूदन ॥ म्हणाति निरविलें कुणा उपेक्षा केली का आमुची ॥ कोण कर्म ओढवलें तुटली सुख संगत तुमची ॥ सुलो० ॥ ३ ॥ वाहुनया भुज शिबिकें प्रयाण लंकेप्रति केलें ॥ दशाननें भुज पाहुन लिखित समग्र वाचियलें ॥ म्हणे दैव ओखटें आमुचें आज कसें झालें ॥ इंद्रजीतसुत निधान आमुचें मृत्युपंथा गेलें ॥ चा० ॥ मंडोदरि अति शोकें व्याकुळ ॥ ललाट पिटी मुखीं घालिते धुळ ॥ सुलोचना दशवदना मागे अज्ञा

जायाची ॥ सुवेळेसी भेटी घेइन श्रीरघुरायाची ॥ सुलो० ॥ ४ ॥ सवे घेउन भाट बंदिजन थाट असूरांचे ॥ सुवेळेस पातली देखती दुत रघुरायाचे ॥ म्हणे जानकी पाठविली कीं वदति सर्व वाचें ॥ उभा बिभीषण कर जोडुन पद वंदुन स्वामीचे ॥ चा० ॥ ही सुलोचना इंद्रजीत जाया ॥ पतिसवें जात से अर्पुनया काया ॥ शिर मागु आली स्वामी रघुराया ॥ उभि बंद्धांजुळि कर जोडुन भुळ वंदुन पायाची ॥ रघुविर स्मरणीं कोमल वचनीं पतिचें शिर याची ॥ सुलो० ॥ ५ ॥ धीर उदारा पूर्ण गंभिरा रामा सुखसारा ॥ परात्परा रणधिरा श्रीधरा विरा रघुविरा ॥ भक्तकाज कैवारा तूं धरिलें आवतारा ॥ अल्पमती मीं काय वर्णू कीर्ती दातारा ॥ चा० ॥ सहस्त्र मुखीं मम पिता देवाचा ॥ चिरली जिव्हा स्तवितां तुंज वाचा ॥ ब्रह्मा तव नाभीकमळीं बाळ जन्म विरंची ॥ चरण दर्शनीं सुलोचनाही झालि पुनित साची ॥ सुलो० ॥ ६ ॥ कोमल वाणीं ऐकुन कानीं वदे चापपाणि ॥ पति हत झाला ऐसें तुजला सांगितलें कोणीं ॥ येरु म्हणे मज पाणि धाडिला कळविलें लिहुनीं ॥ सत्य वदावें कां भुज लिखितां वदती कपि मिळुनी ॥ चा० ॥ जरि ही हंसविल इंद्रजिताचे शिर ॥ तरि सत्य मानु हीं

लिहिलिं करी अक्षर ॥ शिर आणवी तो स्वामी रघुविर ॥
सती पुढें ठेवितां उचलुन करि लल्लाटाशीं ॥ भेटवि
बोले गोष्ट बेटकी शिर हंसायाची ॥ सुलो० ॥ ७ ॥
प्राणनाथ प्रियकारा अघटित कैसें हें घडलें ॥ काळाचे
तुम्हि काळ ऐसे जाणुन मी वरिलें ॥ आज कसें आपणास
अपजय भार्येने वरिलें ॥ तरिच न बोला मजसी आज
कां मौन स्विकारीलें ॥ चा० ॥ जे मनीं असेल तेचि
बोला गुज ॥ तरि असत्य मानूं लिहिलेलें मृत भुजें
॥ ही लाज वल्लभा जाते नकळे तुज ॥ शिणली वाणी
व्यर्थ चावटी झाली बोलाची ॥ मनोरथाच्या शेतीं
कणसे आली फोलाचीं ॥ सुलो० ॥ ८ ॥ पितृभगिनीं
आत तुमची गेली निजस्तवुनी ॥ गौरविली विर
सौमित्रानें नासिक तोडुनी ॥ त्यासि तुम्ही रणी पडतां
होउन यशाची हानी ॥ ममतात ज़री साह्यासी स्मरता
तो दशफणी ॥ चा० ॥ तरि धाउन कळवळ्यानें तो
येता ॥ शिर हंसे खदखदा ऐकुन आव चीता ॥
आश्चर्य झालें वानर आणि समस्तां ॥ श्रीरामासी
मनी जाणली खुण सत्याची ॥ ठक वीराशीं म्हणे
मनीशा पूर्ण करा ईची ॥ सुलो० ॥ ९ ॥ शेषाचा
अवतार लक्षुमण त्यानेची वधिलें ॥ साह्य काम पाचारु
सखेग म्हणुनी शिर हंसले ॥ ऐकुनया विरलक्षुमणें

अति शोका आदरिलें ॥ म्हणे राम वाल्मीकें लिहिलें तेंच असे घडलें ॥ चा० ॥ मग राम दयाळू दिधलें तिजला शिर ॥ म्हणे जागे माये फार झाला ऊशिर ॥ म्हणे आजचा दीन आटपा चमू वानरांची ॥ माय बाप तुम्ही भेट करा मज पतिच्या पायाची ॥ सुलो० ॥ १० ॥ सीतापतिची आज्ञा घेउन निकुंबळे गेली ॥ पडली शकलें वाहुन शिबिकें सिंधुतटा नेली ॥ प्रचंड कुंडीं चंदन आणि बिल्व काष्ठ रचिलीं ॥ ठेउन प्रेत भरून गगनोद्भव ज्वालागेली ॥ चा० ॥ आप्त प्रिया संगमीं करुन स्नान ॥ शुभ कल्याणी वायनें देत दान ॥ यक्ष किन्नर स्त्रिया करिती सन्मान ॥ लंकानाथ मंडोदारि सहपरि वारी नगरीची ॥ प्रजा पातली थडी दाटली बहुत सागरीची ॥ सुलो० ॥ ११ ॥ जगदात्मा श्रीराम वंदुनी लक्षुनि भावार्थ ॥ नमन लंकानाथ मंडोदारि आप्तहि सकळांस ॥ प्रदक्षणा कुंडासी करुनिया उभी विरक्त ॥ मग इंद्रजित सखी दिव्य घेई हर्षांत ॥ चा० ॥ उमा रमा ऋषिपत्नींच्या पंगती ॥ बिमानीं इंद्रजित दिव्य देह दिप्ती ॥ शिवशंकर स्मरणीं आहुती दिधली देहाची ॥ साक्ष आलिस वैकुंठीं मजला सुखद असें हेंची ॥ सुलो० ॥ १२ ॥

गाणें ३४ वें, सुलोचना.

चाल (श्रीपाद श्रीवल्लभ या सतीचे अध्या या सारखी) दुर्जय वीर पावला इंद्रजित लक्ष्मणाचें करीं ॥ धड पडलें रणि शीर सुवेळाचाळि नेले वानरीं ॥ अकस्मात लंके वरुन भुज आली निकुंबिळे वरी ॥ अंगणांत पडलांच अवचित दासि आल्या बाहेरी ॥ कर पाहुन विराचा लगबग दुति तेथुन धांवती ॥ सदनीं सुलोचनेच्या वर्तलें वर्तमान सांगती ॥ चा० १ ली ॥ असा शब्द ऐकुन दासींचा, घाबरी उठे मुखचंद्र उतरला तीचा ॥ वाहला घर्म सीतळ चंदन अंगीचा ॥ शृंगार युक्त सदनीं कन्या शेषाची ॥ चा० २ री ॥ ती केवळ बिंबाधरी सुवर्ण वर्णी ॥ सतेज पणें दिसती ते मुक्त घोस कर्णी ॥ घाबरी राजबाळा पति सुतादि स्मरणीं ॥ कर्दळी जशी पडली ती वायुवेगें धरणीं ॥ सुमनकळी चौफयाचि तशी चिद्रत्नाची खाणी ॥ क्षेमरुप पति असोंत दुतेंशी बोले मंजुळवाणीं ॥ अ० क०॥ सुलोचना! वेल्हाळी रांजा इंद्रजिताची राणीं ॥ सदनीं असतां सुखें अंगणीं पडला भ्रतारपाणीं ॥ १ ॥ निकट सुवेळाचळीं राहिले रघुनंदन येउनी ॥ सीतेच्या कैवारें

असंख्य वानरदळ घेउनी ॥ बहुतापरि रावणा करितसे मंडोदरि विनवणी ॥ किर्ति तुह्मी महिमंडळीं करावी सीतेला देउनी ॥ अशा प्रकारें करुन तयेने दशकंठा बोधिलें ॥ गर्वाबळें रावणें सतीचें नाहि वचन एकिलें ॥ ॥चा० १ ली ॥ कुंभकर्णादिक आपुलें कुळसमग्र बुडविलें ॥ अतिकाय देवांतक रणीं पाडिले ॥ आज युद्धा स्वामी समरांगणागेले ॥ हि पंचांगुलि मुद्रिका मंडित भुजदंड कीर्ति शोभलें ॥ चा० २ री ॥ आज युद्ध समुद्रीं जहाज माझें बुडालें ॥ सौभाग्य कल्पतरुचें रोप मुळीं आहळलें ॥ उचलोन सुलोचनेसी त्या सख्या सांवरिती ॥ भुज आलिंगून न्हदयीं आक्रंदे सुशीला सती ॥ स्वामिच्या पदीं असली जरि माझि चित्त वृत्ती ॥ तरी लिहून दे मजला कैसे पडले प्राणपती ॥ मग आणुनया पुढें ठेविलें भुजपत्रा उकलुनीं ॥ वर्तलें वर्तमान लिहितसे भुज घेउनया लेखणीं ॥ सुलो० ॥ २ ॥ मनि आणुन जयाशा होम करीं मी एकांती जाउन ॥ ऐक शेषकन्यके निघाला अग्नी तुन स्यंदन ॥ शत्रू आले त्या स्थळीं समय फलप्राप्तीचा जाणुन ॥ आराध्यदैवत क्षोभविलें वर चंडशिळा घालुन ॥ सगळि नकी उतरून बुडालो तिरा समिप येउन ॥ असेंच झालें प्राणवल्लभे तिथें अम्हा लागुन ॥ शत्रुनीं साधिलें वैर बहुतेक पाडिलें रण ॥

प्रारब्धाची दशा चुकेना भोग भोगिल्या विण ॥ चा०
१ ली ॥ जय झाला पारखा आम्हला दिसे ॥ वाढला
पराक्रम शत्रूचा राजसे ॥ त्या सौमित्राचे शरबळ बहु
होतसे ॥ ती धनुर्विद्या आगळी पाहुन ॥ शिर दिधलें
त्यासी संकल्प उचित करून ॥ चा ० २ री ॥ त्या
लक्षुमण वीरें निराहार व्रत केलें ॥ सागर उतरुन येता
शिरदान तया दिधलें ॥ धड रणीं राघव चरणीं शिर
नेउन समर्पिलें ॥ या सौंसाराहूनी सुख रामपदीं दिसलें
॥ म्हणुन भुज धाडुन तुजला बोलाऊं पाठविलें ॥
शिरीं पत्र वंदून आपण वाचि शेष नंदिनी ॥
भोंताल्या उभ्या सख्या ऐकती निवांत निश्चळ मनीं ॥
सुलो० ॥ ३ ॥ भुज घालुन शिबिकेंत आश्विनीवर
आपण बैसुनी त्वरें ॥ प्रवेशली लंकेंत घेउन पत्र पति
शोकांतरें ॥ सर्व चिन्हीं विपरीत देखिली स्नुषा आपुली
दशकंधरें ॥ परम घाबरा मनीं पुसतसे त्रिजला अति-
आदरें ॥ कां आलिस या ठायिं सांग हो इंद्रजीतसूंदरे ॥
लिखित पुढें टांकितांच वाचतो लंकाधिश आदरें ॥
लिखित समग्र वाचिलें इंद्रजित रणीं परत्र पावला ॥
जाइन मी त्या सवें निशाचरपति आज्ञा द्या मला ॥ चा०
१ ली ॥ असें एकुन दशवदन ममतेनें गहिवरला ॥
म्रात्तिका लंकानाथ घेउन आपुलें करीं ॥ घालितसे

दाहि मुखांतुन ते अवसरी ॥ इंद्रजिताची वार्ता ऐकुन मंडोदरी ॥ आलि लगबग धाउन गुणसरिता ॥ मूर्छागत धरणी वर पडली ॥ वक्षस्थळ पिटुनिया शोक करितसे मया सुराचीबाळा ॥ म्हणे इंद्रजिता सुकुमारा ॥ चा० २ री ॥ तव सामर्थे घातले रावणें देव बंदि सकळां ॥ ऐंशी सहस्र साऱ्या रावण कुटुंबाच्या आबला ॥ शोक करिति एक सेरें समजाविति मंडोदरिला ॥ म्हणे सुलोचना श्वशुरा शिरा आणुन द्या मजपासी ॥ पति माझे वाट पाहती भेटेन जाउन त्याशी ॥ ऐकतां असे चढला अति कोप रावणासी ॥ आज युद्ध करिन निकरें त्याराम सौमित्रासी ॥ मारुन त्यादोघांशी शिर आणिन लंका भुवनीं ॥ असें नहोय तरीं मी जाइन पुत्र पंथ लक्षुनीं ॥ सुलो० ॥ ४ ॥ सुलोचनेसी बोलतसे मय कन्या तेवेळीं ॥ शिरं मागुन घ्यावया मायतू जाय सुवेळाचळीं ॥ दुःखामधें सुखें ठेवी मस्तक श्रीरामपदकमळीं ॥ कौसल्ये सारिखी पर स्त्री ज्यासि सिता वेगळी ॥ नळ नीळ जांबुवत मारुति सुग्रिव वळी ॥ ज्ञान सिंधु बिभिषण राखिल पाठ तुझी ते स्थळीं ॥ मंडोदरि बोलता आलें त्या सुलोचनेच्या मना ॥ सुवेळेस जावया मागते सति आज्ञा रावणा ॥ चा० ॥ १ ली ॥ धी म्हणे मग जरी

ठेविल तुज साराखि अंगना ॥ तरि काय करावा विचार तेथें आम्हीं ॥ म्हणे सती परस्त्री आभिलाषा च्या श्रमीं ॥ कल्याण कोण पावला अशा अनुक्रमीं ॥ अधोवदन रावण म्हणे तूं आवश्य जाई ॥ उतरून घेतिल्या सर्व सृष्टिच्या रक्षा ॥ ती सुवर्ण लंका नगर उपेक्षुन गेली ॥ दृष्टि देखिले रघुनंदन कमलदलाक्षा ॥ चा० २ री ॥ सति पाहुन कपि हर्षे सांगती रामा जवळी ॥ रावणे जिवीं भय धरुनी धाडिली जनक बाळी ॥ श्रीराम वानराशी बोलतसे त्याहि वेळीं ॥ रावण जिवंत जंवतो तव सिता तनू कवळी ॥ न पडेचि कदा तुमच्या दृष्टिला कदा काळी ॥ राम पाहे बिभाषणा कडे शेषात्मजेस पाहुनीं ॥ तव जलधारा स्रवती बिभषण सदगदीत आपुले मनीं ॥ सुलो० ॥ ५ ॥ मित्रकुळ मुगुट मणी बिभीषण म्हणे अहो रघुराया ॥ परम पवित्रा सुचळ सती ही इंद्रजिताची जाया ॥ गहन गती कर्मीची नलागे उष्ण जिच्या पाया ॥ ती आली यास्थळीं जानकिकांता शिर मागाया ॥ राम म्हणे अहि हिच्या पतीचें शिर आणिलें याठाया ॥ वर्तमान तुज कैसें कळलें सांग अम्हा सकळां या ॥ सती म्हणे भुजेने पत्र लिहुन दिधलें ॥ दाऊन पतीची भुज पत्र राघवा पुढें टाकिलें ॥ तें पाहुन कपिवरा असत्य सर्व भासलें ॥

चा० १ ली ॥ आश्चर्य करिति सर्व अपुल्या अंतरीं ॥ लिहिलें पत्र कैसें निर्जिव करीं ॥ ही आपुल्या पतिचें शिर हांसविल जरी ॥ राम ह्मणे हिचा महिमा न वर्णवे वाचे ॥ कांही एक समयीं येथें करील जेंव्हां ॥ सुग्रिवें तात्काळ सतिपुढें शिर आणिलें तेंव्हां ॥ उत्तरीय वस्त्र आथरून वर बसलि जेंव्हां ॥ चा० २ री ॥ विनवि शिरास पतीच्या वाहूनि प्रिति सुमनें ॥ पतिव्रता धर्म माझा कपि सुरांस दाखविणें ॥ तुम्हि हास्य करा एकदां स्वामी निर्जीव वदनें ॥ निर्जरां माजि बरवें होईल कीर्तिजेणें ॥ संतोषरूपें मजला रघुनंदन धन्य म्हणे ॥ मनसी विनोद नाना परिचे करिता एकांत स्थानीं ॥ आज कां क्रोध मना मधें धरिला स्वामि म्हणोनी तुम्हीं ॥ मुलो० ॥ ६ ॥ करुणा विनोद दावि पतीला तनया भोगेंद्राची ॥ कीं होम विध्वंसिला क्रशता मनिं धरिली त्याची ॥ रामरुपा पाहुनी लागली गोडी सायुज्याची ॥ खुंटलें बोलणें उपाधी तुटलि जन्म मरणाची ॥ मी एक चुकलें आणिलें साक्षासि पिता ॥ तरी होतें बहुबरें असा शब्द ऐकतां ॥ सव्य नेत्र उघडुन शिर हसलें खदखदां चा० १ ली ॥ ह्याशब्दें शिरकां हसले कपि बोलती ॥ म्हणे राम शेष हा तोच सुमित्रासुत ॥ त्या श्वशुरें मज मारिलें म्हणोन हंसलें शिर ॥

कीं ज्ञाननेत्र उघडून पाहिलें मजला ॥ म्हणे शेष तुम्हि सीते साठीं वृक्ष आलिंगिलें ॥ चा० २ री ॥ आणुन आमृत बरवें उठविन शीरास वहिलें ॥ ऐकतां अशा गोष्टी वानर मनिं गजबजले ॥ प्रभू लागि विचारीतां शिर द्यावें असें ठरलें ॥ मग जाउन सिंधुतिरी विस्तीर्ण कुंड रचिलें ॥ लंके कडे वीर कोणी आज धाडू नका वहिलें ॥ त्या धर्म शिळे वरती शिवध्यान हृदयिं धा:लें ॥ वरजोत निवुन गेली धड कुंडामधें पडलें ॥ इंद्रजिता सरशी जाउन बैसली स्वर्ग विमानीं ॥ हे नाजी वाळ म्हणें धन्य ही सती रत्नाची खाणी ॥ सुलो० ॥ ७ ॥

गाणें ३५ वें, सुलोचना.

चाल (कोठें तुझे पंचपती दाखवी मला ॥)

सर्व सत्ताधीश प्रिये होतो मीं जगीं ॥ मम शौर्ये सूरनाथ ऱ्हदयीं धगधगी ॥ पराक्रमी मीं इंद्रजित जिंकिलें मला ॥ आ० क० ॥ तपा भंग करुन प्रिये वधियले मला ॥ ऐनवेळि प्रीयकरे नाश जाहला ॥ तपा० ॥ १ ॥ जय आशा धरुन मनीं हवन मांडिलें ॥ अग्नीतुन रथ अश्व मज लाधले ॥ फलप्राप्ती समय परी शत्रु पातले ॥ आराध्य दैवत क्षोभउनी उठविती मला ॥ तपा० ॥

॥ २ ॥ राणीं दारुण झुंजुनिया अपेश घातले ॥ तव
पिता लक्ष्मणें मज मारिलें ॥ सुकुमारे शेषतनये राम
जोडला ॥ तपा० ॥ ३ ॥ लक्ष्मणें रामचरणीं शीर
अर्पिलें ॥ तुजसाठीं तिष्टतसे शरिर बीमलें ॥ मम
वृत्त कळविण्यास पाणि योजिला ॥ तपा० ॥ ४ ॥
येई येई वल्लभे तुं भेट लौकरी ॥ दिनानाथ चापपाणि मित्र
तो करी ॥ अविलंबें येउन प्रिये सूखवी मला ॥ तपा०
॥ ५ ॥ भूज लिखिता घेउन करी सर्व वाचिलें ॥
धरणीवर अंग टाकि अश्रु लोटले ॥ शांतविती सर्व
सख्या काय जाहलें ॥ पति गेले परलोकीं त्यजुन या
स्थळा ॥ तपा० ॥ ६ ॥ त्यजुनीया सर्व सौख्य सती
चालली ॥ श्वशुराचे चरण नमुन भूज दाविली ॥ जातें
मी शीर आणू राममंडळी ॥ आज्ञा तीं द्यावि मजसि
जाते सुस्थळीं ॥ जाऊं नको सुलोचने कपिमंडळा ॥ तपा०
॥ ७ ॥ रघुवीर दिनानाथ कोमल मनीं ॥ देइल तो
शीर मला राम विरमणी ॥ त्वरित आली प्रभुचरणी
कर जोडुनी ॥ पतीशीर देइ मला भक्तवत्सला ॥ तपा०
॥ ८ ॥ अयुध्या धीश म्हणे शीर द्या सती ॥ वान-
रगण म्हणति सर्व प्रचित दाविती ॥ शिर हसवुन
दावि अम्हा जाय पूढती ॥ घेउन शिर अंकावर काय
बोलेतां ॥ प्राणपती ब्रीद रक्षा दुःखि अबला ॥ तापा०

॥ ९ ॥ प्राणनाथ हास्य करा उशिर जाहला ॥ रुस कां मजवरती नकळेचि मला ॥ ममपिता साह्य जरी जय लाभला ॥ गदगदून शीर हंसे नवल कपिकुला ॥ तपा० ॥ १० ॥ लक्षुमणा फार मनी दुःख जाहलें ॥ सती गेली सुलोचना कवित संपलें ॥ द्वारकाही कर जोडुन नमित रविकुला ॥ तपा० ॥ ११ ॥

गाणें ३६ वें, चंद्रसेना.

प्रताप सागर। रूप मनोहर। चंद्र तुल्य वदना० ॥ स्वरुप सुंदरा पाहुनि लज्जित मनि होइक मदना ॥ नीरद कुंदर कांति जयाची अति सुंदर वदना ॥ कमल लोचना भव मोचना पूर्ण सौख्यसदना ॥ धीर वीर मस्तकी हिरा राम धनुर्बाणी ॥ अ० क० ॥ गवाक्षद्वारें भुवनीं पाहे रघुविर वीरमणी ॥ चंद्रसेना जाया सुंदरी अहिरावण रमणी ॥ ग० ॥ १ ॥ कामाकुल तें चित्त जाहलें पाहुन या राम ॥ जन्मोजन्मीं पतिअसावा ऐसा विरराम ॥ तव स्मरणानें कांहि सुचेना जिला गृहकाम ॥ मोहे रात्र दिवस तयांचें स्मरतसे नाम ॥ कंठ सदगदित वाहे जीच्या नेत्रि सदा पाणीं ॥ गवाक्ष० ॥ २ ॥ मारुति जाउन तिच्या मंदीरीं पुसे सर्व कान ॥ सत्य वचन

तूं सांग संकटी पडला रघुराज ॥ अहिरावण वध सत्य सांगुनि सुखवावें आज ॥ यादासाची दया करूनी रक्षावीं लाज ॥ सति मग बोले ऐक मारुती वदे सत्य-वाणीं ॥ गवाक्ष० ॥ ३ ॥

गाणें ३७ वें, चंद्रसेना.

(चाल दैवयोग दुर्विपाक जाशी.)

दुष्टभ्रमर त्वरित येउनि मंचक कोरिला ॥ रामचरण स्पर्श तांच भंग जाहला ॥ अपशकून गणुनि राम मागे मुरडला ॥ अ० क० ॥ कपट करुन रामें कसें फसविलें मला ॥ निमित्त मात्र येउनि राम मम सद नाला ॥ क० १ ॥ कपटि कपी मारुति हा येउन भेटला ॥ पतिमृत्यू कथन करुन सर्व घेतला ॥ राम प्राप्ति करुन देइन सत्य बोलला ॥ असत्य वाणि वदुन कार्य भाग साधिला ॥ कपट० ॥ २ ॥ मम चित्त राम चरणि दृढ लागलें ॥ पूर्व सुकृतें आज नयनि दिसति पाउलें ॥ आनंदात मग्न असतां कर्म ओढलें ॥ राम चरणि चित्तवृत्ति ध्यास लागला ॥ कपट० ॥ ३ ॥ कोपयुक्त चंद्रसेना बोले वचन ॥ शापुन भस्म करितें रवीकुल भूषण भयचकित ॥ होउन राम

काय बोलिला ॥ कपट० ॥ ४ ॥ राम बोले चंद्रसेने ऐक सुंदरी ॥ कृष्ण आवतारि तुजसि वरिन मी जरी ॥ घेईभाक कोधानल शांत तूं करी ॥ रामचरणि कृष्णा लीन असे सर्व काला ॥ कपट० ॥ ५ ॥

गाणें ३८ वें, तुळशीपत्र.

चाल (जो चिदानंद आनंद कंद त्या.)

जो परब्रह्म श्रीराम मंदिरी सुंदर कमलेला ॥ तो रंजवितो तिजला ॥ जनकजा मधुर भाषणें आनंदित करि बहु रामाला ॥ परि अंहकार झाला ॥ म्हणे जगीं अन्य मजविणे लीन पतीच्या चरणाला ॥ प्रियतमा न कुणि विमला ॥ चं० ॥ अंतरीं कळुन राघवें ॥ होरा० ॥ मनदूत धाडिगौरवें ॥ होगो० ॥ नारदा कथुन माधवें ॥ होमा० ॥ झालि भेट घेउन बैसता बहुत फळभार सुमन माला ॥ अ० क० ॥ युक्तिनें गर्व हरिला ॥ जो कृपावंत धीमंत संत ज्या नमिति पादकमला ॥ यु० ॥ १ ॥ तो राघव सुत भेटीस आला आला जानकी दर्शनासी ॥ अर्पिलें सकळ तिजसी ॥ झालि हर्ष भरित पाहुनी निरोपीयलें सेवकासी ॥ देखिल्यां सुमन राशी ॥ एक सुमन सहज हुंगिता धरी रघुराज निमित्तासी ॥ कळविलें

नारदासी० ॥ चा० ॥ नित्य नैमित्तिक तुळसिला ॥ होतु० ॥ वंदिता पदर लागला ॥ होला० ॥ एक-दळ तुटलें तीजला ॥ होती० ॥ करि दोषि द्वादशी दिनी शास्त्र बोलुनी निषिद्धाला ॥ युक्तिने० ॥ २ ॥ झालि ब्रह्मघातकी क्षिता अन्न नच योग्य हिच्या करिंचें ॥ असे शब्द ब्रह्ममुनिचे ॥ पडतांच श्रवाणीं राघवें वंदिले पाय नारदाचे ॥ मावळें हास्य मुखिचें ॥ करी पवित्र मम कामिनी काढवी सूत्र शास्त्रविधिचें ॥ पारणे फेड जिविचें ॥ चा० ॥ निज सत्व बळें मागती ॥ होमा ० ॥ जरि होय पान जडविती ॥ हो ज० ॥ निर्दोष होइल ही सती ॥ हो स० ॥ ऐकता हर्षली मनी थोर आधार तिला दिसला ॥ युक्तिने० ॥ ३ ॥ निःशंक जानकी मनीं जाउन उभी वृंदावना ॥ आळविलें कमलवदना ॥ अवलोकनार्थ पातेल सर्व लोक आणि बहुत ललना ॥ मुनि संहीत जगजीवन ॥ जरि सत्व रक्षिलें असे तरी हें पान जडो वसनी ॥ करि दोष मुक्त जननी ॥ चा० ॥ नच हाले पान तेथुनीं ॥ होते० ॥ झालि खिन्न राज कामिनी ॥ होका० ॥ आवमानुन नारदमुनी ॥ होमु० ॥ बाई आपुली जरि चुक असे करी प्रार्थना रघुविराला ॥ युक्तिने० ॥ ४ ॥ गेला गर्व सर्व अभिमान झाले मी

लहान जनकबाळा ॥ जलनेत्रें पाहे रघुविमला ॥ तो चापपाणि तिजह्मणे हास्य करुनिया मुखकमला ॥ जा शरण नारदाला ॥ वंदिता मुनींचें स्मृतीत्वां कधीं पुष्प सुवासाला ॥ घेउलीं सांग मजला ॥ चा० ॥ ह्रीनुकी गाळुनी सती ॥ होस० ॥ पुनरपी होय प्रार्थिती ॥ होप्रा० ॥ तरि पानजडे आवाचिती ॥ होआ० ॥ जो त्रिभुवन सुंदर राम मदादिक हरुन दावि लीला ॥ युक्तिनें० ॥ ५ ॥

गाणें ३९ वें, राम.

चाल (कुणाला बाई सांगु अता०)

अयोध्यापुरी जन्मचि झाला ॥ पावन केलें सुर्यवंशाला ॥ अजापाळ पुत्रवानं झाला ॥ प्रणिली गुण निधान ॥ भूमि बाळा ॥ प्र० ॥ अ० क० ॥ देखिलें मी सुंदर रामाचें ध्यान ॥ मना बहू समाधान ॥ वाटतेहो ॥ म० ॥ दे० ॥ ७ ॥ कोमल चरणांबुज दाखियली ॥ जेथुन जान्हवी प्रगट जाहली ॥ जडित मेखळा कटी शोभली ॥ पीतवसन घनशाम ॥ प्रभूहा ॥ पी० ॥ देखिलें ॥ २ ॥ स्वकरीं शोभे धनुष्यबाण ॥ एकपत्निव्रत आहे निर्वाण ॥ सुहास्य वदन कमललोचन ॥ भ्रुकुटी असति कमान ॥ प्रभूच्या ॥ भ्रु० ॥

देखिलें ॥ ३ ॥ मकराकृति हीं कुंडलें श्रवणीं ॥ भासे जडले शशी आणि तरणी ॥ मुगुटशोभा झळके वदनीं ॥ सनकादिकांचें ध्यान ॥ प्रभूहा ॥ स० देखिलें ०॥ ४ ॥ मूर्ति पाहुनी तन्मय झालें ॥ देहभाव हा सर्व विसरलें ॥ प्रभुपादि मस्तक दृढ ठेविलें ॥ दावि दावी निज स्थान ॥ रमाला ॥ दा० ॥ देखिलें० ॥ ५ ॥

गाणे ४० वें, राम.

चाल (वैशाख मास वासं०)

वीजाति हीन कूल हिंन होती भिल्लिणी ॥ राम प्राप्ति व्हावि म्हणुनातिनें बोरे तोडुनी ॥ रामचंद्र दयाघन तिचीं बोरें भक्षुनीं ॥ शबरीनें केलें पहा राम साधना ॥ अ० क० ॥ श्रीराम राम रामनाम जपकरी मनां ॥ चौऱ्यांशी लक्षयोनि चुकेल यातना ॥ श्री० ॥ १ ॥ कपट वेष धरुन इंद्र अहिल्येस भोगुनी ॥ ऋषि शाप देतां शिळा सती झालि तेक्षणी ॥ रामचरणरज लागतांच दिव्य होउनी ॥ उद्धरली अहल्येस बसुन वीमानां ॥ श्रीराम० ॥ २ ॥ वालि मर्दुन सुग्रिवास राज्यीं स्थापिलें ॥ तारेसी सुखधाम राम ज्ञान बोधिलें ॥ लंकेचें राज्य दिलें भक्त विभीषणा ॥ श्रीराम० ॥ ३ ॥ मज काय

घालुन उद्धरसी राम रघुपती ॥ मन चंचल हें विषय सदा भज न आवरती ॥ सितादासि नमिते तुला हेंच मागती ॥ दर्शन दे जानकि पति पुरवि कामना ॥ श्रीराम० ॥ ४ ॥

॥ ९ ॥ गाणीं श्रीकृष्णाचीं.



गाणें, १ लें, गवळण.

खेळलासि गोपी संगेरे, तूं श्रीरंगा ॥ घेतलीस नाना सोंगेरे, तूं श्रीरंगा ॥ रास स्थळीं क्रीडा रंगेरे, तूं श्रीरंगा ॥ चा० ॥ मिळुन गोपाळ वत्स आणि गाई

वनाप्रति जाई, उठी लवलाही, नंदाचे नंदा ॥ अ० क० ॥ बालमुकुंदा ॥ भुलविशी गवळण राधा ॥ बा० ॥ १ ॥ जन ह्मणति तुला गोपाळा, धाकुटया बाळा ॥ बांधिलें हरी तुज उखळा, अशाने सकळा ॥ पुतनेच्या शोपुनज्वाळा, झालास काळा ॥ चा० ॥ हरि कृपाळु पूर्ण जनाच्या, ओढि भवाच्या, पुरविसि आमुच्या, आणि एक छंदोर ॥ बाल० ॥ २ ॥ यमुनेच्या तिरासी गेला, डाव मांडीला ॥ सारे गोपाळ एका फळिला, आपुण एकला ॥ चा० ॥ संगे घेउन विटी आणि दांडु, भोवरा चेंडु, लगोऱ्या मांडु, संगे घेउन पेंदारे ॥ बाल० ॥ ३ ॥ आवतार यदूचे वंशी, तूं धरिलासी ॥ मनमोहन गोपिविलासी, तूं जाहलासी ॥ चा० ॥ कवि राय यशवंताच्या, पूर्ण कृपेच्या, गुरुरायाच्या, संन्निधारे ॥ बाल० ॥ ४ ॥

गाणें २ रें, गवळण.

ऐकुन शब्द तुझ्या मुरलीचा, विसरलें गृहधंदा ॥ एक ह्मणो कुणि दहा ह्मणो कीं तुजसी राजी निंदा ॥ अ० क० ॥ भेटुन जाइरे मुकुंदा ॥ मुरलि घाली मोहाच्या गळि फंदा ॥ भे० ॥ १ ॥ जरका माझे नांव नाहिं

माहित, मजसी ह्मणती वृंदा ॥ एकदा तरि गृहिं यावें माझ्या, प्रेमे जडल्या संदा ॥ भेटु० ॥ २ ॥ जर कां माझे घर नाहिं माहित, राहते मथुरा वृंदा ॥ सूर्यसन्मुख फाटक माझे प्रभुजी आनंदकंदा ॥ भेटु० ॥ ३ ॥ सर्व सख्या या गार्ग क्रमीती, त्या मधे राधा उमदा ॥ सूरदास प्रभूदर्शनिं धावें प्रभुजी आनंदकंदा ॥ भेटु० ॥ ४ ॥

गाणें ३ रें, गवळण.

चाल (राहिंना गोविंद राधे०)

भयें लपलासी कोठें, म्हणुन नकळे आम्हातें, कोण कुणाचा तूं असती, आनवर होसी भारी ॥ अ० क० ॥ नको पदरासी धरूं, अम्ही व्रजवासी नारी ॥ १ ॥ सये कसलागे धीट, याचि मोठी कटकट ॥ दिन रजनीं असे लपुन उभा द्वारी ॥ नको० ॥ २ ॥ नंद योशेदसिहा, लाविलासि डागकां ॥ मत्सदनीं येशिल तरी, म्हणति काय सांरी ॥ नको० ॥ ३ ॥ राजारामि लीन कीं, होई प्रासादिक सोंडी पटा ॥ हटा नमीतसे पूतनारी ॥ नको० ॥ ४ ॥

गाणें ४ थें, गवळण.

चाल (लंकापुरी, पु०)

अम्ही गोकुळिच्या, गोकुळिच्या व्रजनारी ॥ करुन शृंगार कळाकुसरी ॥ भरुन नवनीत, नवनीत घेउन शीरी ॥ हटा जाता मथुरा नगरीं ॥ तुझी. नटनाटक, नाटक श्रीहारी ॥ दान मागे धरुन पदरीं ॥ चा० ॥ मस्कऱ्याकरितो ॥ येउन पदरीं झोंबतो ॥ भलभलत्याचेष्टा करितो ॥ करितो याकाळीं ॥ अ० क० ॥ मार्गी करितो धुमाळी ॥ यशोदे तुझा, तुझा वनमाळी ॥ मार्गी ० ॥ १ ॥ संगे गोपाळ, गोपाळ गढी घेतो ॥ उठुनि मध्यरात्रीं येतो ॥ सारे नवनीत, नवनीत गोरस पींतो ॥ शिरीं तक्रा लवंडीतो ॥ चा० ॥ कारितो चेष्टा, यशोदे तुझा कारटा, आडवितो गवळणी श्रेष्ठा ॥ श्रेष्ठा याकाळीं ॥ मार्गी० ॥ २ ॥ जळो गोकुळची, गोकुळची वस्ती ॥ कितीसोसावि जबरदस्ती ॥ जांडदे उलथुन, उलथुन याचि मस्ती ॥ राज्यीं कौंसाच्या स्वस्थीं ॥ चा० ॥ येथुन अम्ही जाऊं, कौंसाची मथुरा पाहूं, सुखवस्ती तेथें राहूं, राहूं या काळीं ॥ मार्गी० ॥ ३ ॥

गाणें ५ वें, गवळण.

चाल (गधा रुसली सु०)

पहिली गवळण रंग सफेत, जशि चंद्राची ज्योत ॥ गगनीं चांदणी लखलखित, ऐकातीची मात ॥ मंथन करीत होती दारांत, धरुन कृष्णाचाहात ॥ ऐशा आल्या त्या घटूनीं ॥ अ० क० ॥ आल्या पांच गौळणी ॥ पांचा रंगाचा शृंगार करूनी ॥ १ ॥ दुसरी गवळण साळी भोळी, हळदीहुन पीवळी ॥ पिवळा पितांबर नेसूनी, अंगिबुटयाचीं चोळी ॥ वयलहान तनू उमर कवळी, जशि चाफ्यांची कळी ॥ ऐशाआ० ॥ २ ॥ तिसरी गौळण रंग काळा, नेसुन चंद्रकळा ॥ काळें काजळ लेउन डोळां, रंग तिचा सांवळा ॥ काळी गळसरी लेउन गळां, आली राजस बाळा ॥ ऐशा आ० ॥ ३ ॥ चौथी गौळण रंग लाल, भांगी भरी गुलाल ॥ वदनीं तांबूल रंग लाल, डाळिंबाचें फुल ॥ ऐशा आ० ॥ ४ ॥ पांचवी गौळण हिरवा रंग, आवघ्या झाल्या दंग ॥ हिरव्या कंकणाचा हिरवा रंग, आरशांत उजळें भिंग ॥ फुगडी खेळतसे कृष्णा संग ॥ एकनाथ अभंग ॥ एशा० ॥ ५ ॥

गाणें ६ वें, गवळण.

कोणे एके अवसरीं, ती व्रजनारी, यमुने तीरी, पाण्या गेली ॥ पुढें जात होत्या सुंदरा त्यांस बोलली ॥ ह्मणे सुंदरी, तुह्मि व्यभिचारी, भ्रतार घरीं, सोडुन हरिशी रात्र क्रमिली ॥ मग त्यानीं सुचना हरिशी जाणविली ॥ हरि समजावी त्या सकळांस, जा सावकास, उद्या तुम्हांस कळेल ही वार्ता ॥ अ० क० ॥ नउभ्रतार करिन तुम्हा देखतां काय चिंता ॥ गोकुळवासी त्या श्रीहरिसी हट गौळणिसी पडला होता ॥ नउ० ॥ १ ॥ आला पाडवा आनंद सण ॥ वर्षाचा दिन, त्या रात्रिसी ॥ कवतूक काय झालें त्या दिवशीं ॥ बैसली होति सुंदरा, गलि माहेरा, नपुसता घरा, भोजनासी ॥ ऐकून मातेचें वचन चढे कोपाशी ॥ गोकु० ॥ २ ॥ अशी संधी पाहुन बरी, तो श्रीहरी, माया धरी बहुविषेश ॥ रुप धरिलें तिच्या भ्रताराचा वेष ॥ अंगि मातीचे वण, दाम घेउन, वाम नयना मधें बडस ॥ शिरि घालुन चक्री माथा कुरळ केश ॥ क्रमरेस काचा, प्रत्यक्ष तिचा, वर गौळणिचा दिसेपुरता ॥ हाति अकरा कडयाचा लठ्ठ घेउन करि वनिता ॥ गोकु०

॥ ३ ॥ तोतिकडे तिच्या भ्रताराने, नेउन गोधनें घरीं आला ॥ म्हणे ही दिसेना कुठे पुसे मातेला ॥ माय म्हणे तुझी सुंदरा, गेलि माहेरा नपुसता घरा भोजनासी ॥ ऐकून मातेचे वचन चढे कोपासी ॥ न लागे झोप नयनीं, खोंचला मनीं, अरुणोदय होता ॥ तो गेला सासुच्या घरि धुंडिता ॥ गोकु० ॥ ४ ॥ त्या सखीने, शेज सुमनें पतीकारणें तयारकेली ॥ चंहुकेड च्यार समया हौस उजळली ॥ वेळा लवंगा चिकणसुपारी पान गंजिरी तबकामधिं भरलीं ॥ जवळ झारि उदकाची भरून ठेविली ॥ हरि यादव आले पलंगी विलास भोगी तो व्रजसूत ॥ चार प्रहर रात्र क्रीडा करित ॥ गोकु० ॥ ५ ॥ उग्र रूप धरूनीं गेला, तिच्या माहेरा दारि सासरा बसला होता ॥ ह्मणे नमस्कार मामाजी संतोष चित्ता ॥ सन्मानिला, पाटि बैसला तोषली कांता ॥ मग हर्षली सासु धन्य ह्मणे भगवंता ॥ आळशावर गंगा आली दिशा उजळली साहित्यें केलीं अन्न पदार्था ॥ मग स्नान करुन भोजना गेले दिन असतां ॥ गोकु० ॥ ६ ॥ ह्मति मकरा कडयाच्या लड्डु, शरीरीं पुष्ट शब्द उद्धट बळें उच्चारी ॥ तो गरगर डोळे फिरवि सासऱ्या वरी ॥ ह्मणे लाज नाहिं तुह्मास जेवणासिसें आणिलित तिस

तुमची सत्ता ॥ घरी कष्ट कराया कोण वृद्ध ही माता ॥ गोकु० ॥ ७ ॥ मग तो सासरा खोचि अंतरी जाउन मंदिरी पुसे सुंदरी घरी हा कोण ॥ याच सारिखा दारी दुसरा नाहीं भिन्न ॥ मग तिन दोघं केली जागृत होउन लज्जीत बोले तेक्षण ॥ मग हरिन अंतरी जाणली खुण ॥ एक शेजवरी, दुसरा दारी निघा बाहेरी करा समजूत ॥ हाति अकरा कडया चालह्न घेउन पुसे वनिता ॥ गोकु० ॥ ८ ॥ अरे तूं कोण घरा जाउन तूं कां आणिली माझी नवरी ॥ सोडि हिजला मगमी धाउन धरितो पदरीं ॥ ओढिती एक मेक तिच्या पदरा आवचित चवथा ॥ पहा कवतुक काय झालें आतां ॥ माझी माझी म्हणे पांचवा आवचित साहवा तो एक सातवा तिथें येउनी ॥ आठव्या नवव्यानें धरिली सुंदर वेणीं ॥ गोकु० ॥ ९ ॥ ओढिती आपणाकडे उलथुन पडे सखी ती धरणी ॥ आनंदे कवतुक पाहती व्रजबाळा गवळणी ॥ म्हणे गौळणी अजुन तरी हरिशी धरी दृढचित्ता ॥ तोविघ्नानिवारी हरेल तुझी ही व्यथा ॥ गोकु० ॥ १० ॥

गाणें ७ वें, गवळण.

मथुरे हटासी चालल्या गौळणी ॥ दहीं दुध घेउनी

शिरीं ॥ हरी भेटेलग भेटल वाटेवरी ॥ तोधरिल मसीं पदरीं ॥ आमचे दानदे दानदे गूजरी ॥ असे बोलती सुंदरा ॥ अ० क० ॥ चल दुरहो रे दुरहो मुरलीधरा ॥ दिवसगेला जाउदे घरा ॥ १ ॥ तूं बाळरे गवळ्याचा नंदन ॥ तुझि गुरख्याचीं लक्षण ॥ तूं सांबळा मी गोरी पद्मिण ॥ तुझं मांझ कैंच बन ॥ चल० ॥ २ ॥ तुझ्या गजन्यानें फाटेल माझी साडी ॥ तुटेल माझि पंचलडी ॥ तूं मजसीग बोलु नको बोबडी ॥ तुझ्या शिरिची उतरिन दुडी ॥ चल० ॥ ३ ॥ मीं सांगेन रे सांगेनि नंदापासी ॥ तिथे जाव काय-तूं देशी ॥ एका घटकेंत रें घटकेंत उतरिन तुशीं ॥ मग अंतरि होइन खुशी ॥ चाल० ॥ ४ ॥ तुझ्या खांदीरे काळीशी घोंगडी ॥ हातिं काठीशी बाकडी ॥ तुम्हि लहान रे लहान अवघे गडी ॥ एक देइन मीं थापडी ॥ मग बळेलरे बळेल तुझी बोबडी ॥ मग उगीच जाशिल रडी ॥ चल० ॥ ५ ॥ गेलि सोन्यात सवाई मिळवुन ॥ ताशि जाहली गौळण ॥ ज्योत हिऱ्याची हिऱ्याचीं हीरकणीं ॥ जशी बैसली कोंदणी ॥ हात घालुं न को माझ्या नवसर हरा ॥ हरि हरास चित्तीं धरा ॥ चल० ॥ ६ ॥

गाणें ८ वें, गौळण.

घेउनिया मथुरे जातां । दहिं दूध घृतां ची मटकी ॥ इतक्यांत आला हाकाना, वाटेंत गोपिना हटकी ॥ आडविल्या गौळणी बाळा, नट नाटकी मोठा चटकी ॥ हारि मन मोहना सोडि, अम्हाला कोपेल सासु पूत नारी ॥ अ० क० ॥ कां छळिसी आम्हास मुरारी ॥ अम्ही व्रजवासी नारी ॥ कां० ॥ १ ॥ गोपीशि म्हणे वनमाळी ॥ तुम्ही दानद्यावे याबेळी ॥ सांवळी सगुण वेल्हाळी, राधिका आलीहरी जवळी ॥ मग बोलत से वृजबाळी ॥ मधु सुदना रळी का केली ॥ गौळण बोले श्याम सुंदरा जाऊंदे बाजारी ॥ कां० ॥ २ ॥ हा नष्ट मूल नंदाचा ॥ गृही गोरस चोरी आमूचा ॥ संगे मेळा गोपाळाचा ॥ विटआला या गोकुळीचा ॥ धीटपणा नव्हा कामाचा ॥ परिणाम बरा नाहीं याचा ॥ बोले श्रीहरी ऐकराधिके चेष्टा करिसी भारी ॥ कां० ॥ ३ ॥ गोविंद वदे राधेसी, चल जाऊं कुंजवनासी ॥ देखुनियां तव वदनासी ॥ स्मरताप होय चित्तासी ॥ मग जाई तूं मथुरेशी ॥ गोरसनें बाजाराशीं ॥ बोले राधिका गोष्ट नव्हें ही धाक पतिचा भारी ॥ कां०

॥ ४ ॥ दान देउनि श्री रंगाला ॥ चालिल्या गोपी मथुरे ला ॥ उतरुनियां नदी यमुनेला ॥ क्रय विक्रय गोरस केला ॥ परतोनि आल्या रात्रीला ॥ सत्काळ गोकुळी क्रमीला ॥ गंगा विनवी प्रभुपद कमला त्रय तापें तापली भारी ॥ कां० ॥ ५ ॥

गाणे ९ वें, गवळण.

एक गौळण निजली अशी ॥ तिच्या घरामध्ये हरीनें जाउन नकल केली कशी ॥ तिच्या तोंडाला लाविली मशी ॥ हिरवे पिवळे ठिपके देउनी गौळण केली पिसी ॥ तिचा भ्रतार होता शेजेसी ॥ दाढि वेणिसी गांठ देवुनी बळकट केसोंकेसी ॥ चा० ॥ चहुकडून दीपक लाविला ॥ सासू बोलावी सुनेला ॥ हा तस्कर कोणी कडे आला ॥ होते दुधाणे दोहों चोहों बाजूंचें त्यांत शिरला तरी॥ अ० क० ॥ दधां दुधांत विकला- हरी॥अशा गौळणी धिटा बालटा मथुरेच्या बाजारा ॥ दह्या० ॥ १ ॥ एक उठली खडबडुन ॥ दोन्ही कडे ओढिती कौतुक पाहती जन ॥ तिचा धाकटा दीर धावुन ॥ बुचडया पासुन वेणी कांपिली केले दाणा दाण ॥ चा० ॥ कडाकडा ओठ चावोनि तव म्हातारी धावली ॥

तिचवा डोळयांत धूळ फेंकिली ॥ लेकीना तिनीं दार कोंडी केली होते दुधाणे शिक्यावरी ॥ दवा० ॥ २ ॥ एक ह्मणती एक मेकिशी ॥ ह्याला बळकट बांधुन नेऊ, मथुरेच्च्या हांटासी ॥ तिथें विकुन सावकाराशी ॥ रुपेय मोहरा पैसे घेउन कवडया करूं सौदासी ॥ झाली गौळण मनांत खुशी ॥ लइ दिवसांनी हाती सांपडलें कृष्ण बाळ परदेशी ॥ चा० ॥ डोई बांधुनि घेतला छर ॥ लगबगीत पावली पहे ॥ मूल घ्या ह्मणुन करीबोभाट ॥ मुलें विकाया आली ह्मणुनि गिऱ्हाइक दारो दारीं ॥ दवा० ॥ ३ ॥ एक होती राज गूजरिण ॥ तिच्या पोटी बाळ नव्हतें ती आली धावोन ॥ ह्मणें सांग आपुल्या मुखान ॥ जितकि मामशील तितके देईन भारंमार सोनं ॥ चा० ॥ पुण्य प्रताप घे बोलुन ॥ माणीक मोती पारखून ॥ एक मुकुंदा कडिये धरिला दुसरा ह्मा शेजारी ॥ दवा० ॥ ४ ॥ तिसऱ्याचा धरिला हात जाउन हालवुनपाहं तेथें चौथे अकस्मात ॥ पांचवा होउनि रांगत ॥ खुळखुळखुळखुळ नाद उमटला मनीं जाहली विस्मित ॥ चा० ॥ एकमडके हालवित ॥ एक रुपयाला विकित ॥ टोलि दमडिला कितीएक ॥ कित्येक विकले फुकट लेकाशीं ह्मणते घ्या तरी ॥ दवा० ॥ ५ ॥

गाणें १० वें, गौळण.

म्हणे यशोदा बा गोविंदा नको जावूं परद्वाराला ॥ गौळण मुखरण जपती तुला ॥ होती एक गौळण घराचि धनीन गेली बाहेरी ॥ जावुन चढला माळया वरीं ॥ वरपाहतो शिंकीं लोंबती हात चालविले चारी ॥ सर्वा हातानें खाई हरी ॥ खावुन पिऊन दिलींढेकर शिंकी आणीलीं बाहेरी ॥ टाकिलि शेजारणिचें द्वारीं ॥ अ० क० ॥ अनंत लीला रूप सांवळा तो बाळ ब्रह्मचारी ॥ पातकें जळतीचरणावरी ॥ १ ॥ होती गौळण घरचि धनीन पाहि आल्या मंदिरी ॥ दह्या दुधाच्या फोडिल्या हारी ॥ गेली पुसाया तिये पाशी शेजारणींचें द्वारीं ॥ मांझी शिंकी, कांगे तुझे-घरी ॥ तिनें येवुन भांडण केलें आली माझ्या आंगां वरीं॥ दांत खावुन गाल कुस्करी ॥ आनंत० ॥ २ ॥ पुरुष निजले होते समया लावुन चारी ॥ कृष्ण देव गेले पलंगावरी ॥ दाढी वेणिची गांठ मारिली त्या दोघां समोरी ॥ आपण मग पळुन आला बाहेरी ॥ दचकुन उठली वेणी गुंतली झालि गौळण घाबरी ॥ आतां माझी गांठ सोडा लैकरी ॥ त्या दोघांला गांठ सुटेना

बोलाविला शेजारी ॥ त्यानें ओढित आणिली बाहेरी ॥ अवघे नगरचे लोक मिळाले तमाशा पाहती सारी ॥ गौळण गरगर गिरक्या मारी ॥ गौळी ह्मणें अगा गौळणी दाढी तुटली सारी ॥ कीं गौळी बरबर दाढी धरी ॥ आनंत० ॥ ३ ॥ घागर घेवुनि गेली पाण्याला यमुनेचे तिरीं ॥ घागर फोडी डोइवरीं ॥ गौळण ह्मणें यशोदा माते पाहि तुझा श्रीहरी ॥ माझें मुनेस मारी मंदिरी ॥ यशोदा माता झाली जागृत लावुन शुभ्र-दोरी ॥ पाळणा हालविते लौकरी ॥ रांगत रांगत गेला कौसारी देवहोते. देव्हारीं ॥ त्यानें देव गिळिले सारे ॥ तुकाह्मणे आठवावा श्रीहरी ॥ आनंत० ॥ ४ ॥

गाणें ११ वें, गवळण.

आह्मि नारि ब्रजाच्या गेलो यमुने कांठी ॥ तिथें झाल्या मुलाच्या भेटी ॥ त्यामध्यें तुझा हा पुंड मोठा जगजेठी ॥ लागतो आमच्या पाठी ॥ ओढितो पदर धरुन दानाचे साठीं ॥ बळकट धरी मनगटी ॥ चा० ॥ यानि या लैकिका ओतिलें पाणी ॥ बेलाशक ओढी दोन्ही कर धरुनी ॥ आह्मि मार्गि चालता चुंबुन गेला ॥ अ० क० ॥ तूं एक यशोदे बाई धननीळ-

मोठा. आनिवार करावें कायीं ॥ १ ॥ चोरटा असा या कुळांत पैदा झाला ॥ मूल काय ह्मणावें याला ॥ रात्रींच शिरुन घरांत दिवा मालविला ॥ हाका मारित गोपाळाला ॥ फोडून विरजणीं सारा गोरस प्याला ॥ दह्यां दुधाचा खराबा केला ॥ बांधोनि घुसळ खांबासि सासुबाईला ॥ होते पतिच्यी मी शेजेला ॥ चा० ॥ हकिमाचें मूळ पडलें बोलावें कायीं ॥ कां सोसावि याचि पुंडाई ॥ धन० ॥ २ ॥ सांगावया लाज वाटते माय तुजपांसी ॥ आम्हि गेलों होतों स्नानासी ॥ वृक्षावर चोरुन होता त्या ठायासीं ॥ उचलिलें पहा वस्त्रांसी ॥ उदकामधि तिष्ठति नारी सासुरवासी ॥ सीत लागसे अंगासी ॥ कात्यायनि व्रत त्या दिवशीं ॥ चा० ॥ घरिजाता उशिर लागला पुसतिल सारी ॥ मग उत्तर देतां लज्जित आवध्या नारी ॥ धन० ॥ ३ ॥ गोपिंची गाऱ्हाणीं ऐकून सारीं ॥ मग श्रीकृष्णास हाकामारी ॥ गोरसाचें तुजला काय उणे मंदीरीं ॥ दह्या दुधाचि करिशी चोरी ॥ समजविल्या गवळयाच्यां पोरी ॥ उद्या पासून जाउनको कुणाचे द्वारीं ॥ चा० ॥ नंदाला कळेल म्हणजे भरतिल रागें ॥ गोकूळ ओसाड तुझ्या वैतागें ॥ धन० ॥ ४ ॥

गाणें १२ वें, गवळण.

चाल (काशिपुरी विश्वेश्वर दर्शन मज दे तिळका.)
गोरस मथुरेस नेता, झोंबतसे येउन हाता॥ दहि दुध नवनीत सर्व, भक्षितसे ॥ अ० क० ॥ काय करूं कान्हयास, यशोदेसी गोपि पुसे ॥ का० ॥ १ ॥ मोठा बाई याचा त्रास, जात होते पाणियास ॥ अवाचित मज कुंजवनीं, नेत असे ॥ काय० ॥ २ ॥ नंदलाल मोठा चाट, आडवितो अमुचि वाट ॥ घरीं सासु द्वाड मोठी ताडितसे ॥ का० ॥ ३ ॥ मुरलि बाजवितो वनीं, आयकोन मधुर ध्वनीं ॥ कुसुम चाप देई ताप, चैन नसे ॥ काय० ॥ ४ ॥ वाटे जावें येथुंनिया, गोकुळास सोडुनया ॥ कृष्ण रुपीं चित्त परी, गुंततसे ॥ काय० ॥ ५ ॥ पाहुन घनशाम मूर्ती, सदगदीत गोपि होति ॥ कृष्ण चरणि प्रीति गंगा मागतसे ॥ काय० ॥ ६ ॥

गाणें १३ वें, काळी गोरी.

प्रथम ह्मणते ॥ मी ॥ अति सुकुमार ॥ काळा शितल

॥ चा० ॥ माझि प्रिति वेधली तुझ्या स्वरूपी हरी ॥ मला वेडलाविलें चैन पडेना मंदिरी ॥ मला फार गांजिते सासु दुधड म्हांतारी ॥ तिजलागि सर्व समजलें हरी ॥ म्हातारी कर्कशा मला गांजि कुडकुडी ॥ जात० ॥ २ ॥ एकटे केलें थेरडीने घरोघर सांगे जनां ॥ माझि सुन भुलली मन मोहना ॥ कडे घेउनी येते कृष्णा जगीं दिसतो चिमणा ॥ एकांती बहु होतो शाहणा ॥ ऐसें-कळलें सर्व जनाला नारी खळ कुंटणा ॥ यशोदा सुचउन केलें मना ॥ चा० ॥ ही रिपू फार म्हातारी जग जीवना ॥ तिनं तुटी पाडिली तुमची नारायणा ॥ मी सासुरवासि बोलता मला येइना ॥ तिने बहुकेला कटकटी ॥ जात० ॥ ३ ॥ नित्यउठुनी तिची माझी किरकिर होते सदा ॥ मीभिते जनामधि करिल आपदा ॥ तीसासू मी सून तिची बहु ठेविते मर्यादा ॥ भीते मी जनाप्रती सर्वदा ॥ चा० ॥ हादेह ठेविला चरणि तुझ्या केशवा ॥ मम मानसि इच्छा तुझी घडावी सेवा ॥ हा निश्चय माझा तुझा असो माधवा ॥ गातो कविराज भाषणे जोडुन चारकडी ॥ जात० ॥ ४ ॥

गाणें १९ वे, थंडी.

चाल (यशोदे बाल तुझा तान्हा०)

सुकुमार खिमी ब्राह्मणाची ॥ दासि तुमच्या चरणाची ॥ हवासोसे ना यमुनेची ॥ तोडण लागली भाशाची ॥ विंनति ऐका यदुराया ॥ पडते तुमच्यामी पायां ॥ मस्करि नाहीं गडे कामाची ॥ अ० कृ० ॥ कृष्णती वस्त्रं या आमुची ॥ हुडहुडी भरलि थंडिची ॥ कृ० ॥ १ ॥ टाका काठाची शेलारी ॥ माया मारिल मजघरी ॥ बऱ्या बोलानी द्या शिलारी ॥ जाउन सांगेन नंदाघरी ॥ असेन वाण्याच्या जातीची ॥ कृ० ॥ २ ॥ तिसरि उठली रागांत ॥ पाण्यांतुन दावीसंकेत ॥ कृष्णाकाय तुझ्या चित्तांत ॥ नकोरेछेडु तूंमस्त ॥ बऱ्याबोलान देलु-गड ॥ नाहींतर मारिन एक दगड ॥ उघड पडल आंग आमुचें ॥ कृ० ॥ ३ ॥ चवथीह्मणें. ऐक गोष्ट ॥ हरितुह्मीं सर्वां मध्यें श्रेष्ठ ॥ आह्मी तरि जातीचे कुळंबट ॥ कुणाकडे न्यावा बोभाट ॥ लज्जा राखावि आमुची ॥ कृ० ॥ ४ ॥ हासुन बोले श्रीधर ॥ निघा तुह्मी पाण्या बाहेर ॥ जोडा सूर्याला कर ॥ उघडयाने खेळां फुगडी ॥ माझ्या चित्ताला गोडी ॥ मग देईन लुगडी तुमची ॥ कृ० ॥ ५ ॥ गोपिनिघरुनिया धीर ॥ निघाल्या पाण्या बाहेर ॥ आंगावर वस्त्र अलंकार ॥ नेसुन जैरी पितांबर ॥ अघटितकरणि. दाखविली ॥ जळांमध्यें वस्त्र नेसविलीं ॥ गांवा मध्ये माजिविला फंद ॥ कुणि चरह्मणे

नागोविंद ॥ करा पुरविंल पाठिसी ॥ कृ० ॥ ६ ॥

गाणें १६ वें, दृष्ट.

मंचकी निद्रिस्तहरि असुनी दचकतो ॥ तिनतिनदां उठुनीपाहा उगीच बैसतों ॥ रूदनकरी लोळणघाली गातो बाहेरी ॥ अ० क० ॥ माधवास दृष्ट कशी आजजाहली ॥ घेउनि वैसले होते रंगमहालीं ॥ मा० ॥ १ ॥ पाळण्यांत घालूनिया हालविते जरी ॥ गीतगातां समजाविते नायके हरी ॥ शब्दकरी भलभलते जातो बाहेरी ॥ मा० ॥ २ ॥ जबर झाली दृष्ट सये काय मीं करूं ॥ सजल नयन श्यामवर्ण माझे लेकरूं ॥ शांती नसे कोण जिवा माधवापरी ॥ मा० ॥ ३ ॥ गाई वासरात जाउनि पुछ हें धरीं ॥ गोकुळांत जाउनियां दृष्ट झाली ॥ बागुल आला भिती ह्मणुनि सर्व राहिली ॥ मा० ॥ ४ ॥

गाणें १७ वें, बागुल.

चाल (कांय दयाळा संशय गमला०)

भस्म चितेचें चर्चुनि अंगी निशिदिनी स्मशानि लोळेरे

॥ त्रिशूळ घेवुनि नमाचि नाचे, भूत गणांच्या मेळारे ॥ अ० क० ॥ गोविंदा तूं गाहे उगाचि द्वारी बागुल आलारे ॥ १ ॥ जटा मस्तकीं डमरू बाजे त्रिनेत्रीं ज्वाळारे ॥ रुंडमाळा कंठींविराजित सान्निध नंदी दवळारे ॥ गोविंदा० ॥ २ ॥ रामराम मंत्रह्मणें दोअक्षरें वेळो वेळारे ॥ कृष्णह्मणें श्रीकृष्ण दर्शना आला शंकर भोळारे ॥ गोविंदा० ॥ ३ ॥

गाणें १८ वें, वेणूं.

सावळा सगुण जगजेठी ॥ गसां० ॥ ब्रह्मांड तयाचें पोटीं, टेकण काठी ॥ विटिदांड, लगोऱ्या गोटीं ॥ गवि० ॥ संगे गोपाळाची दाटी, गडबंड मोठी ॥ देहुडा पदाची दाटी ॥ गदे० ॥ दिलि यशोदेने तुप-रोटी, बांधुनपाठी ॥ घोंगडी सखे लंगोटी ॥ गघो० ॥ काल्यानें भरली वाटी, बोटेंचाटी ॥ चा० ॥ काय सांगु मी याचि करणी ॥ खेळतांनि तापे भरणी ॥ वर-होतो शीतळ तरणी ॥ पशुबाळें लागति चरणीं ॥ आह्मी ह्मणत असो, मूल हें कसें उगीच फिरतसें, ह्मणुनि भुलतसें, कुणाला बाणू बाणू बाणू ॥ याच्या खेळा कितीकाय वर्णू ॥ अ० क० ॥ कुंजात बाजवी

वेणू ॥ गकृं० ॥ भोवताल्या चरति धेनू, उडति रेणु ॥ १ ॥ ह्मणे दुसरें हे आवतारी ॥ ह्याचें काय गुणाचि थोरी, जाणली सारी ॥ दिवसाचि वासरे चारी ॥ गदि० ॥ रात्रिंघरांत शिरे बळ जोरी ॥ करितो चोरी नवनीत शेलके हेरी ॥ गन० ॥ दहि दूध समाटुन घेरी आणिलें खोरी ॥ बांधुन घेतसे द्वारी ॥ गबां० ॥ मग उभा आपण शेजारी, पोरे चारी ॥ घालून आंत बाहेरी ॥ गधा० ॥ पसरितो सराठ द्वारीं, काटेवन बोरी ॥ चा० ॥ काय सांगु कसब याचं ॥ पाहतांन मूल जातीचं ॥ घर बुडविससे भलतीचं ॥ घर कुलिन या गरतीचं ॥ आस हारिला निंदिल कस गोपिका पिस, ह्मणुन बोलतसे, कुणाला बाणू ॥ २ ॥ बाई सांगितली गान्हाणीं ॥ गबा० ॥ दिसतसें गरीबा बाणी ऐका कानीं ॥ मातलास खाऊन लोणी ॥ गमा० ॥ संसार करि धुळधाणी, कैची वेणी ॥ किति दडती बायका कोनी ॥ गकि० ॥ कितिगेल्या घरें टाकूनी, मथुरा भुवनीं ॥ नित्य खडे आंगावर हाणी ॥ गनि० ॥ भलतिला गातसें गाणी, ह्मणतो वहिनीं ॥ चाल० ॥ जातिचा तर आप गौळी ॥ भलत्याच्या पोराला मारी ॥ कुणि उभा न राहे जवळी ॥ याच्या मतिला कधिं कोण निवळी ॥ आतां कुठवर सोसुतरी, मीच

आहे बरी ॥ कसं पडेल पुरी ॥ कुणाला बाणू० ॥ ३ ॥

गाणें १९ वें, मुरली.

चाल (बिंचू उतरागे साजणी)

रात्र झालीसे, दोन प्रहर, मधुर मुरलीस्वर ॥ कानीं पडताती सुस्वर ॥ विव्हळ झालें अंतर ॥ बाई मोहियलें, मनमोहन ॥ अ० क० ॥ नंदाच्या नंदनें ॥ मुरळी वाजविली, कृष्णानें, नंदाच्या० ॥ १ ॥ बाई ऐकाग सखे ऐसी ॥ छाळि तो हा हृषिकेशी ॥ घालुन मुरलिमधें, मोहनीशी ॥ वृत्ती केली पिसी ॥ बाई, मोहियलें मनमोहनें ॥ नंदाच्या० ॥ २ ॥ अतार सेजेला पलंगीं, निजले मी रतरंगी ॥ मुरली स्वर तेव्हां अति संगी ॥ शिरला अतरंगीं ॥ तशीच चाललें धडवयानें ॥ नंदाच्या० ॥ ३ ॥ पाहतां मुरलीचा स्वर बाई, ऐसा त्रिवभुनि नाहीं ॥ चेटकि नाटकी, हा बाई ॥ मोठा शेषशाई ॥ ग्वाही दिधली, वेदानें ॥ नंदाच्या० ॥ ४ ॥ देवनाथाचें मन नांदे, मोहियलें गोविंदें ॥ लागुन भजनाच्या, निजछंदे ॥ रमवीलें स्वानंदे ॥ वृत्ती झालीसे तल्लीन ॥ नंदाच्या० ॥ ८ ॥

गाणें २० वें, मुरली.

चाल (रामचंद्र नाहिंघरी.)

कंचबिंब अंगणात वृजबालका ॥ आल्या बाई आज एक नवल आयका ॥ ब्बारा सोळा मिळुन गेल्या जवळ गोपिका ॥ वृंदावनि घेउन गेलि त्यांस राधिका ॥ अ० क० ॥ लहान हरी थोरझाले मात फांकली ॥ वृंदावनीं मुधुर सये मुरलि वाजली ॥ १ ॥ रिता डेरा गृहामधें घेउन बैसली ॥ घुसळताच रवीदोर करिचि सूटलीं ॥ कायकरूं सये आतां धाय मोकली ॥ लहान० ॥ २ ॥ कडे घागरिया घेउन तशिंच चालली ॥ पती बोलावीत होते नाहिं बोलली ॥ वाट कुठे ग वसेना मधेंच भुलली ॥ लहान ० ॥ ३ ॥ चीर चोळि धुइत होति यमुने तिरीं ॥ ठाइं ठाइं धुईतात गोप सुंदरी ॥ ऐकतांच मुरलि सखे झालें घाबरी ॥ लहान० ॥ ४ ॥ पाताळास नाद गेला शेष मस्तकीं ॥ ब्रह्मदेव वंदितात जोडुन हस्त कीं ॥ अंबिकेस नवल झालें शिव स्वस्थ कीं ॥ लहान० ॥ ५ ॥

गाणें २१ वें, मुरली.

चाल (राज विलासा यदुनायका०)

तृणचरतां गाई भुलल्या पाहवी फिरोन ॥ श्वापद॰ गण पाहे तटस्थ ऐकती दुरुन ॥ संचारण करिता पक्षि फिरती वरुन ॥ पार्वति पती तन्मय ध्यानास विसरुन ॥ मुनि निमग्न असतां स्वरुपीं गेलें विरुन ॥ कर्मठ जन असतां कर्णनेती सावरुन ॥ स्थळी गेलें फणि मस्तकीं भुमिवा वरुन ॥ रवि रथ मार्गी चालता राहिला स्थिरुन ॥ मारुतपण चंचल टाकुनगेला विरुन ॥ स्थिरस्थिर राहे मुरली रवधरी आवरुन ॥ अ० क० ॥ वाजीवलि मुरली हरिनें आदरीं धरुन ॥ अति अद्भुत झालें देव रात्रीं बनीं संचरुन ॥ १ ॥ सुस्वर मंजुळ ध्वनि निजकर्णी ऐकुन ॥ व्रजवनिता गेल्या हरि स्वरुपासी भुलुन ॥ पतिसुतादि तापें विचार जांनी करुन ॥ हरिकडे चालल्या मनांमध्यें कळवळुन ॥ एक संसारा विटल्या मनी तळमळुन ॥ बहुत्वरें चालल्या बहु धंदा उधळून ॥ आशा एके ठायीं सर्वहि मेळा मिळून ॥ प्रभुकडे चालल्या एकांतातें स्मरुन ॥ वाजवी० ॥ २ ॥ मनमोहन पाहे जेथळी तेंक्षणीं बसुन ॥ मग वृंद गोपिचा समयीं आला हा दिसुन ॥ मन मोहन यांचें मन क्षणीं पाहावें कसुन ॥ मगहकृच विनोदें काय बोलका हसून ॥ कां धाव घेतली निशि-दिनीं गृहिपति असुन ॥ इयेऽघाघ्र सिंहते वनीं पहा

डोळे पुसून ॥ जा परतुन राउळा नयावें उठून ॥ पति ईश्वर केवळ त्याचि अवज्ञा करुन ॥ परसंग इच्छिता जार कल्पना धरुन ॥ वाजविली० ॥ ३ ॥ अशि निष्टुर वचनें श्रीहरिची कड कडून ॥ श्रवणांत पडतां सुंदरा गेल्या गडबडून ॥ चळचळा कापती सीत आले थडथडून ॥ जाशि आंगा वरति विज पडे कोसळुन ॥ देहं भाक्ति राहूदे पदार विंदि जडुन ॥ नको घालुं संसृति बंदि शाळे अडून ॥ वाजविली० ॥ ४ ॥ करुणा परिसुनिया कळवळला करुणाघन ॥ प्रिति करें बाहित्या सन्निध गेला घेऊन ॥ एक रास मंडळा माळ कारु करुन ॥ एक गोपि श्रीरंग तनु बागवून ॥ सर्वांस निजसूख एक तऱ्हेचे देऊन ॥ झाल्या कृतार्थ वल्लभ आनंद कंदा पाहून ॥ वाजविली० ॥ ५ ॥

गाणें २२ वें, मुरली.

मुरलिनें जिवझाला बारा, सोडिलाथारा ॥ घरसोडुन गेले परघरा ॥ केसाचा बांधिला भारा, सुचेनां वेणी ॥ सुचे० ॥ केलि नेत्रुचि चौघडी, गेले आणाया पाणि ॥ कुणि ह्मणाति आले पाहा पिसे, कुणि ह्मणति अग आवदसे, कुणिह्मणति सर्व तिज दिस, भुललिस कैसी ॥

मुल० ॥ घेइ पदर मुखावरी पिसि नव्हे ही विवशी ॥ अ० क० ॥ हरितुझी मुरलिकितीगोड, मोडलिस खोड, आता तरिसोड, छंदतुं आमुचा ॥ छंदतु० ॥ धडगत लाविना, बाळ कृष्ण नदांचा ॥ १ ॥ आशा मध्यें आलि तिथे भिमा, झालिगु सिमा, ऐकेभिमा, कालचें रात्रीं ॥ का० ॥ हारि येउन बैसला, माझे बळचर्णी पाशी ॥ बोलतसे घर धन्या वाणीं, मागतो पाणि, हात पायधूया ॥ हा० ॥ म्हणे मूक लागली वाढ मला जेवाया ॥ कशि भुल पडली तरी, सावळी मुरत गोजिरी, दिल्याग तुरीं माझ्या हातावरी, लज्जित झालें ॥ ल० ॥ कसें सटविने माझ्या, आहष्टि लिहिलें ॥ हारि० ॥ २ ॥ रुल्याचि तियें आलि साळु, बोले हाळु हाळु रडे मुकु मुकु, किंतिग तरी गिळु ऐकाग काहणीं ॥ ऐ० ॥ मूळ माहेराहुनि झाला गढि चक्र पाणि ॥ सण पंचमीचा आला, धाडिलें मला, बेळे वर चला, उशिर नका लाउं ॥ उ० ॥ केला दूध भात घातिलें त्याला जेवुं ॥ झाला आनंद माझ्या मनां, मला वाटते माझा नाना, घालवाया आलि जना, तुशिच कोयना, घालउन गेली ॥ घा० ॥ त्यानें नेउन मजला कुंजवनी उभी केली ॥ म्हणें खेळूयाग रंग, होउनि निःसंग कमळी भृंग, आतां कुठ दडसी ॥ आ० ॥ व्यर्थ

अभिमानानें भव सागरीं कां बुडसी ॥ हारि तुझी० ॥ ३ ॥ झाला विस्मित माझा जिवु, कुणि कडे जाऊका विहिर नदि पाहू, तिथे आलि शिवु तिने घरि नेली ॥ ति० ॥ काल गोष्ट माझ्या जिवा वरची गेली ॥ अशा किति वेळां या गोष्टी, घालव्या पोटी, ऐकेना जगजेठी पडलो पाया ॥ पं० ॥ वाटे जन्म व्यर्थ हा, जाइल तरी वाया ॥ हरि० ॥ ४ ॥ सोनाराचि राधा होती हूड, कांशाची भिड, घेउया सूड मर्यादा कैची ॥ म० ॥ चला गान्हाणी सांगु नंदापाशी ॥ नंदराया पदर पसरितो हात जोडितो आंवरि कान्हया ॥ नाहीं तरि व्यर्थ हा, जन्म जातो वायां ॥ हारि० ॥ ५ ॥ परब्रह्म लक्षुमीकांत, मनाचा शांत, नाहिं त्याचाअंत, वेदांला कळला ॥ वे० ॥ कसे नाना परिनें, गोपिने छळिले हारीला ॥ गंगा म्हणें पंढरी नाथांचा दर्शन आतां बाल गोविंदा ॥ करा डोळा बांकडा मजवारि कृष्ण मुकुंदा ॥ हारि० ॥ ६ ॥

गाणें २३ वें, मुरली.

शरदऋतुच्या पोर्णिमेसी मुरली पुकारी वृंद्रावनीं ॥ निशिध्वनि परिसुन गोपि घाबरली ॥ लगबग धांवति

या व्रजललना ॥ पाहू आनंदें श्रीमन्मोहना ॥ मानिति हारि पदवी ॥ हीमु० ॥ १ ॥ कृष्णा सन्निध ॥ पाहुनि तरुणी दाटुन बोले निष्ठुर वाणी ॥ कां आल्या रजनी ॥ हीमु० ॥ २ ॥ पति मुख त्यागुनि आलों तुज पाशीं ॥ पाचारुनिकां अनुचित वदसी ॥ विरह तुझा सुखिकीं ॥ हीमु० ॥ ३ ॥ पाहुनि त्याचा निश्चय प्रेमां ॥ रास आरंभि आत्मारामा ॥ खेलुन टिपरी सुखवीं ॥ हीमु० ॥ ४ ॥ आवचित होतो गुप्त मुरारी ॥ दुःखे करिति विलाप भारी ॥ धीर वनि फिरवी, हिमु० ॥ ५ ॥ बिल्व तुळशी शोधिती कृष्णा ॥ गुलाबपारिजातक पुष्पीं ॥ द्राक्ष अंजिर आवळी ॥ हीमु० ॥ ६ ॥ प्रगटे गोपि मध्यें मुरलीधर ॥ मुकुट कुंडलें पीतांबर ॥ गोपि विरहा नळ विझवी ॥ हीमु० ॥ ७ ॥

गाणें २४ वें, मुरली.

आपुल्या गृहि मीं करित होते धंदा ॥ मुरली बाजविलि नंदाचिया नंदा ॥ हारिच्या हातिचा वेणू कुणि घ्यागे ॥ घरि सासुहि सासरा म्हातारा ॥ तान्हे बाळटाकुनि आलें वरा ॥ याच्या मुरलीनें जिव प्याला वारा ॥

हारिच्या हातिची मुरलि कुणि घ्या० ॥ १ ॥ गृहिं सासुर वास भला भारी ॥ जावा नणदा गांजिती परो पर्गी ॥ हारिच्या० ॥ २ ॥ मुरली नव्हें हें विष मला असें ॥ याच्या मुरलीनें प्रेम हृदयीं वसे ॥ मन मोहनही मूर्त हृदयीं भेटें ॥ हारिच्या० ॥ ३ ॥

गाणें २५ वें, मुरली.

विसरति मृगपशु चारापाणी ॥ सकळहि वत्से पयपाना ॥ गोपि पति सुत गृहधन त्यागिती त्या प्रेमाच्या आव सरीं ॥ अ० क० ॥ हारि तुझी मुरली माधुरी नभि हुनिसुरवर, उतरति झरझर ॥ कुंजवनां भीतरी ॥ हारि० ॥ १ ॥ घालितसे एक वेणी ॥ मस्तकींच राहे फणी ॥ बावरे गौळण ती ॥ चालतसे लगबग, जिवकरी डगमग, विसरेतो शिशुघरीं ॥ हारि० ॥ २ ॥ एकगोपि न्हातहोति ॥ केस तिचे ओले गळती ॥ तिजशी भाननसे ॥ काजळ ल्याली भाळा ॥ कुंकुम लावि डोळा, पदिमाखी कस्तुरी ॥ हारि० ॥ ३ ॥ शृंगारित गोपि एक, पाहतसे टकमक, सुटलीचीर निरी ॥ शिरि बांधि लफा पेटया ॥ दंडिचंद्र हार आंगठया, सरि आवळी कंबरी ॥ हारि० ॥ ४ ॥ राधा झालि वेडी पिसी

चमकती वीज जशी, धांवती त्या मार्गी ॥ जात कुंज वनीं, मग मधुर मधुर वाजे ध्वनीं ॥ नाद घुमे आंबरी ॥ ५ ॥

गाणें २६ वें, कृष्णाचें.

मथुरेचा त्याग करुनि द्वारका नूतन रचुनी ॥ जरा संधासी त्रास ओनी ॥ चोज करिसी बारे ॥ अ० क० ॥ तन मन धन करितू भजन ॥ देवकी सुतगोरे ॥ १ ॥ कौंसचाणुरादि क्रूर ॥ वधुन केलें सर्व स्थिर ॥ ऐसा तो धीरवीर ॥ हृदयीं तुम्हीं स्मरारे ॥ तन० ॥ २ ॥ पांडवाचा साहकारी ॥ कौरवासी वैर भारी ॥ धुतो अर्जुनाचेहारी ॥ भक्ति स्तव बारे ॥ तन० ॥ ३ ॥ भक्त उद्धरावयासी ॥ दग्ध केले यवनासी ॥ अति भितीनें मुचकुदांसी ॥ मुक्ति दिधली बारे ॥ तन० ॥ ४ ॥ रामदास तिर्थ वासी ॥ नमन करे दासदासी ॥ ऐसे मज पामरासी ॥ उद्धरिलें बारे ॥ तन० ॥ ५ ॥

गाणें २७ वें, कृष्णाचें.

चाल (हेरे काय कृष्णा लंपट झाले०) .

नंदाचे द्वारीं उभी होतीराधा पालखात हारिनें घेतली आळ ॥ आलि यशोदा रागानें धरला ॥ अ० क० ॥ वाजवि वेणू मंजुळ वाणी ॥ हारि वाजवी वेणू ॥ १ ॥ राधेच्या गृहिं हरि थोर होतो ॥ द्वागंत ऐकुनिया आंतघेतो ॥ हाकामारि वेळोवेळा ॥ वाज० ॥ २ ॥ घाबोर राधाहारि कडे पोहचे॥ दारांत आनया करुगत काय ॥ लहानसें व्हावें माधवराया ॥ वाज० ॥ ३ ॥ पाहुन राधेचा अंतर भाव ॥ लहानसे झाले यादवराव ॥ हार्षाले राधा लागेचरणांला ॥ वाज० ॥ ४ ॥ दहि दुधाची घेउन वाटी ॥ जेउघालि राधा गोरटी ॥ मगउघडी कपाटाला ॥ वाज० ॥ ५ ॥ आनया म्हणे राधिकेला ॥ कृष्णासि आणित जातूं घराला ॥ पालख बांधिथलागे ॥ वाज ०॥ ६ ॥ राधेनें तपकेलें गंगेचे काठीं ॥ जन्मो जन्मी कृष्ण प्राप्ति ॥ राधा मिळाली स्वरुपला ॥ वाज० ॥ ७ ॥

गाणें २८ वें, कृष्णाचें.

चाल(मोहन मूकी भयो रोती राधिका ॥)
यशोदेचा कृष्ण कान्हा, साद धरली गौळणी ना ॥ मुरलीच्या करिगाना ॥ वाजवि मधुर ध्वनीं ॥ चक्रपाणी ॥

अ० क० ॥ मोहन बन्सीवाला, वृंदावनीं ॥ मो० ॥ १ ॥ शरदीच्या शुभ्र रजनीं, व्रजवासी गोपि मिळुनी ॥ वेणुनादे जाति भुलुनी ॥ येती धाऊनी ॥ लगबगींनी ॥ मोहन० ॥ २ ॥ शामरंगा नंदलाला, तुळशीची शोभे माला ॥ मोर मुगुट कटि शेला ॥ पाहती व्रज रमणी ॥ नेत्रानीं ॥ मोहन० ॥ ३ ॥ मधुर कशिही मुरलि वाजे, रूप पाहतां काम लाजे ॥ चंदनाची उटि साजे ॥ कोमल रवे करुनी ॥ मंजुळ वाणी ॥ मोहन० ॥ ४ ॥ उद्धरील्या गोपनारी ॥ मुक्ति देई त्यासी हरी ॥ गंगावरी कृपाकरी ॥ मन हें हरि स्मरणीं ॥ रात्रं दीनी ॥ मोहन० ॥ ५ ॥

गाणें २९ वें, कृष्णाचें.

चाल (मालामोहनकी कुंजेंमें)

मुरली रवाने मोहुन आम्हा, कांहि सुचेना गृहिं गृहकामा, नंदकुमारा मेघशामा ॥ धाउनी आलों हरी तुझ्याकडे ॥ अ० क० ॥ सुंदर सांवळा न सांपडे व्रजवासि गोपिनाजो आवडे ॥ सुं० ॥ १ ॥ कुंजवनामधे क्रीडा करिता, श्रीरंगरुपा दंगचि असतां ॥ प्रेमभरानें रंगचि लुटिता ॥ कर्म आड येउनी आम्हापुढे ॥

सुंदर० ॥ २ ॥ रासमंडळीं उभ्या अंगना, त्यातिल घेउनया व्रजललना ॥ गुप्त जाहला कुठे कळेना ॥ गोपि सोडुनी कसा वनी दडे ॥ सुंदर० ॥ ३ ॥ तुलसीमाला प्रिय बहुज्याला, तो मन मोहन कोठें गेला ॥ पुसती चंपक आम्र तरूला ॥ कृष्ण कुठें दृष्टिला नपडे ॥ सुंदर० ॥ ४ ॥ जाई गुलाबा मधुनी फिरती ॥ कुंद मालती कुंज पाहती ॥ कोकिल मृगशुक यानां पुसती ॥ पाहिला तुम्ही सखा कुणीकडे ॥ सुंदर० ॥ ५ ॥ केशव नारायण गोविंदा ॥ कां लपलासी आनंद कंदा ॥ चरण दाखवी श्रीमुकुंदा ॥ विरहव्यथा जाळिते जिवा गडे ॥ सुंदर० ॥ ६ ॥ पाहुन या गोपिच्या प्रेमा, दया उपजली मेघःशामा ॥ प्रगट होउनी ने सुखधामा ॥ आस गंगाची हरी तुझ्या कडे ॥ सुंदर० ॥ ७ ॥

गाणें ३० वें, कृष्णाचें.

चाल (मुंबई शहर गुलजार०)

जयजय कृष्ण कृष्ण गोपाल, गोवर्धनधर नंद[illegible] ॥ धृ० ॥ गोविंद मुकुंद मुरारी, बनवारी कुंज बिहारी ॥ मनमोहन बन्सीवाला ॥ गो० ॥ १ ॥ माधव

मोहन घनःशामा, मुनिजन मानस विश्रामा ॥ करुणा कर दीन दयाला ॥ गो० ॥ २ ॥ सच्चिदानंद गुण ग्रामा, संकर्षण हारि सुखधामा ॥ परमेश्वर परम कृपाला ॥ गो० ॥ ३ ॥ यदुवंशकमलकुळभानू, खलकानन दहनकृशानू ॥ श्रुति धर्म शत्रु उरशाला ॥ गो० ॥ ४ ॥ राधामुखचंद्रचकोरा, श्रीगोपीजनाचित्तचोरा ॥ राधामनसरसमराल ॥ गो० ॥ ५ ॥ राधावर रास विलासी, व्रजचंद्र द्वारका वासी ॥ जगदीश जगत् प्रतिपाला ॥ गो० ॥ ६ ॥ करलकुट मुकुट शिर धारी, खांदे पर कामरि कारी ॥ संग सुरभि वृंद व्रज बाला ॥ गो० ॥ ७ ॥ कटि तट पीतांबर भ्राजे, मणि कौस्तुभ कंठ विराजे ॥ क्या अनुपम रूप मराला ॥ गो० ॥ ८ ॥ खग गज गणिका उद्धारी, दीनोद्धारण व्रतधारी ॥ तिहिं लोक सुयश उजियला ॥ गो० ॥ ९ ॥ भवसिंधु भयंकर भारी, बिनश्रम उतरे नर नारी ॥ चढि नाम नांव तत्काला ॥ गो० ॥ १० ॥ पीपीके रूपरस प्याला, बलवंत हुवा मतवाला ॥ गायन गोविंद गुणमाला ॥ गो० ॥ ११ ॥

गाणें ३१ वें, कृष्णाचें.

चाल (रामचंद्र नाहि घरी०)

निद्रिस्त होते आपुलें सूख शयनीं ॥ मुरलिचा मधुर ध्वनीं येतो श्रवणीं ॥ देहभान चित्तवृती गेलि हरपुनी ॥ पंचप्राण व्याकुळ झाले माझे तेधावां ॥ अ० क० ॥ जा ग कुणि आणा हरी मसी भेटवा ॥ यागे जीव दान मसी आणुन माधवा ॥ जा० ॥ १ ॥ मदन मनोहर मूर्ति दिसे सावळी ॥ हाती मुरलि घेउन उभा रास मंडळी ॥ हीत गूज सांगे गोपिकांचे जवळी ॥ मजसी कां विसरला प्रांण वीसावा ॥ जाग० २ ॥ सावळें रुप केंव्हा पाहिन नयनीं ॥ स्वकराने क्षेम कधीं देइन येक्षणी ॥ पंचप्राण ओवाळुन सांडिन वरुनी ॥ विरहाने दुःख भारि होतसे जिवा ॥ जाग० ॥ ३ ॥ वायू चंद्र ताप देति उष्ण दारुण ॥ स्मर तापें देह दग्ध होतो साजणीं ॥ करा शांत आणा हरिस भेटि लागुनी ॥ दीन रजनि कृष्णा मनि आठवि माधवा ॥ जाग० ॥ ४ ॥

गाणें ३२ वें, कृष्णाचें.

चाल (आहा नृपति किती दिसे मनोहर)

यमुना पुलिनी प्रथु कुंजवनीं ॥ मधुर मुरळी मोहि ते जिवागडे ॥ अ० क० ॥ चलाचला सखयांनो आहा-

गेंड कमल नयन श्रीहरी पाहागडे ॥ १ ॥ भाळीं कस्तुरी उठि केशरी तनु प्रभा झांकिते नभांगडे ॥ चला० ॥ २ ॥ नटवर वपुहि सगुण साजिरी ॥ वैजयंति शोभते गळां गडे ॥ ३ ॥ चरण कमलीं या गंगा वाहे ॥ सुमन तुलसीच्या सूगंध हा गडे ॥ ४ ॥

गाणें ३३ वें, कृष्णाचें

चाल (सखी मोहन मुरली बधाडी.रखो या गुजराथी चालीवर)

हीसुंदर मूर्ती श्रीहरिची असे ॥ हरीची असे मदन कांती दिसे ॥ ही० ॥ १ ॥ यांगे वनीं सर्वहि जावूं ॥ पाहूं कमला कांत ॥ वेणू मंजुळ वाजवी ध्वनी पडे श्रवणांत ॥ मोहिलें आम्हांस मनीं लागले पिसे ॥ हारिची० ॥ २ ॥ पाहती चंचल मृगनयना ॥ पूर्णा प्रभा शशिची ॥ फुलले तरूवर वेली भृंग घेत रुचि मधुची ॥ कुमुदिनी वरुनिथंड वायू येतसे ॥ हारिची० ॥ ३ ॥ आल्या व्रज युवती सकला ॥ क्रिडती कुंजवनीं ॥ खेळे युदुपती सुंदर श्याम रासरसें. भरुनी ॥ सावळी सुरत छबी वेश नटतसे ॥ हारिची० ॥ ४ ॥ गंगा तव चरणीं वाहे कृष्णा गोपाळा बुडते भवं सागर डोहीं रक्षीं किंकरीला ॥ दिनदयाळ असशी म्हणोनि

शरण येतसे ॥ हारि० ॥ ५ ॥

गाणें ३४ वें, कृष्णाचें.

चाल (जाउंदे हे मम०)

जाउन सांगेन नंदाच नंदना ॥ चित्तासी आंतिं ... हरि च्या, ची० ॥ अ० क०॥ जिवहा व्याकुल फार हारि विण ॥ श्रीजवनीं चालगडे ॥ आता तरी श्री० ॥ १ ॥ दहि दूध नवनित मेवा मिठाई ॥ फार तथा आवडे ॥ हारिला फा० ॥ जिवहा० ॥ २ ॥ मिळवुन गौळणी पाणियासी जाता ॥ रासबिदि गांठ पडे हारि ची रा० जिवहा० ॥ ३ ॥

गाणें ३५ वें, कृष्णाचें.

चाल (जिवाहा व्याकुल०)

गाइचे वासरु ऋशीसी सोडी ॥ बैल धुवायासी जाय ... क० ॥ कायरे मन मोहित झालें ॥ आरे हारि तुझ्या मुरलीत काय ॥ कायरे० ॥ १ ॥ डोळयांत कुंकु कपाळी काजळू ॥ हळदिसीं, मठ मठ खाय ॥ राधिका ह० ॥ २ ॥ अर्धांगि पार्वति जटे मधे गंगा ॥ जटे तुनि निघाली काय ॥ कायरे० ॥ ३ ॥ माणिक प्रभुसी बोलते राधा मुरलीने मोहित जाय ॥ कायरे० ॥ ४ ॥

गाणें ३६ वें, चेंडुफळी..

म्हणे यशोदा हीमाता, ऐक रघुनाथा, नकोरे आतां, गांवा मध्यें हिंडू ॥ गौळणी बालट करू, तुफान तुजवरुन, घेती कुंभांडू ॥ जाई खेळाया बाहेरी, पांवा बासरी, वाजवि श्रीहरी, खेळविटि दांडू ॥ गोपाळ घेऊनियांसंगे, गेले श्रीरंग, खेळाया चेंडू ॥ चा० ॥ डाव मांडिला यमुना स्थळिला झाले गोपाळ एका फळीला ॥ श्रीरंग आधि डाव खेळिला ॥ बळीभद्र त्याशी मिळाला ॥ चेंडु आडकला कळंबच्या ढाळिला ॥ धागऱ्या सहित घळघळला ॥ गोपाळ म्हणती देवाला ॥ तुम्ही झाडांला चेंडु आडकविला ॥ तुम्हीकाढा नाहीं तरि हरी डाव जो राहिला ॥ अ० कं० ॥ गोकुळीं झाली आरोळी कृष्ण बुडाला ॥ गोपाळ करिती आकांत, गेले कृष्ण नाथ कालिया डोहात चेंडू पडला ॥ गो० ॥ १ ॥ देव चढले कळंबावरी, शार्ङ्गधरी, चेंडूं समोरी घातला हात ॥ कळंबाची डाहळी कडकडून, पडलीहि मोडुन, कालिया डोहात ॥ कडकडली आकाशीं मात, गेले कृष्णनाथ, कालिया डोहांत, चेंडू सहित ॥ गोपाळ म्हणती गडया टाकूं या उडया पाहुं

रघुनाथ ॥ दमले बुडया मारमारुन, पाहती तळ धरुन लागेनां अंत॰॥ चा० ॥ गोपाळ रडती धाईधाई ॥ हरि आमुचा गवसत नाहीं ॥ कस केलस यमुना बाई ॥ घरी पुसेल हरिची आई ॥ तिला सांगावे आह्मी काई ॥ आल्या धांवून गोधन गाई ॥ आठवुनी श्रीहरी पाहि ह्मणती शेषशाई कुठे कोणी पाहिला ॥ गोकुळी० ॥ २ ॥ गोपाळ गाई गोधन, करिती रुदन सारिजण दिनथवा उभा राहिला ॥ गाई घेइनात चारापाणि, बांसरें तान्हीं पेईनांत आइला ॥ झाला आक्रांत यमुने स्थळी बुडाले हरी, कळलें मग घरी यशोदा बाईला ॥ यशोदा मोकली दाहिदिशा तान्हा पाडसा चुक-लास कसा टाकुनी आइला ॥ चा० ॥ यशोदा शोधिते रान, कुठे गेले बाळतान्ह ॥ आल्या गोपीका धावुन, हारी कुठे आहे ह्मणोन ॥ गोपिका जिवाचा सखा यदुनायका कुणी कडेगेला ॥ गो० ॥ ३ ॥ कशीभोवली चेंडू फळी मूर्त सावळी कळंचा स्थळीं हारी गपझाला ॥ काळिया डोहात काळिया भूजंग गेले श्रीरंग तयाच्या माहला ॥ नागिणी पाद्मिणी नारी, उभ्याहोत्या द्वारीं, चेंडु श्रीहरी मागे तिजला ॥ जळो जळो चेंडु घननिळा भुजंग आहेकाळा खाइल बा तु-जला ॥ भुजंग पाहुन फुसकरी पवा बासरी लंपटकेला

॥ नाकांत ओवुनियां वेसन घालुनि आसन स्वारवर झाला ॥ चा० ॥ ऐकून मुरलिचा नाद झाला भुजंग सावध ॥ वर वसुन आले गोविंद हर्षली यशोदानंद ॥ करीक्षेत्र गावांत येवुन विकट चाल करुन हारी पाशिभिडला ॥ हारी नामाचा घोष तयाचा पाप लेश न उरला ॥ गो० ॥ ४ ॥

गाणें ३७ वें, म्हातारी.

रात्री समया मध्यें म्हातारी करी बहु वस्ती ॥ दर वाजाला किलया कुलूपें करी बंदोबस्ती ॥ हाति काठी घेउनि रात्रिची, हिंडे वाडया भोंवती ॥ चा० ॥ दिवस उगवतां बसे वाडयां पुढें मा० ॥ तिचा धाक गोकुळिच्या पोरा लागुन ॥ वर्जा वांकडा पेंदा सुदामा यासि धाक भारी ॥ अ० क० ॥ चौघि सुना मुखरणि म्हातारी बसे राखण दारी ॥ बहुत करी जाप्ति तयावर टपला श्रीहारी० ॥ १ ॥ चौघिसुना चमकृति जशा कांही आस्मानी तारा ॥ कोंवळी उमर ल्हान तनु वय बारा की तेरा ॥ पतिव्रतेचा नेम राखिती आहे तिचा थारा ॥ परपुरुषाचि रीत कुणाचा पडु देइना वारा ॥ चा० ॥ चौघिसि म्हातारी आखंड ताकिद.

करी ॥ नंदाचा श्रीहरी येउ देउनका घरी ॥ आला तर धरुन बांधिन तंगडिला दोरी ॥ चौघि० ॥ २ ॥ शुभ्र केश मस्तकी म्हातारी झाला जग जेठी ॥ डुगडुग हालवी मान चालतां टेकितसे काठी ॥ द्वारि बसे म्हातारी जातां बाई कोणाचे भेटी ॥ काशियात्रा करुन आले भेटायासाठी ॥ चा० ॥ उठोन म्हातारी घट्ट पाय धरी ॥ हाती धरुन नेउन बैसवी ओसरी वरी ॥ चौघिशि पायीं पडा आखंड ताकिद करी ॥ चोघि० ॥ ३ ॥ संध्या काळि वेळ साधुनि घंगाळी पाणि ॥ चौघि सुना मुखारिणी म्हातारीला न्हाणीं ॥ तूप सेवया नरम बोटवे ताट म्हातारी पुढें आणि ॥ तुळशी पत्र मान्य करावे दुबळयाचि मेजवानी ॥ चा० ॥ चौघिसि म्हातारी आंखंड ताकीद करी ॥ चारी प्रहर हिचि सेवा करावी बरी ॥ चारी प्रहर भोगिल्या हारीने त्या चौघी नारी ॥ चौघि० ॥ ४ ॥ मग त्या सुंदरा लज्जित होउनि मान खाली केली ॥ सुना म्हणति सासु बाई तुमचा पण केला खाली ॥ कृष्ण म्हातारी बाहेर आली म्हणोनि त्याला धरी ॥ तुम्ही इतक्या कलभांड परंतु ठकउन गेला हारी ॥ चा० ॥ ज्यासि ब्रह्मादिक पाहतां झाले वेडे तो म्हातारिच्या बापाला नसांपडे ॥ सोळा सहस्र भोगिल्यां परंतु हारि ब्रह्मचारी ॥ ५ ॥

गाणें ३८ वें, म्हातारी.

दासिचा कर जिच्यापरीं, खासिगिरजि म्हातारी ॥ पाहोन पाहोन धुंदासांगो जिचातिला बरोबरीं ॥ चौबिसुना घरांतुन, येउदेइना बाहेरी ॥ ठाउक नाहीं चंद्रसूर्य उगवतीं कोणेदारीं ॥ सुना निजवी राजमंदिरी, आपण पलंग टाकिते दारीं ॥ दरवाजाला किल्या कुलुपें बळकट करुनि खंजिरी ॥ असि धस्तया कृष्णाची, म्हातारी जागे सारिरात्र ॥ अ० क० ॥ याहि गोकुलामध्यें चेटकी नाटकी कृष्णनाथ ॥ १ ॥ याहि गोकुळां मध्यें कितिक जणाच्या, घेतल्या इजती ॥ भल्या भल्या गौळणी, कृष्णानें भोगिल्या एकांतीं ॥ मी न माझ्या चौघी सुना, नाहीं सापडलो याचें हातीं ॥ मीच गाखिल्या नाहीं धाडिल्या, घागर घेउन पाण्यासीं ॥ नाहीं दाविले ऊन, जतन केल्या फुगली चित्ती ॥ मीमी म्हणता लागे धाक, परपुरुषासि कांपतीं ॥ परपुरुषाची जात वारा पडूदेइना वाड्यात ॥ याहिगो० ॥ २ ॥ वर्ज्यां वाकडा पेंदा सुदामा, खासे श्रीकृष्णाचे गडी ॥ पाहति झरक्या वाटे, चौघे एकांह्नि एकचढी ॥ मुंगिला नाही रीगतुथें,

काय करितिल बापुडी ॥ अरे भगवंता कृपावंता, चार माणिकचे तुकडे ॥ धावत पळत आलो, तुम्हांहो सांगत ॥ याहो० ॥ ३ ॥ पेंदा होउनि ॥ फिरतोशी होउनि हिंडे भिकारी ॥ वाडयामध्यें येउ देइना दारी उभी म्हातारी ॥ पेंदामागें पाणि, दावि दुसरें घर शेजारी ॥ हाती काठी टेकत उठे, चल जा मेल्या झडकरी ॥ ढकलुन दिले दांतपडले, पेंद्याला आली घेरी ॥ रडतगेला देवापाशीं, पुरे हो तुमची चाकरी ॥ असे रांडेने धिंडमांडिलें, तोंडाचे पडले दांत ॥ एक वेळगेलों फजित पावलो पुरेहो तुमची सोबत ॥ आतां जाइना म्हणुन पेंदा कानांवर ठेविहात ॥ याहिगो० ॥ ४ ॥ खांदि भोपळा हाति काठी, कुबड मोडके मानेहाले ॥ थाठाव राह्याला कृष्ण धाकतहो कापत बोले ॥ हिंडुंन गोकुळ नगर, शहर शेवटचें घर देखिलें ॥ दरवाजाला येउन टेकलें देव कैविलबाण बोले ॥ सुना धूतसे मडकी दारी सासु जलाल ॥ आहो आवाजी तुम्हां सारखी असिच एक म्हातारी ॥ आसिच रोड कीं कुबड मोडकी, जाति हो पंढर पुरा ॥ कालचा उपवास बाई तिजला करुणा येउद्यां तुम्हाला ॥ येउद्या म्हातारी पडुद्या बाहेरच्या ओंसरी वरी ॥ विचारितां पाचारिता देव आलें झडकरी ॥ नयावे म्हातारी

घरांत, असावें दुरचें दूरी ॥ जलालि आमाचि सासु आझाला गांजिति नानापरी ॥ बाघिण पांचाळिन हिच्या भाकानें देव येइना वाडयात ॥ याहि गो० ॥ ५ ॥ देपाणिग तांब्याभर ह्मातारी मागे पाणि ॥ हो कोरग बामनी ह्मातारी बोलति झिडकारोनीं ॥ लाहीपीठ दळावया जाते मागें चक्रपाणी ॥ नकोंग घालु घरांत पिरघिट झाली दिवालावणी ॥ सासवेचा हुकुम झाला धाग जीत उपडोनीं ॥ दिल जाते उपडुन आंगणी; देव बसले दळीत ॥ याहि गो० ॥ ६ ॥ पाहिली माझी ओवी, नमिले चक्रपाणि ॥ याहि गोकुळा मधें भोगिल्या सोळा सहस्र कामिनी ॥ राहें चंद्रावळी सत्यभामा मुखरणी ॥ वरकडाचा कायपाड उगीच फुगल्या आभिमानीं ॥ ज्या देवाच्या असातिल त्यांनीं देव देखिलें नयनीं ॥ ज्याचें नशिब खोटे त्याला भेटकैचि आजूनी ॥ असि गाइली ओवी त्या चौथिच चंचल चित्त ॥ याहि गो० ॥ ७ ॥ देवानि मावकेली, आवस्तळ मेघ आला ॥ येगबाइ घरांत करुणा आली त्या ह्मातारीला ॥ जवळ बोलाउनि नाव पुसे त्या बायकोला ॥ माझे नाव कृष्णाबाइ असेंच देव बोलिला ॥ अशाच माझ्या चौघि सुना चारप्रहर चौ.विला ॥ असेच माझी करिती सेवा ॥ रात्रजागें सुखांत ॥ आजग बाई मागे चालत

वैन्याची जाते रात ॥ याहि गो० ॥ ८ ॥ म्हातारी पुसे त्या बायकोला, चौघी सुना उपवर ॥ परपुरुष चि जात नाहीं कसा बाई विचार ॥ जाइजुइ फुलली लिंबा आला असे भार ॥ याहि पणा मध्यें बाई आनंद करावा थोर ॥ याहि गो० ॥ ९ ॥ सासु मारी हाका सुनेला, थोरली जागी झाली ॥ न्याग रगडा म्हातारीला मार्गीं चालतां श्रमीं झाली ॥ तेंव्हा ती आलि द्वारा आपुल्या मंदिरी नेली ॥ अंधेरा चा उजेड झाला कृष्ण पुढती समय लागला ॥ रगडतां रगडतां देवाचे शिरिचा मुगुट झळकला ॥ कंठी माळा पाहोनि डोळा हारी सांवळा ओळखिला ॥ त्या चौघीच्या मंदिरी चार कृष्ण सेजेला ॥ आनंद या कृष्णाचे अंतरी प्रगटला मंदिरांत ॥ याहि गो० ॥ १० ॥ तेंव्हा ती आली द्वारां सूर्य दिन मान झाला ॥ सासु मारिते हाका सुनेला, कां कोंडालि म्हातारीला ॥ निघुन गेला पेवा आतां सोवत कैची तिजला ॥ आहो आवाकां खादली भांग ॥ भांग खादली भूलपडली, मगमला केले जाग ॥ म्हातारिच्या मिशें कृष्णानीं केला लाग ॥ आग सुनानों हात जोडिते तुम्हाला नका सांगु भ्रताराला अन्याय माझा झाला गवळिं इशाचा म्हणे भगवंते, नाही चुना लाविला ॥ याहि गो० ॥ ११ ॥

गाणें ३९ वें, शिदोरी.

बदे गोपाळ, गायिचा मेळ, आपुल्या बळ, स्वता घननिळ, पाहे उठुनी ॥ येत्वरे कृष्ण धाउनी ॥ तातडी ॥ तातडी, लिंगि ब्यांहडी, कुशी तांबडी जांबि बेगडी, हंबरे दुरुन ॥ आळवी हरी प्रीतिन ॥ मुक्ताई ॥ मुक्ताई, मच्छ कुर्माई, वराह नरसाई, वामन परसाई राम कृष्ण ॥ वाजवी वेणु स्मरण ॥ बिंबरी ॥ बिंबरी, वाजवी बहु बरी, कालिंदितिरी, आल्या ध्वनिबरी, त्यामुरलीच्या ॥ अं० क० ॥ हरी करितो गोपाळ काला तिरि बसुनी यमुनेच्या ॥ येंगडबा; बडज्या वाकडया, टाकि घोंगडया, सोडि गाठोडया शिदोरीच्या ॥ ह० ॥ १ ॥ एक सोडी, गूळ पापडी, सांडगा कुरवडी वडी तेलाची ॥ शिदोरी लाह्या पोह्याची ॥ गुळवाटी ॥ गुळवाटी कान्हवला रोटी, काळी कुटकुटी, आवड हरिची ॥ एक दावी डाळ फुणक्याची ॥ ठोंबरा ॥ ठोंबरा घाटा बहुबरा, आणिक दुसऱ्या शिळ्या आंबट बुगऱ्या कैशा ॥ हरी० ॥ २ ॥ शिदोऱ्या, सोडिल्या बऱ्या, एकाच्या घाऱ्या, पुऱ्या साटोऱ्या, एकाचा दहिंभात ॥ एकाचा दिवस वर्णात ॥

निवळ ॥ निवळ ॥ एकाची खिर, दूध साखर शेवया वारि घृत ॥ एक आणि ताक कण्यात ॥ हारि पुढें ॥ हरीपुढे, एकाचे वडे, दुजे भीवडे, कांदे मिर्च्या ॥ हारि० ॥ ३ ॥ गोड रायतीं आणिलीं बहु, काकडी लिंबु, मिर्च्या वरि आलं कार्ले तोंडलं पडवळ ताडथाचं ॥ रत्नाळू ॥ रत्नाळू, चिकट मोहाळू, तिखटं राताळु कुट बोरीचं ॥ तर्क भरित वांग्याचं ॥ चवळिच्या ॥ चवळिच्या, शेंगा वालांच्या, इटी मुगणिंच्या, शाखा फळपुण्याच्या ॥ हरी० ॥ ४ ॥ ये गडया जेवू, प्रकार झाले बहू, भागिने घेऊ, तुम्हि सारे ॥ तुम्हि यारे ॥ तुम्हि यारे हाती घासघ्यारे, वरून देव येती, टुकत बसवी इंगुल्यारे ॥ तुम्हि वाकुल्या दावारे ॥ मचमचा ॥ घोंगडिला हातपुसा वदे रामदासा सत्य बोलारे हरी० ॥ ५ ॥

गाणें ४० वें, जेवण.

आईमला जेवूं घाल लई, मग म्हणशिल सांगितलं नाहीं, घरि आतां मी न राही ॥ मला जेऊंघाल ॥ अ० क० ॥ यशोदे घरासी चाल, मलाजे० ॥ १ ॥ भाळ घेतलि शारंगधर, माझीं गोधनें गेलीं दुर, तात

वाढ आता लौकर ॥ मला० ॥ २ ॥ हाति घेउन लाहानसा ढंडा, जलदिने करुन दे मांडा, दुर जातिल गायींच्या झुंडा, मला० ॥ ३ ॥ आई पुरणपोळी बरी, कांदे घालुन भरीत करी, मला दह्याची आवड भारी ॥ मला० ॥ ४ ॥ आई मला करुनदे रोटी, वरघालुन साखर पिठी, घोसाळ्याची आवड मोठी ॥ मला० ॥ ५ ॥ आई मला करुनदे पुरी, माझि खाजी करंजिबरी ॥ दुध घाल भातावरी ॥ मला० ॥ ६ ॥ आई मी तुझा एकुलता एक, गायी वळिओ नऊलाख, पाय फुटले झिजलीं नख ॥ मला० ॥ ७ ॥

गाणें ४१ वें, गाय.

हुंडी भिवरी पारि काशिला ॥ आग लगो या गाईला ॥ जाति कुणब्याच्या शेताला ॥ जोंधळा खाउन उडविला ॥ तेंव्हां कुणबी धांवत आला ॥ वळतांच पायिं कांटा मोडला ॥ गायी टाकुन आलो घराला ॥ अ० क० ॥ गायी ऐकेनात मला ॥ कृष्ण-बोले यशोदेला ॥ गा० ॥ १ ॥ आइ मी तुला सांगतो स्पष्ट ॥ गायी पळती वाटोवाटा ॥ वारे - मालण दोघींची जुटी ॥ कणसांवर घालिती मिठी ॥

गाई बळल्या यमुनेतटीं ॥ धनि तिचा जगजेठी ॥ कृष्ण० ॥ २ ॥ फुतळी सारंगी पाणि पीईना ॥ राहि गुरामधें मीळेना ॥ गजि बासरू घेइना ॥ मथुरेला खील फूटेना ॥ नागि माल्याला ऐकेना ॥ माळिण गौळण चरेना ॥ योशि नाचते दणदणां ॥ कृष्ण० ॥ ३॥ कैसाबोले शारंगधर ॥ गायी पिळाल्या कुठवर ॥ अंबि भवानि मोठि बंदर ॥ दिलि लाथ गुडघ्यावर ॥ भांडा रिला नाहि सूमार ॥ गजि स्वैर करीना वर ॥ कृष्ण ० ॥ ४ ॥ काळि ताप गाय धाकुटी ॥ हंबरति बासरा साठी ॥ सुभि तिला चौकार पिटी ॥ धरहरणीच्या शेपटी ॥ तिला छंद लागला चोरिचा ॥ मार्ग धरीना घराचा ॥ कृष्ण० ॥ ५ ॥

गाणें ४२ वें, गाय.

उठ लवकर श्रीरंगा अती स्वयंभा ॥ दारि अरुणोदय झाला पडली प्रभा ॥ उठ गोविंदा जनार्दना पद्मनाभा ॥ उठ लवकर मुकुंदा मुरारी लक्ष्मी वल्लभा ॥ उठिउठि बाळा शोळा दूध देइना ॥ उंच सोरटची हात माझा पुरेना ॥ ही तेलंग कपिली धारफोडिना ॥ ही डांग वऱ्हाडची जवळ येउ देईना ॥ चा० ॥ उठ

कृष्णा ॥ तुला येइना किंव ॥ नेमांडी सरकुन धांव ॥ फिरवुन आणि तुझी सव ॥ ही पंजाबी मोठि तामसी नंदनंदना ॥ लाहोरी रत्नागिरी उडे टणटणा ॥ अ० क० ॥ यशोदा म्हणे उठ कान्हा मनमोहना ॥ सोडि वत्से कपिला भजला दूधदेइना ॥ १ ॥ बंगाली करडी हुंडी दावी तोंडी ॥ कानडी बुडी दुध थोडी मडकी कोडी ॥ हिंगूळ देशिची नाजुक मोठि हर्बुडी ॥ वत्साला लागू देइनो धर पडपडी ॥ रवि वर येतो उठरे शारंगधरा ॥ तुझ्या यौवना पाशि नंदझाला म्हातारा ॥ आम्ही कोधं नसतों तूं तर दोहशीलबरा ॥ दोहिं हाती विरजा दारि पडला पसारा ॥ चा० ॥ उठकृष्णा टाक एक पेंढी ॥ पान्हवली बुंदेल खंडी- काशीची मिस्कील मेंढी ॥ तळकोकणचि कास लांडी ॥ माळवी हुलसुंग लावि सोसेना ॥ कोंदणवाडी पळू- नजाई हाती लागेना ॥ यशो० ॥ २ ॥ जुन्नर देशीची हरणि मोठि लांबोर ॥ जुन्नर देशीचा गवळि धरीना- धिर ॥ नागपूर झाडची पोंवळि मोठि सुंदर ॥ गुजराथी निसळ ढवळी दिसे शिंगसर ॥ मोहरी कांतवडी झटकुन मारी लाथ ॥ बाणकोट देशिची गायि- राहिना वाड्यात ॥ मिठिगौड देशीची पालू देईना हात ॥ पारड देशीची पळून जाई रानात ॥

खान. देशिची भिवरीपिशी ॥ मानदेशिची लाल गोमाशी ॥ अहेरदेशिची दुध नाहि देशी ॥ वाई-देशिची पान्हा चोरिशी ॥ हीसूर, देशाची वांझ कधीं फळेना ॥ गायीमध्यें गौणाकार दुध खंडेना ॥ यशो० ॥ ३ ॥ उठ धूण्याची भटपडो जळो तुझी झोंप तुझी ॥ आतातरी गोधने सोडि ऐक विनंती माझी ॥ वदनं प्रक्षाळून बापा वाढिते तुप सोजी ॥ गोधन घेउनी हरी जाई बंनामाजी ॥ दारिं अरुणोदय झाला उठलीं पक्षीकुळं ॥ तुझिवाट पाहती दारि उभे गोपाळ ॥ मच्छ कच्छ वराह नारसिंहरूप विक्राळ ॥ वामन परशुराम राम कृष्ण सुकुमार ॥ चा० ॥ बौद्ध कलंकी तुझेषा-गडीं आले ॥ तुजसंगे खेळू लागले ॥ शाळूकी वस्ताद बोले ॥ चतुर म्हणे फलगिला मोत्याचा दाणा ॥ शाइ सुरत कृष्णाजीं रुक्मिण म्हणा ॥ यशो० ॥ ४ ॥

गाणें ४३ वें, राधाविलास.

रात्रिच जन्मलें, गोकुळासि गेले, देव नंदाचे सदनीं ॥ आगम्य लीला याची, नकळेचि बाळलीळा; वैजयंती माळगळा, म्हणते नंदराणी ॥ एके दिवशीं ऋषि

केशी, बोलतसे यशोदेसी, 'बाई दे मला तरणी ॥ वेडयामुळा, राहे उगला, बागुल आला, 'नेइल तुला टाकिल गिळोनी ॥ दाखीवत्याला बागुलाला, त्याचिच आवड मला, होजननी ॥ रडतसे श्रीरंग, पाल खात लागवेग, टाकोनिया रागराग गेली यशोदा भुवनीं ॥ चा० ॥ आलि आवचितें राधा, माधवा घेई कडिये ॥ चल माझ्याघराला, बाह ते तूज गडेये ॥ चा० २ ॥ देव हास्य वदन करिमुखा, देवसखा ॥ सोळासहस्त्र अष्टनायका, बायका ॥ राधेच्या पूर्वार्जित लेखा, आयका ॥ यशोदा म्हणे राधिका, नेसखा ॥ चा० प० ॥ आखाळ बाळमांझ, संभाळ बाई यान फिरकिर मला केली ॥ तेथूनिया, घेउनिया निघूनिया, राधागेली आपुल्या रंगमहाली ॥ अ० क० ॥ ऐका श्रोतें श्रीकृष्णानें कशीमाव केली ॥ आखाळ, नंदबाळ, फोडुनिया बंदिशाळ, गोकुळात व्रजपाळ; राधाभोगिली ॥ आणुनिया राधिकेन, वाढुनिया भोजन, नवनित भक्षिवलें ॥ माझ्याघरीं श्रीहरी, नित्यकरी, क्रीडा सारी, परोपरी, शद्ब बोले ॥ रूप बुंद, राधा धुंद, आंगींमंद, मदन शरीर, घूर्णझालें ॥ असे वाटे, धाकुटे, बाळमोठे, व्हावे नीट, भेटमटा चुंबिगाल ॥ हरीसखा, त्याने नखा, भीतरी त्रिभुवन, साठिवल ॥

चा०प० ॥ राधे हृदयीं गुज, अंतर देवासी कळ लेहो ॥ त्रीभुवन पाळी, पाताळी बळीस घालि बळे हो ॥ होउन अज्ञान, गोकुल त्याने भुलविलेहो ॥ चा०२ री ॥ राधेचा मनोरथपुरा, आहेबरा ॥ देव झाला तिचा सोयरा, तोखरा ॥ नित्य रोज येतो घरा, मंदिरा ॥ कुठे भेदनाही दुसरा, हरीहरा ॥ चा० प० ॥ एके दिवशी दिवसा, यशोदेचा कोंवसा, राधाघेउन निजली ॥ चापचित निपचित, आवचित कचित, पतिने दरवाजाशी हाक दिली ॥ ऐका० ॥ २॥ तिचा पति बाहेर, जगात जाहिर, आरोळया मारि तसे ॥ त्याची ध्वनि, ऐकुनि कानीं, मनीं भ्याली चक्र पाणी, आता होइल कैसे ॥ घेइल माझाप्राण, वाचिव समयास ॥ दयाळावा० ॥ मलाधारि, बरीवरी, म्हणुन देत श्रीहरी, करीऐसा ॥ जगाचा कोंवसा, झगे आता कैसा, धरु मी बाळ वेशा ॥ विनोदकरी श्रीहरी, बाळ-रुप माझ्याघरी न्याहारी करी; खाइ गोरस ॥ चा० मनिहर्षुनी राधा, पतिधीट खासा, होखासा ॥ ओसरि वर कान्हा, बैसला भोजनास हो ॥ तुम्ही कसलस बसवस आलांत कोठुनकैसहो ॥ चा०२री ॥ एकघडि व्हावे स्थिर, तेंबर ॥ मुल जस फूल सकुमार, बरबर ॥ मग उघडुन कुलुपदार, समोर ॥ देखिल मुल सकुमार,

झाला गार ॥ चा० प० ॥ म्हणे सदभावे स्वर्गिचे रावराजे, तुला गम्मत झाली ॥ याची आमची, गांठ काय पूर्वी विरंचिनें दिली ॥ ऐका० ॥ ३ ॥ सर्वा घटि, ता अंग नेठी, हारी, त्याची वार्ता फुटली ॥ राधे घरि श्रीहरी, खेळखेळे परोपरी ॥ शेय्ये वरी, मदिरी, खरी रतली ॥ राधिकेची सासुमोठी, लाग पाठी, जग जेठी, एवढया साठीं, माया लाविली ॥ आता येशी इकडे मग खाशी लांकडें ॥ मी रागीट आसली ॥ हारिभ्याले, तिथुन गेले, यशोदेशी म्हणे मला, भोजनाशी, साय घाली ॥ चा० ॥ कोणे एके दिवशी ऋषिकेशी गेले बाहेरी ॥ ओसरी वर राधा, मंथना आरंभ करी ॥ तेव्हां दृष्टी देखिली, सावळी सुरत गोजिरी ॥ चा० २ री ॥ रित्या डेऱ्यात घालुन रवी, हालवी ॥ सासु सुनेला वेडावी, देखिवी, आला बाहेर कृष्ण लाघवी, बोलावी ॥ ये वाडया म्हणे, खुण-दावी, पालवी ॥ हारि मोठा नाटका, गावांत चेटका, त्यान म्हातारी पाहिली ॥ आणिक एकाघरी, चोरि करि श्रीहरी, मडकीसारि फोडिली ॥ ऐका० ॥ ४ ॥ एके दिवशी राधिका, जाता जाता उदका, गेली नंद द्वारीं ॥ गाद्रापिठि वनमाळी, राधा आलि प्रातः काळीं, आश्रु गाळीं, तयेवेळीं, राम प्रहरी ॥ राधे कडे. पाहे

वृषभाचि दें हे, राम कृष्ण पूतनारी ॥ आलि यशोदा ह्मणे गोविंदा काय प्रेमानंदा हारि मुकुंदा मुरारी ॥ चा० ॥ पुढं पाहे पाहे, दोहि तास वृषभ की गाय ॥ हारि ह्मणे होमाय, गायीच काम काय ॥ घेमरोनी भरणा, श्री कृष्ण वेतं आहे ॥ पुढें यशोदा पाहे, तव राधा उभी आहे ॥ चा० २ री ॥ ह्मणें काग उभी राहिलीस, बोलतसे ॥ माझ मूल केल वेड पिस, रात्रं दिस ॥ गेली निघुनी गृहास, जाउन बसे ॥ राधा विलास बहुसुरस, गोडअसे ॥ कविचे नावकाय, निळकंठ राव, नागनाथ त्याचि माउली ॥ नित्य वाजे चौघडा, वाजतसे घडाघडा, वस्ति गिरिवरली ॥ ऐका० ॥ ५ ॥

गाणें ४४ वें, राधा विलास.

चाल (आज गडे वसंत खेळु चला, बोलली राधा श्रीहरीला०)

ही मदन मूर्त लावण्य, पाहुनि भुलल्या व्रज भामा ॥
कांही निमित्य करिति बळे, पाहु येती मेघ श्यामा ॥
गृहि फारच छळितो मला, तुला देखोनि समजे शामा
॥ मी लग बग धंदा करी, तवर आवरी मेघ श्यामा ॥
कांही ईच्छा होति मनी, तीचपावली आली धामी ॥

अ० क० ॥ व्रज भुवनि यदुनायका, राधिका तरली तव नामीं ॥ १ ॥ निज डोलंहारा बसविते, हालविते, मंजुळ गित गातें ॥ कर्णात हालति कुंडलें, बाजति ब्रिद कंकण हातें ॥ मुखचंद्र दिसे गोजिरा, हारिचा हालवेना पाते ॥ तुज वरुन, तनु कुरवंडी पडो या संसारा माजी ॥ जरि थोर अससि कानया, तुझ्या भक्तिनें छळा कामीं ॥ व्रज० ॥ २ ॥ श्री कृष्ण म्हणे राधिके, कवाडा कुंजी कर खासी ॥ मी व्हान होतो थोरला, विलंब न लागे मज पाशी ॥ बोलता शिघ्र तो होई, सावळा दिसे सगुण राशी ॥ घाबरोन लाविलें द्वार, चाकित होउन पाहते त्याशी ॥ करि धरोनि, राधा हारिनें नेलि मग सुख शेजेसी ॥ आनंद सागरा मध्यें, चहुं कडे पाहे शून्य शामीं ॥ व्रज० ॥ ३ ॥ ती वृषभानुचि सुता, व्रतां मध्यें विसरे तनु भावा ॥ या आमृत डोहि कसा, विषानें साधिला दावा ॥ घेउनिया खांदि कावडी ॥ आला आनया गेला गावां ॥ कवाडा वर मारिली थाप, मनि समजे भलता कावा ॥ ये बाहेर झट, लवकरी, उघडी ही कडी वदे तावा ॥ मग चमकुन उठे कामिनी, उठा कि म्हणे यदुराया ॥ हा समय दिसेना बरा, घरा आले ते सदनीं मम स्वामी ॥ व्रज० ॥ ४ ॥ कंपिता सखि ती सती, जोडिते हात यदूरामा

॥ होई पहिल्या परिकानया, राखी आब्रू पडेत पाया ॥ श्रम माझा पडला जगि, लोक म्हणतिल मिथ्या माया ॥ संसारा पडलं पाणि, हांससि कैसा विश्रामीं ॥ व्रज० ॥ ५ ॥ श्री कृष्ण म्हणे राधिके, कपाळा गोष्ट आलि खोटी ॥ हामंत्र मज आठवेना, करून पाहतो खटपट मोठीं ॥ कृष्णा गोविंदा हरि, माधवा पसरितसे ओटी ॥ कांही करूणा येउदे मनीं, पाहा आरडा झाला ग्रामीं ॥ व्रज० ॥ ६ ॥ आतां शेवटाचि ही भेट, धरि पोटी यदुरायाशी ॥ हात पाया लाविलि-शाल, मरुन जावे मंचकवासी ॥ आतां मूख दिसेना कधिं, वदन चुंबित भरली घामीं ॥ व्रज० ॥ ७ ॥ मोडुन कपाट वाड्यांचें, आले गोकुळिचे जन सारे ॥ सळ सोडुन कि आनया, शस्त्र घेउनिया निवारे ॥ मज साठीं तुला कानया, आता दुर्जन करितिल मारे ॥ आता फाशि पडलो गडे, मरण कीं या खोटया कामीं ॥ व्रज० ॥ ८ ॥ मोडुन कपाट द्वाराचें, आला आनया मंचक पाहे ॥ लपटली पटांतरि दोघे, देखिली कृष्णाचि निजला हे ॥ हाटकुन मारावयासि, दुशाला काढि लव लाहे ॥

गाणें ४३ वें, शेज.

ये मंदिरांत वनमाळी, कुशल, सुमनाची शेज केली ॥ सुगंध कचोळी भरली, तबकांत नागवेली ॥ लख लखाट दिप सदनीं, मधुर कोकिळा शब्द करिती ॥ कुमुदिनी आवल्या शिणल्या, चटकल्या चंद्र कांनी ॥ नव मल्लु जाती कुसुमें, चमेली नाग चंप माला ॥ शेवती मालती. तगरी, मुचकुंदकुंदफुलला ॥ २ ॥ शतपत्र कमल फुललें, बकुळ पारिजात मंदार ॥ गुलछब्बु सुवासिकचंपा, गुलदावर गुलसेरा ॥ गुल तुरा गुल मेंदी, गुछलडी गुलाब गुलदवणा ॥ केतकी कन्हेरी मर्वा, पाटली शिव कांचनी ॥ अ० क० ॥ हारि अजुन नये गडणी, सुमन सुकली गजगमनी ॥ श्रीधरा धरि कर पर्णी, राधिका वचन मानीं ॥ १ ॥ शेंदुरी त्रिकाळीची, रंग सुरंग केवडयाची ॥ केशरि सुमन पिरंगा, मन गंगा वन उत्राची ॥ आवंध्या वनांत बहु फिरले, कुंडा घुंगिरा मेळविले ॥ चंद्रिका कुमुदिनी फुलल्या, नव पलव पाल्वले ॥ हा पीत वर्ण कोन्हाटां, तोडिता करी रुते काटा ॥ आरक्त जासवुंद फिरकी, आणिक गेंद भोवतां ॥ पालाश तरु फुलले, सुरंगी पुष्प मना रमलें ॥ नव मेघ रंग तुळशीचा, मंजुळा सखे श्रीहरीला ॥ वेदना मदन बाणी, प्राणनाथ मुकुंदा आजआणी ॥ भोवळे मात्र दाउनिया, तो सम-

जेल जा वचनीं ॥ हारि० ॥ २ ॥ आग या शिवास तूं पुसकीं, कधिंहें मुकुंद येतिल कीं ॥ दोन्हीं नेत्र चकोर मम शिणले यदुवीरा 'वीण रुदती ॥ मीन वाट कम ळिनकीं ॥ काय गोविंद भ्रमेल नाहिकीं ॥ तो तमाळ-तरु माधव, मी समोंवतीं वल्लीकीं ॥ मुद्रिकानाथ राजा, हिरा जडला प्राण माझा ॥ "आकर्ण नयन मुरारी, वाहले दिव्य तेजा ॥ मी चपळ तरंगिणी, हारि राउत पंकजपाणी ॥ रणरंगी जैशी रंभा, तू फिरंग मी पाणी ॥ तूंमेघ मी चपळा, नाग चंपा तूं मी माळा ॥ श्री कृष्ण करी गर्जना, मन मयुर मी नाचविला ॥ तूं हंस मी हंसिणी, भोंवती फिरे चक्र पाणी ॥ हारि दिनानाथ आणी, सूर्यकमळ मी तो तरणी ॥ हारि ० ॥ ३ ॥ अरे गिरधारी सुकुमारा, कृष्ण वर्षति ऋतु जलधारा ॥ तूं तमाल भिड साउलगे तूं ध्वनी मी ओंकारा ॥ हें हेम रत्न माले, रत्न खचित पदक मी त्या जडले ॥ तूं तनू भद्र पेटी गे मी निजानंदि भरलें ॥ तूं समुद्र मी गंगा, कधी भेटशील श्रीरंगा ॥ दर्शनें तुझ्या गोविंदा, पातकें कोटि जाति भंगा ॥ सावळ्या नंदकुमरा, गोपि वल्लभा चित्त चोरा ॥ चातकी वाहते तुजमी तूं घन वर्षे जलधारा ॥ तूं सुवर्ण मीं कांती, कृष्ण दीपका मीं ज्योती ॥ तूशशांक मी रोहिणी फांकलें तेज दीप्ती

॥ तूं कुसुमचाप वनमाळी, रती रंगले मि तुज जवळी ॥ श्री कृष्ण तुम्ही राधिका मी असो सदा जवळी ॥ हारि० ॥ ४ ॥

गाणें ४५ वें, राधा कृष्ण विनोद.

चार प्रहर रात्र गंमत, निजला कोणाच्या मंदीरात ॥ मीबसले वाट पहात, भोगून गौळणी आला येथ ॥ या पाहटेच्या प्रहरांत, मुखावर तेज नाहिं दीसत ॥ मग नेत्र झाले आरक्त, राधा पुसते विनोदांत ॥ चा० ॥ तुम्हि आनंतकोटि ब्रह्मांडनायका, हो ॥ माधवा ॥ तुम्हि चंद्रावळिचेसख्या, हो ॥ मा० ॥ तुमचे विळास करतिसख्या, हो ॥ मा० ॥ ओठ काळे झाले देखा, हो ॥ मा० ॥ कंकणे प्रथ्वीवरी ॥ रुतले हात घेउनबाईवरी ॥ अ०क० ॥ राधिकाम्हणे श्रीहरी ॥ रात्रक्रमिली कुणाचेघरीं ॥ १ ॥ मगबोले श्रीअनंत, राधे तुजवरता माझाहेत ॥ गायिगोधने चारित, पळून गायगेली बनांत ॥ तिशि धुंडिता पडलें जागृत, मुखावर नाहिं तेज दीसत ॥ ती एकेना को-णाचं, पाठी लागलों सारी रात्र ॥ चा० ॥ कायसांगु रात्रिचें सुख, ग ॥ राधिके ॥ वनि लागलीसे भुक, ग

॥ राधिके ॥ जांभुळें भक्षिलीं तिथ, ग ॥ रा० ॥ ओठ काळे जाहलेदेख, ग ॥ रा० ॥ तुझे दारा मारिले धक्के, ग ॥ रा० ॥ एक दार पाठीवरी ॥ येताना रुतलें तुझ्या मंदिरीं ॥ राधिका० ॥ २ ॥ राधिका म्हणे श्रीकृष्णा, तुमच्या गौळणी मला दावाना ॥ मंदिरास घेउन याना, दृष्टिने पाहिनं गोपांगनां ॥ त्यावांचुन तुम्हां करमेना, माझे मंदीर गोड लागेना ॥ मशिकां हो तुम्ही बोलाना, माझे हातिचा विडा कां घ्याना ॥ चा० ॥ कोणा गौळणिशी भाळला, हो ॥ मा० ॥ शिरपेच मोकळा झाला, हो ॥ मा० ॥ पुष्पांचे हार तुम्हि ल्यालां, हो ॥ मा० ॥ तुरा मस्तकिचा चूरला, हो ॥ मा० ॥ कुठेल्याऊं अबिर कस्तुरी ॥ येतो सुवास माझे मंदीरी ॥ राधिका० ॥ ३ ॥ श्रीकृष्णा म्हणें राधेला, नको उपर भाषण बोलू मला ॥ रात्रि गेलो होतो मळ्याला, माध्यान्हीं पुष्पें आणायाला ॥ आबचीत मेघवर्षला, तुरा जाईत माझा गुंतला ॥ त्याने पेंच मोकळा झाला, सत्यसांगतो राधे तुजला ॥ चा० ॥ पावसाने भिजुन चिंब झालो, ग ॥ रा० ॥ जाइच्या स्थळीं बैसलो, ग ॥ रा० ॥ पुष्पांचे हार नाहिं ल्यालो, ग ॥ रा० ॥ मंद्रिरीं तुझ्या मी आलो, ग ॥ रा० ॥ नाहि ल्यालेअबिर कस्तूरी

तुफान घेउ नको मजवरी ॥ राधिका० ॥ ४ ॥ श्रीरामा जय रामा, आनंत नामाच्या मेघःशामा ॥ तुझीअसे अघटित महिमा ॥ शेष वर्णिता झाली सीमा ॥ तूं परब्रह्म परमात्मा करशी भक्तांच्या पूर्ण कामा ॥ चा० ॥ देव राधिकेनेमोहिला, हो ॥ मा० ॥ दृढभाव धरुन पूजिला, हो ॥ मा० ॥ कवि रुद्रा पाशी दिला, हो ॥ मा० ॥ ठीकाण म्हणे जेजुरी, हरिदास ओळ चाले बिदिवरी ॥ राधिका० ॥ ५ ॥

गाणें ४९ वे, राधा कृष्ण विनोद.

चारी प्रहर रात्र कुणिकडे हरी तुम्ही गेला ॥ हें सत्य मशी तुम्ही बोला ॥ आलां उजडल्या प्रहरांत कुठे दंग झालां ॥ कुठे० ॥ नुर तुमचा दिसे उतरला ॥ कोण काभिन कोण्या सदनीं कुठे जागला ॥ कुठे० ॥ अरक्त नयर्नि रंग भरला ॥ चा० ॥ हें असें समजले मसी ॥ सत्य सांगावे ऋषिकेशी ॥ आंगी उटी पिवळि केशरी सुवास कस्तुरी ॥ अ० क० ॥ मशी बोला तुम्ही गिरधारी ॥ बोले विनोदे राधा नारि सख्या श्रीहरी ॥ म० ॥ १ ॥ सांगतो ऐक राधिके रात्रिची कथा ॥ वनि गाय हरपलि सुरता ॥ श्रम झाले माझ्या आंगीं

तिशी धुंडिता ॥ हें सत्य जाण तूं चित्तां ॥ नयन माझे शिणले बहुत जागतां ॥ हें तुजसि कळेना आतां ॥ चा० ॥ हें असे समंजलें मजला ॥ ठकविता माझे बोलाला ॥ तुह्मी कैबाडि करिता मजला ॥ तुह्मी कपटि बहुत कौंसारी ठकवितां नारी ॥ मशि० ॥ २ ॥ हरि हृदयीं खूण मावेचि कशि उमटली ॥ पृष्टित कंकणे रुतली ॥ मस्तकीं घाम बहु धडकि कां भरली ॥ तुरा चूरला मंदीलीं ॥ चा० ॥ खेळतां संगे गोपीशीं ॥ उधळिल्या हळदिच्या राशी ॥ ते पिवळें माझे अंगासि लागले भारी ॥ मशी० ॥ ३ ॥ भाके मी तुझ्य मांदिरी आलों झडकरी ॥ ती धडक भरली भारी ॥ येतानां तुझें ग दार लागलें उरीं ॥ तैशी खुण पृष्टी वरी ॥ नित्य नेम विडा घेतसे रुक्मिणी नारी॥ जांभूळ भक्षिलें अधरीं ॥ चा० ॥ भक्ताचि हाक ऐकुनी ॥ गेलों लगबगीने धाउनी ॥ मस्तक ओलें घामानि ऐक पद्मीणी राधिके नारी ॥ मशी० ॥ ४ ॥ विनोदांत कृष्ण राधिका मंचकी बसलीं ॥ सुमनानीं शेजही भरली ॥ मंचका हार तुरे गजरे तबकें भरलीं ॥ चतुर्भूज शयनीं वनमाळी ॥ चा० ॥ परब्रह्म हरीची मूर्ती ॥ स्मरतांच कामना पुरती ॥ राधा ही विनवि परोपरी तुजसि श्रीहरी ॥ मशी० ॥ ५ ॥

गाणें ४६ वें, राधा कृष्ण विनोद.

काल कृष्णा कुठे तुम्हि गेला होता क्रीडेला ॥ मुख-चंद्र बहुत कोमेला ॥ आरक्त लोचनें दिसती नील तमाला ॥ कुठे राग रंग उडवीला ॥ संतप्त होउनी काम ज्वरें बावरी ॥ अ० क० ॥ राधिका पुसे सुंदरी ॥ सांवळ्या सख्या तूं बोल त्वरित श्रीहरी ॥ रा० ॥ १ ॥ गायि चारित होतो गडी बहुतसे संगा ॥ बनि गाय पळाली गंगा ॥ तिच्या पाठि लागलो करी बहुत ती दंगा ॥ श्रम झाले माझें अंगा ॥ सारि रात्र जागलों डोळे शीणले भारी ॥ राधिका० ॥ २ ॥ मस्तकीं हरी तुज घाम कारे आला ॥ बहु धडकी भरलि उराला ॥ किति सुगंध येतो भारि तुझ्या अंगाला ॥ किति सांगुन ठकविशी मजला ॥ कोण सवत भाळली सांग मला कोंसारी ॥ राधिका० ॥ ३ ॥ फळ पुष्प आणाया गेलो होतो मी वनीं ॥ तेव्हां मेघ आला गर्जोनी ॥ झाड-खालि सखे मीं बसलो होतो गडणी ॥ त्या वरून पडलें पाणी ॥ त्या योगें सुगंध येत असे तुज भारी ॥ राधिका० ॥ ४ ॥ तुझ्या ओष्टीं कृष्णा काजळ कां लागलें ॥ कंकणहें पृष्ठी ठसलें ॥ तुझ्या हृदया वरतें

मुक्तहार उठले ॥ हें कृष्णा मज कां नकळे ॥ किति बोल बोलुनीं ठकविशी या वृजनारी ॥ राधिका० ॥ ५ ॥ वनिं जाता जातां जांबुळ म्या भाक्षिलें ॥ त्यानि ओंठ दिसतिल काळे ॥ तुझ्या मंदिरिं येतां द्वार मला लागलें ॥ तैसेंच पृष्टिवर उठलें ॥ समजुनी उमजुनी रागे भरसि मजवरी ॥ राधिका० ॥ ६ ॥ पुरे पुरे बोलणें कमलाक्षा नर हरी ॥ जाई उठून आपुले घरी ॥ काय करूं कृष्णा चित्त फिरे तुजवरी ॥ काम असेल नकळे परी ॥ हा स्वधर्म सांडुन झाले मी अविचारी ॥ राधिका० ॥ ७ ॥ समजाउन तेव्हां कृष्ण ह्मणे राधिके ॥ कां तुफान घेसी लटिके ॥ तुज वाचुन पर घर मला ठाउकें ॥ किति विनोद करसी लटिके ॥ प्रभु गोपालात्मज बोले ऐशा परी ॥ राधिका० ॥ ८ ॥

गाणे ४७ वें, राधा कृष्ण विनोद.

चाल- (नानानि बेल बाग बांधिली०)

बहु प्रीतीनें विनोदानें राधा काय बोलली ॥ माझे मला आज असें भासतें तुह्मा कडुन एक चुक घडली ॥ आज कां तुमचा नूर उतरला तोंडावर पिवळट

आली ॥ डोळे झाकुनीं शब्द बोलतां अशी अवस्था कां झाली॥ काय म्हणे खोटा उगाच बट्टा कीं लावतेस करतेस दंगा ॥ अ० क० ॥ चंद्र तुमचा सुकून गेला अहो हरी तुम्हि मशि सांगा ॥ १ ॥ ऐक ऐक राधिके सखे ग खरं सांगतो तुज जवळी ॥ वनीं गोधन चारित होतो घरासि आलो संध्या काळीं ॥ तशांत माझी गाय चूकली नांव तिचं काळी कपिली ॥ तिला मि धुंडित होतों सारी रात्र गावाची आळो आळी ॥ तिळभर कांहीं झांप मुचेना त्याने सुरत दिसते पिवळी ॥ डोळे झाकुनी शब्द बोलतो ऐक ऐक तूं वेल्हाळी ॥ काय० ॥ २ ॥ बोले राधिका यदून यक्षा बोलते भिड सोडून ॥ सुगंधाचा वास कशाचा येतो तुम्हा कडून ॥ गालाला कां काळे लागले पहा पहा डोळे उघडून॥ गोपिचंदन मधें थोडस कुंकू राहिलें दडून ॥ मशी चोरिता कशी केशी बोलता तुम्हि रंग ढग ॥ चंद्र० ॥ ३ ॥ काल जाईच्या झाडा खाली बसलो होतो मीं राधिका ॥ फुलें गळुन अंगावर पडलीं वास येतो सुगंधका ॥ लगबग लगबग जात होतो मीं खुंटा होता ताळि एक ॥ पितांबराचा सोगा गुंतला निरी सुटली म एक ॥ गोपिचंदना मधे अक्षत थोडि राहिली ग ऐक ॥ कानि लेखणी खोंचिता गालाला काजळ लागल तकित

॥ काय० ॥ ४ ॥

गाणें ४८ वें, काजळ.

अहो हरी काजळ कुठे लाविलं कालं ॥ कुठे हळद खेळला तोंड दिसतं पीवळं कां लाल कपाळ पिंजरचं कुंकू वेल्हाळं ॥ मुखीं बत्तिस पानाचा रंगला दिसे तांबूल ॥ अंगात झगा भिजला काय ओला झाला ॥ मी पुसतें तुम्हाला कुणीकडे घाम आला ॥ अ० क० ॥ कृष्णाजी खरं बोला कां झोपेत गुंग झाला ॥ कुठें रात्र क्रमिली नुर तुमचा कोमेला ॥ १ ॥ एक नारी सत्वर मी शाई करित होतो लवकर ॥ त्यांचं काजळ उडालं माझ्या गालावर ॥ निघता घराबाहेर वाघ्या आला समोर ॥ त्याने भंडार झोकिला माझ्या अंगा-वर ॥ गंधाचा आळस केला टिळा कुंकवाचा रेखीला ॥ मुखि विडा घेतला घाम मला बहु आला ॥ कृष्णा० ॥ २ ॥ ही मोहन माळ आज कशानं तूटली ॥ आसं मला वाटत कोण गवळण भेटली ॥ हरी हो झुलपाची गांठ कशी सुटली ॥ कोणा रमणिगृहिं जाउनी क्रिडा कुठे तुम्हि केली ॥ काल रात्री तुमच्या कोण होति शेजेला ॥ कां चोरि करितसां खरं सांगा हो मला ॥

कृष्णा० ॥ ३ ॥ ऐक नारि वेल्हाळे गाय चुकलि माझि पोवळी ॥ तिला धुंडाया गेलो संध्या काळचे वेळीं ॥ अवचित तेथें मोहन माळ तूटली ॥ लगबगिने येता झुलपाचि गांठ सूटली ॥ रुमझुम पाऊस आला जाइचा आसरा केला ॥ फुलं गळून पडलीं बास येतो शेल्याला ॥ कृष्णा० ॥ ४ ॥

गाणे ४९ वें, रास.

चाल (हेरेकाय कृष्णा लंपट०)

चुकलो मी रास तुजवीण केला ॥ वाटतसे बहु अन्याय झाला ॥ उठचल जाऊ कुंजवनाला ॥ तवतनुचा सुख उपभोग देशी ॥ अ० क० ॥ आज राधे मंदिरीं कां ग नयेसी ॥ कां सखे रुसलीस सांगे गुणराशी ॥ आ ० ॥ १ ॥ आतां तरी तुम्हा कळलें हो राया ॥ व्यर्थ कां म्हणतां मीतींची जाया ॥ तुजवर लाउन कांतेची माया ॥ आजुनी कां न बोलसी मशी गुणराशी ॥ आज ० ॥ २ ॥ उठ करी आतां आपराध माफ ॥ धरुनीया तीचा प्रेमानें हात ॥ चलवेगें जाऊं कुंजवनांत ॥ आतां नीट बेस्ल राधे मजपासीं आज० ॥ ३ ॥ राधिका बोले तुम्ही श्रीहरी ॥

गेला होता कां गोपिचे घरीं ॥ क्रीडा करुनिया आलि यथेस्वारी ॥ कृष्णचरणिं राधा विनविते दासी ॥ आज० ॥ ४ ॥

गाणें ५० वें, रंग.

नारि एका पारिस एक दिसती मृगनयना ॥ ह्या सकळ व्रजांच्या सुना चालिल्या मृगनयना ॥ चिखलि शेलारि भरजारि पदर पुढि चिमणा ॥ जशि आवड मनाचि तशि वसनें नेसती ललना ॥ नयनिच्या खुणा भुलविती प्रसन्न वदनां ॥ प्रसन्न वदनीं गोपिका राधेसह करि विचार श्रीहरी ॥ सत्कारभावें कारितसें नाना उपचारीं ॥ झाला उशिर उठा सखयांनो जाऊं नव तरणीं ॥ अ० क० ॥ खेळ होतां क्षणीं श्री हरिशी चला हातीं धरुनीं ॥ गोपिकांसाति खेळती गुजपुसति म्हणती आहो गडणी ॥ खेळ० ॥ १ ॥ एक बुका घेउनि मंदिरिं सुंदरी उठली ॥ एक नारि तबक घेउन आली ॥ एकहाति अत्तराचि कुप्पी घेउन भरली ॥ एकि पुढं एक विडया करुनि युक्ती दाखविली ॥ भलि जडावालि प्रीतिचि मोहनी दिधली ॥ कशि करावि वाट कृष्णाचि गांठ घ्यावि वचनीं ॥

खेळ० ॥ २ ॥ भरमुष्टि गुलाल उठिचंदन घेई गुजरी ॥ आग धीर धरी धीर माझ्या आधि काशि जाशी तुझी हजिरी करि रंग पुढें जरी ॥ धावंरलि गोपिचालितां रस्त्यां रस्तीं झाली दाटणी ॥ वृंदावनिचा सोयरा न चुकेवाट ॥ एक धरिती पदर एक करिती विनोद नवतरुणी ॥ खेळ० ॥ ३ ॥ गोपि भाग्यवंत असतांचिं आंतघेतिला भगवान ॥ ठसविला जेयेनें जसा श्रीकृष्ण नंदाचा कान ॥ जन्मला गोकुळीं त्यांनी मित्रजोडिला भगवान ॥ गित गांत ध्यांत महिपति तृप्त तूं फिरवा ॥ भाजिला आवा एकपदार्थ नदिसे हिरवा ॥ कशि करावि वाट कृष्णाची गांठध्या वचनीं ॥ खेळ० ॥ ४ ॥

गाणें ५१ वें, उद्धव.

कांहो प्रीति लाउन आम्हावर मथुरेसि जाउन बसला ॥ कंसादिक हे शत्रु निवारुन कुब्जे तनु वर मोहुन बसला ॥ आश्चय तिजला झालें लंपट नकळे काय हे सीं पडले ॥ चा० ॥ ही नीच दासि कंसांची हो ॥ ही० ॥ अमंगळ रहाटी तिची हो ॥ आ० ॥ काय गोडी अशा विषयाची हो ॥ का० ॥ मान नसे अपमान

जगांमध्यें निरर्थक बाई। डांगोरा ॥ अ० क०॥ आहो उद्धवा ऐका विनंती घनश्याम आणि व्रजपूरा ॥ १ ॥ कां थेवढे निर्लज्ज लाज नसे आवघेच त्यानें गुंडाळले ॥ अनन्य भावें भक्ति रसाचा रस पाजुनिया गिरकी-वलें ॥ मोठी कैटाळी विद्या बंगाली शिकउन हारिला वश केलें ॥ चा० ॥ आहो कुठे होती वैरिणहो ॥ आ० ॥ गोविंद मोहिले तिन हो ॥ गो० ॥ या कंसाच्या बट किन हो ॥ या० ॥ एका एकी काढुन नेले घाला घातिला खरा खुरा ॥ आहो० ॥ २ ॥ आगाध पुण्याची चिरकाल कुब्जा ह्मणून प्राप्त हरी तिज लागी ॥ आनंत जन्मो जन्मीं सेवा केलि मुक्तिं दिली निजरंगी ॥ आपुल्या हाती निदान हारविल भाग्य-नसे आह्मी आभागीं ॥ चा० ॥ करि विवेक आपुल्या ठायीं हो ॥ क० ॥ नाहि पुनः श्रीरंग बाई हो ॥ ना० ॥ आंतरला शेष शाई हो ॥ आं० ॥ हरी वाचुनि संसार कशाचा व्यर्थ वाटतो पसारा ॥ आहो० उ० ॥ ३ ॥ राम आवतारी वनचर मिळुनीं त्या हातीं असुर मार विले ॥ भाक्ति यास्तव हिंडे वनांतरी सज्जन जन पावन केले ॥ चा० ॥ असा दीनदयाळु हारि हो ॥ अ० ॥ भक्ताला पावन करी हो ॥ आवत-रले गवळ्या घरीं हो ॥ देव दत्त दत्तात्रय साहेब पदां-

बुजी दे मज थारा ॥ आहो ३० ॥ ४ ॥

गाणें ५२ वें, रुक्मीणी स्वयंवर.

(चाल आजि आकुरह्यानेतो श्रीकृष्णाला०)
मम लग्नाची बंधु कारि तयारी ॥ तोरणें उभी जनद्वारीं ॥ ध्वज छत्रानीं कुंडिनपुर ही नगरी ॥ दीसते सुशोभित भारी ॥ बहुदेशांची माणसें आलीं बहुसारी ॥ नगघालुनि फार शरिरीं ॥ चा० ॥ शालवादि नृपोत्तमा आलें ॥ गजरथांनी पुरहें भरलें ॥ वाद्यांनि बहु दुमदुमलें ॥ हें जाणोनिया का न मुरारी आला ॥ मजवरी कोप हा केला ॥ अ० क० ॥ अजि तातानें निश्चय केला मजला ॥ शिशुपाल खळा देण्याला० ॥ १ ॥ याधेनुच्या करिती सकलही नाशा ॥ घालेनि गळ्यातें पाशा ॥ मनि ध्यानीं मी तुला द्वारका धीशा ॥ आठवितें जगत् सर्वेशा ॥ बहु केली मी येशिल मनिं ही आशा ॥ केशवा नकारि निराशा ॥ चा० ॥ तुज जवळीं द्विजा धाडियेलें ॥ नायेई किति दिवस झालें ॥ तव कपट मलाहे कळले परि राहुदे ठाउंक जिव हा गेला ॥ नायिशी जसी स्वर्गाला ॥ अजि० ॥ २ ॥ आधि पासुनिं तुला मनानि मीं वरिलें ॥ संमजुनि

कार्येंह केलें ॥ मम अंतरिचें विचार तुज कळविले ॥ सांगणें आतां नच उरलें ॥ हें सांगे मी दोन दिवस जरी गेले ॥ दुष्टानि मज वेढियलें ॥ चा० ॥ करिदया नुपेक्षि आतां ॥ नलावि कराया चिंता ॥ ये लवकर कंस निहंता ॥ बहु मी रत्नें ओपिन द्विजवर याला ॥ जरि सफल मनोरथ झाला ॥ अजि० ॥ ३ ॥ तूंज जंगदंबे रत्न सुपंडित ओटी ॥ आर्पिन मी फारची मोठी ॥ ही देते मी भाक न होई खोटी ॥ आर्पिन हा जिव तुज साठी ॥ समजाउनिया त्यासी असे तो हट्टी ॥ तूं आण तया मम भेटीं ॥ चा० ॥ हे मंगल कारक देवि ॥ प्रार्थना तुवां ऐकावी ॥ तव वरद करा शिरीं ठेवी ॥ मग येईलहा कृष्ण भरवसा मजला ॥ बहु सौख्य मना देण्याला ॥ आजि० ॥ ४ ॥ तुज आळवितां संकटी यादवराया ॥ तूं सिद्ध तया वाराया ॥ मग अजुन येई न तुला ऐकाया ॥ मज गमे गाति तुज वाया ॥ त्यां गोपिनीं दृढ धरिले तवपाया ॥ आलासि त्यासि सोडुनीया ॥ चा० ॥ निष्टुर जरी हें कळलें ॥ मनलंपट तुजवरीझलें ॥ या साठी तुला विनाविलें ॥ नायेशी जरी येथ सुख्या सुरुपाला ॥ मग पार नसे शोकाला ॥ आजि० ॥ ५ ॥ मग कृष्णानें ऐकुनिया तो धावा ॥ सुदाम कारे जो कावा ॥ मी येइन हा निरोप विज कळवावा ॥ सांगितलें त्या

द्विजदेवा ॥ मगआला तोचंदुनिया त्यादेवा ॥ आनंद किती सांगावा ॥ चा० ॥ ती हर्षली भीमक कन्या ॥ मग ह्मणें असे मी धन्या ॥ नासौख्य फळतें अन्या ॥ बहु अर्पियली माणिक रत्नें त्याला ॥ संतोषित भूसुर झाला ॥ आजि० ॥ ६ ॥ रथ कृष्णानें सिद्ध करविला निघण्या ॥ भीमकज्या रुक्मिणी हरण्या ॥ जो आवत रला मुक्ति जनांते देण्या ॥ दुष्टा निर्दलन करण्या ॥ यश ज्याचें तें नारद तुंबर गाण्या ॥ मी भूलला मति त्या वघण्या ॥ चा० ॥ माधव ये कुंडिन नगरा ॥ उतरुनिया रिपुचमु भारा ॥ रुक्मिणी ते करी निज-दारा ॥ मग परतुनि हा ये सुखें नगरीला ॥ गणपति प्रभु दिन झाला ॥ आजि० ॥ ७ ॥

गाणें ५३ वें, रुक्मिणी स्वयंवर.

चाल (उद्धवां शांतवन करजा०)

मत्पिता विदर्भाधिपती, भीष्मकायानामें नृपती ॥ शर्मप्रद कर्मठ सुमती ॥ धर्मशील निर्मल कीर्ति ॥ तत्सविध विप्र कृत सुकृति, प्रस्तव प्रसंगें सुदती ॥ चा० ॥ यदुराज दीन जन्न बंधु ॥ सज्जन कुल कुमुदवद नेन्दु ॥ सार सुंदर करुणा सिंधु ॥ वरयोग्य श्रवण

पथाये ॥ अ० क० ॥ आयके द्रुपद नृप तनयें मज वारिले श्रीयदुराये ॥ १ ॥ तै पासोनी साजणी माझ्या मनिरुचला यादवराजा ॥ कधि होइन त्याची भाजा ॥ मनि उपजली अशि निर्व्याजा ॥ वडिल हेचि ह्मणती योजा ॥ की सम्मत साधु समाजा ॥ चा० ॥ हे काड एकपरी दादा ॥ रुक्मया करुनी अतीवादा ॥ निंदुनियां बहुत मुकुंदा ॥ शिशुपाल योजि अन्यायें ॥ आयके० ॥ २ ॥ नेमुनिया विवाह काळा ॥ धाडिले मूळ शिशुपाला ॥ सवऱ्हाड संभ्रमें आला ॥ तो कुंडिन नाम पुराला ॥ उद्वेग जाहला मजला ॥ टोचला उरी जणुं भाला ॥ चा० ॥ पत्रिका लिहिली निज काजी ॥ द्विजसुदेव करुनी राजी ॥ धाडितां द्वारके माजी ॥ पवनसा जवन तो जाई ॥ आयके० ॥ ३ ॥ दुबळिचि विनंती विनयें ॥ कळविकि सूदेवें सदये ॥ आवधारुनिं निश्चळ हृदयें ॥ आंकूर दयेचा उदये ॥ कळंविता न कोणासही ये ॥ प्राणेश निघाला सदये ॥ चा० ॥ दारुकें आणिला नामी ॥ रथराज समिरण गामीं ॥ आरोहुनि त्रिजगत स्वामी ॥ मजसाठी आला लवलाहें ॥ आयके० ॥ ४ ॥ होतां हि गांजिवाजी ॥ बलदेव राव भाओजी ॥ गर्जत पथिरथ वाजी ॥ पातले कुंडिनामाजी ॥ भीष्मक त्या सादर पूजी ॥ चा० ॥ वाटला जिवाला

धारा ॥ आटला संशय सारा ॥ दाटला कंठ जलधारा ॥ नयनीं यें मनि नमुख मार्ये ॥ आयकें० ॥ ५ ॥ लागली हाळद शुभ काळीं ॥ बांधाची विविध धुमाळी ॥ न्हाणुनिया सोडि पिवळी ॥ चोळिवर मुक्ता जाळी ॥ नग शत नथ कुगडि बाळी ॥ मंडवळी मळवट भाळीं ॥ चा० ॥ लेवउनि मुजं अनुरागें ॥ वैवाहिक वैदिक मार्गे ॥ स्वस्ति वाचनादिक आंगें ॥ सारिली नृपाळें न्यायें ॥ आयके० ॥ ६ ॥ आंबिका पूजना साठीं ॥ निघतानां झाली दाटी ॥ रक्षणार्थ मम भट कोटी ॥ चहु कडे चालिति दृष्टी ॥ मागधादि धंडे मोठी ॥ चेदि पहित ज्यांचे पोटी ॥ चा० ॥ वाद्य संघ गाजत वाजे ॥ खेटके पहायाराजे ॥ मध्यें खिरुंद विराजे ॥ त्यांत मीं चालिले पायें ॥ आय के० ॥ ७ ॥ आंबिका वंदिली द्वारी ॥ पूजिलि विविध उपचारी ॥ मीं दीन देवि अवधारी ॥ करी मजला हारिची नवरी ॥ शिशुपाल दुष्ट धिकारी ॥ हाप्र- साद मज विस्तारी ॥ चा० ॥ प्रार्थुनिया ऐसे निघतां ॥ क्षिति पति तति पाहतां पाहतां ॥ मोहिलि मज कडे पाहतां ॥ यदुराज दयेचे छाये ॥ आयके० ॥ ८ ॥ प्रभुंनें जन कोणी नगणिला ॥ मज समिप निज रथ आणिला ॥ देखतांचि तत्पद कमलीं ॥ वाटले नमावे विमला ॥ तव सदये निज कर दिधला ॥ घेतले

रथावरि मजला ॥ चा० ॥ निज सैन्य सहित रथ हांकला ॥ सिंहनाद कटकीं पिकला ॥ आनंद झाला सकळा ॥ चालके संभ्रमोत्साहे ॥ आय के० ॥ ९ ॥ नेताचि हरुनि नृपबाला ॥ कोल्हाहाल बहुतचि झाला ॥ परतुनि न्यावया मजला ॥ मागधादि भट झट उठला ॥ झटका बहु केला खटला ॥ पारि समरीं मागे हटला ॥ चा० ॥ मंडवळी बांधुनि बसला ॥ शिशुपाल सर्वथा फसला ॥ मनिं विषाद विषधर डसला ॥ पारि जाय घरां निरुपायें ॥ आयके० ॥ १० ॥ चवताळुनि रुक्मिदादा ॥ धांवला भिउनि अपवादा ॥ गाठुनि त्वरित गोविंदा ॥ मांडिलि मुखावरी निंदा ॥ झुंजला करुनि निर्बंधा ॥ शेवटी पावला बंधा ॥ चा० ॥ क्रोधा कुल यादव मल्लें ॥ क्षुर धार तिक्षण तर मल्लें ॥ भादरुनि विरुप केलें ॥ दाविलें कुतुक निजजाये ॥ आयके० ॥ ११ ॥ इतक्यांत भाओजी आले ॥ पाहुनि ते आनुज्या वदलें ॥ अनुचित हे अजि त्वां केलें ॥ यदुकुळांस लांछन आलें ॥ ऐसे बहु रागे भरलें ॥ रुक्मियास सोडुन दिधलें ॥ चा० ॥ रिपु कटक माघारे ॥ घटकेंत हारविलें सारें ॥ स्वभटोत्कट जयजय कारें ॥ द्वारके आले उत्साहें ॥ आयके० ॥ १२ ॥ भीष्मकादि

मंडळी सारी ॥ द्वारका पुरां माझारी ॥ पातले विविध संभारी ॥ कर पिंडनविधी संस्कारी ॥ वर्तलें सोहळे भारी ॥ प्रभुभक्त काजकैवारी ॥ चा० ॥ मी त्याचि श्रीपद पद्में ॥ सेवावी निरंतर नेमें ॥ कविपंत विठ्ठल प्रेमें ॥ हरिचरित दुरित हरगाये ॥ मायकें० ॥ १२ ॥

गाणें ५४ वें, रुक्मिणी स्वयंवर.

चाल-(-श्री कृष्ण म्हणे रुक्मिणी ऐक पद्मिणी) स्वरुप तुझें पाहुन० ॥ राजाच्या०).

माझा बंधु रुक्मया खळ ॥ परम चांडाळ, त्यानिं शिशुपाळ, वरयोजिला ॥ भीमकाचें राहिलेंबळ, झालें निर्बळ, पुत्र मातला ॥ तोनये आमुच्या वीचारा, भुवन सुंदरा, करि अतित्वरा, उशिर लागला ॥ लौकिक भावदाविता विचार पुसतां, आज्ञा नाला ॥ जगदात्मा श्रीपति, युद्ध हें किती, वधिसी एकला ॥ आतां केशवा माधवा, चला लौकरी ॥ चा० ॥ मार्ग लक्षित, बैसली रुक्मिणी नारी हो ॥ इतके ऐकोन, मनमोहन आला हारी हो ॥ मग तेथुंन द्विज घेऊन, आला नगराला ॥ अ० क० ॥ रुक्मिणी म्हणे कंसांतका, यदुनायका, लिहिली पत्रिका, पाहे वांचून ॥

भावानि दिलें शिशुपाला, धाव घननिळा, नेई मजहरुन ॥ १ ॥ कमलावरें, पत्रहाचिलें, चंचल झालें, चित्त अविचार ॥ केधवा लग्न लागेल, भ्रांतिफीटेल, करी-विचार ॥ चटपट जिवा करमेना, रात्र जाइना, सुदेव ब्राह्मणां, सांगे सत्वर ॥ आता कैसे करावें, सत्य बोलावें, नेमउत्तर ॥ त्यामद्या तट, नवस देविशीं, आधिपुजावे ॥ चाल ॥ गांवा बाहेरी, आंबिकातिये तुह्मीयावेहो ॥ सकळा दृष्टीं, मीवारीन मनोभावेंहो ॥ खरच सांगावें, सत्य बोलावें, नेमउत्तर ॥ ह्याच्या साक्षिला सूर्य प्रत्यक्ष, लाउनि लक्ष, चित्ता पासुन ॥ रुक्मिणी० ॥ २ ॥ कौडंण्य- पूर भिमकानें, शृंगारुन स्वस्थ बैसला ॥ वरासी मूळ धाडिलें, लग्न काढिलें अस्तमानालां ॥ चहुं वेदाचें ब्राह्मण, द्रुपद नंदन, आलें धाउन, विनवी त्याला ॥ सत्वर लावी हाळदी, बोलावा आधि, भिमक बाळीला ॥ मग बारा सोळा-जणीं, मिळुन कामिनी, पद्मलोचनी, ह्मणति बाइ चला ॥ भिमकिच्या ध्यानिं घननिळ, करीतळमळ, फ़र्द लागला ॥ लावण्य कनकलतिके, आणुन कौतुके, स्त्रिया न्हाणिली ॥ वेद घोषकीरती ब्राह्मण, हाळुच युक्तिनं, हाळद लाविली ॥ चा० ॥ वराडि आलें, दमघोष जरा संधाचे हो ॥ पुजिलि सेवंती, जानवसा गांवां मध्ये, हो ॥

आले वनमाळी, पाहुनिया ऐशी संधि हो ॥ सुदेव ब्राह्मण बोले हांसुन ॥ ध्या रुक्मिण चक्रपाणि, पळा घेउन ॥ रुक्मिण० ॥ ३ ॥ द्वारकाधिशें येणे केलें, त्यांनी पुजिलं, मग कृष्णासी ॥ आंबिका स्थळ हें वर, पाहुनि दिलं, तया राहायासी ॥ मग करुन सर्व शृंगार, रुक्मिणी नार, स्त्रियांचा भार घेउनि आसु-पास ॥ चालली भिमक नंदिनी, कमळ लोचनी, देवि पुजनांस ॥ यादव दळाचा धाक, रुक्मया हाक, मारि बंधुला ॥ जरासंध रायासी, म्हणे हो तुम्ही चला रक्षा-याला ॥ मग मिळुनिया सकळिक, मुधि घातली भिमक बाळी हो ॥ वाद्य वाजती, रथ कुंजर दाटी झाली हो ॥ पडली मोहनी, सैन्यासि भुलुन पडे उचलुन, रुक्मिणीस श्रीपती; घालुनि रथीं, पळे घेउन ॥ रुक्मिणी० ॥ ४ ॥ मग सावध झाले वीर, पळति दुरदुर, म्हणती सुंदरा; कुठे हरपली ॥ यादव घेउन पळाले, ऐसे कळले, मात फाकली ॥ बळीभद्र तिये आरोळी ॥ मांडिली खळी, कठिण वेळ आली ॥ कौरवें घेतिलं भय गेलें निघुनी, कितीक बुडाली ॥ नासिकास लाविला चुना, सोता मेहुणा, टवाळी केली ॥ चा० ॥ श्रीकृष्णासी, भिमकिने घातली माळ हो ॥ मूळ माधवीं लागलं लग्न निश्चळ हो ॥ प्रकृति पुरुष

मिठी पडली तोंचि घननीळ हो ॥ गुरुचित्त गहन तिथीचें लग्न, घावें सांगोन, रुक्मया होता कोण आणीकपूराण, पहा शोधुन ॥ रुक्मिण० ॥ ५ ॥

गाणें ५४ वें, रुक्मिणी स्वयंवर.

चाल (भूमिबाळा, ह्मणे नृपाळा०)

विदर्भ राजा जनितामाझा त्याची भाजा शुद्धमती ॥ तिचे वांचले पांच पुत्र ते पांच विषय जणु आवर्तरती ॥ सखे परिस त्या परिस लहान मी परी सकळांची आवड ती ॥ बाळपणी यदुपाळ कथेचा सूकाळ झाला दैवगती ॥ संत घराला संतत येती तिथें उसंत घे नृपती ॥ मला पाहुनी बलानुजाचे गूण आला पुन कळविती ॥ नित्य यथा मती कथांमृत पितां वृथा जाईना दिनराती ॥ उपवर झाले म्हणुन नृपवर मायबाप वर विचारिती ॥ ह्मणती अनन्या धन्या कन्या द्यावि हरिला स्वयंवरी ॥ क०क० ॥ कमलनयन हरी विमल चरित तो नवरा-त्याची मी नवरी ॥ भीमकबाळा ह्मणे नृपाळा त्या शिशुपाळा मी न वरी ॥ कम० ॥ १ ॥ रुक्मि माझा व-डील दादा आह्मा साहामधीं मोठा ॥ शहाणा परंतु हरीचरितांमृत रसांत न भिजे मणीगोटा ॥ माय

बापहि कांपत ज्याला या परमार्थाचा तोटा ॥ धाइट धाइ खोड तयाची आई बापाशीं उलटा ॥ व्रत विचारा नये विचारा त्या व्यभिचाराच्या वाटा ॥ गोविंदाची तिनदां तिनदां निंदा करितो खलखोटा ॥ भव दैवाला टाकुनि चैद्या घा घा म्हणतो आड मूठा ॥ गोंधळ निश्चय खूळ मांडिलें मूळ धाडिलें चैद्यभटा ॥ पांडव महिले मग त्या लिहिलें श्लोक सात हे तक्रारी ॥ कमलन० ॥ २ ॥ सुदेवाख्य सुदेव धाडुन वासुदेव मी आणविला ॥ इकडे मागध झाले घेवुनि दमघोषाचा मूल आला ॥ वन्हाड सारे बराड त्याला विराट सेना पराधिला ॥ लग्न सराई ऐके बाई घाई झाली भाइ जिला ॥ हाळद लाविते जणु हळाहळ हळहळ मोठी चित्ताला ॥ बळे दटाविती खळ दमंना विण बळद वाटले घर मजला ॥ महाली न्हाली काली झाली भालीनाहीं जिवाला ॥ अकस्मात तो आधिज्वर हरमुनिवर येउन पोहोचला ॥ प्रथम मुखश्री कळवी द्विज मग यदुपति आला धीरधरी ॥ कमलन० ॥ ३ ॥ श्रीगुरु पाशी नमनें सुमनें पूजा आर्चा मी केली ॥ चिंति गुरुपद चिंतामणी मग चिंता विल्या प्रतिगेली ॥ खलदमनाच्या आगमनानें आग मनांतिल विझविली ॥ धाकें खळबळ चट खळबळले उगे चतोंडें तै मुकली ॥

यादवदळ बळ जळानिधि तुंबळ सह बळभद्रहि बळ
शाली ॥ पाठिबाई पाठो पाठी गांठी कोभा ढिक
पडली ॥ जनक तसा मम जनक सुजन कवी भजन
करित ये पदचाली ॥ मोरां सम सामोरा जाउनी तेणे
पुजिला वनमाळी ॥ सति यतिपति गति स्मृतिनुति नति
नें जो अतिपतिता प्रतिहारी ॥ कमलन० ॥ ४ ॥
कुलधर्मंचि कुळदेविदर्शना हे नृपकन्या चाल
विली ॥ अकर्सरलेखल तस्कर लष्कर माझ्या भोंवती
रखवाली ॥ पूजी ते दिशीं खुशी झाले हरिविंशी शिव-
सति मनि नवसिली ॥ प्रसन्न झाली गौरी शौरीचि न-
वरी होशिल कीं वदली ॥ माय नमुने मी धाई जाई
जंव पाय पायरी तळिघाली ॥ झाले मुर्छित मेले गेले
उलथुन पडले किती खाली ॥ घेरि तयाला घेरित मी हरी
हेरित हेरित वरी सुचली ॥ लगबग लगबग भगवंत हि ये
सगळीं तगमग मगशमली ॥ तमाल निळ हे आमाल
लवणी समान मजहे रथावरी ॥ कमलन० ॥ ५ ॥
रथांग पाणि यथामतिनें रथांत बसवुनिया नेती ॥
मग काविति मार्ग काढिति मागभ शास्त्वहि चैद्यपती ॥
बहु गजबजले हायगज सजले तजविजी भुजके आ
टोपिती ॥ गडबड करिति तडतड तोडिती घडघड
भूपति पिटाळती ॥ किती भट भटकती किती भट

हट किती कटकी कटकट किती करिती ॥ चटपटके मनीं झटपटके परस्पर लटपटके चटहटती ॥ लटकट कांपती, खट खट करिती, वटवट रणीं पटपट मरती ॥ अरि धरि हरि त्या हारि वरी करि पारि आटी सारि करिति पारि हरिती ॥ विजय सख्याला जय जय करें मी तशि विजयी श्रीहरि वरी ॥ कमकन० ॥ ६ ॥

गाणें ५५ वें, रुक्मिणी स्वयंवर.

चाल (कोंवळी तनू, मदन पूतळा०)

द्वारका धीशा, त्वरित येई हो ॥ चैद्य जंबुका मही स मग्र छेदणार व्याघ्र तूं शिघ्र होई हो ॥ अंबिकालयीं भेटि देइ हो ॥ त्वरित येउनी गोवि गोउनि स्ववधु घेउनि शिघ्र जाई हो ॥ पतित पावना, येइ लवकरी ॥ अ० क० ॥ पत्र दीधले द्विजवरें करी ॥ वाचितो आनंद कंद तो मुकुंद मंद मंद हांसत नंद सुत श्री हरी ॥ पत्र० ॥ १ ॥. म्हणसि तूं जरी निर्लज्ज मानसी ॥ राजिवाक्ष सर्व साक्ष तूं प्रत्यक्ष अपरोक्ष लक्ष जाणसि ॥ विकल्प वाउगें मनि न आणसि ॥ धनमंदिप्र भिमक आप्त हेच

गुप्त करुनि तप्त मी तूं पण धार्णीसी ॥ पत्र० ॥ २ ॥ उठुनिया सुदेवास आदरें ॥ देउन क्षेम पुसि होम करुनि नेम सप्रेम वाहिवरें ॥ भीमकी तुझे वचन गोजिरे ॥ मी न पाहतां रुपास ध्यास हा जिवास तुझी आस अभ्यास सुंदरे ॥ नेमिल्या तिथी येइन मी त्वरें ॥ सांगता द्विजा गोष्ट ही खरी ॥ पत्र० ॥ ३ ॥ विवाह कारणें श्रीकृष्ण चालले ॥ त्यजुनि हा वृत्तांत मंदिरांत गोपिकांत नकळत रथांत बैसले ॥ नेमिल्या तिथी स्थान पावले ॥ अति कृतघ्न वीर निमग्न शस्त्र भग्न करुनि लग्न लाविलें ॥ मागध शिशूपाळ त्रासले ॥ गातसे होनाजिबाळ हे कृपाळ विमळ चरण दावि आपुले ॥ पत्र० ॥ ४ ॥

गाणें ५९ वें, पारिजातकाचें फूल.

चाल (जाउ कामाला०)

एके दिवशीं स्वर्गाहुनीं नारद आले द्वारकेंत ॥ भूवर येति ब्रह्मसूत ॥ आवचित कृष्ण मंदिरांत ॥ आसन देउन बहु आदरानें मुनिला हरि पुजीत ॥ नारद मु० ॥ कोठुन गमन केलें पुसतां ॥ स्वर्ग सुमन ते नारद भावें हरिला आर्पित ॥ भावें ह० ॥ तरुवर इंद्र उप-

वनांत ॥ श्रीकृष्णाने बहु प्रीतिनें दिधले रुक्मिणाला ॥ हारिनें दि० ॥ नारद लगबगीनें गेला ॥ अ० क० ॥ सत्राजित कुमरी बहु क्रोधें झिडकारी हारिला ॥ झिडकारी हारिला ॥ आतां मम मंदिरीं कां आला ॥ पारिजातक सुमन दिलें तुह्मी रुक्मिणी सवतीला ॥ दिले० ॥ आता० ॥ १ ॥ नारद उठुनि झडकरि येती भामेच्या सदनीं ॥ येती० ॥ बोलति तिजला हिणउनी ॥ स्वर्ग लोकिचे सुमन मी आणिले हारिला आवडीनें ॥ आणि० ॥ दिधलें रुक्मिणाला त्याणी ॥ वरवर बहु प्रीति दाखवी तुज वर भुलला रुक्मिणीला ॥ हारि हा मु० ॥ नारद कळ लाउन गेला ॥ सत्राजित० ॥ २ ॥ ते वचनातें ऐकुनी भामा क्रोधानें खवळे ॥ भामा क्रो० ॥ आक्रोशें भूवर लोळे ॥ तिच्या सख्या तिज सन्निध येउनि ह्मणती वेडाळे ॥ तिजला ह्म० ॥ कोणी तूजलागी छळिलें ॥ सखी वचनातें ऐकुनि भामा पुसितसे डोळे ॥ भामा पु० ॥ ह्मणेग हारिचें मन काळे ॥ येउ नका देऊ आज मम सदनीं काळ्या कृष्णाला ॥ कपटी काळ्या० ॥ आजवर श्रुत नव्हतें मजला ॥ सत्राजित० ॥ ३ ॥ श्री हारि उठुनि झडकरी येती भामेच्या महालीं ॥ येती भा० ॥ देखतां सुमन शेज मुकली ॥ त्याहाकुन पाहे मग मनमोहन भामाती

रुसली ॥ मंदिरी कोनासी बसली ॥ बहु प्रीतिनें श्रीकृष्णानें अंकी बैसाविली ॥ तिजला अं० ॥ ह्मणे ही काय गती झाली ॥ ह्मणे मज कळलें दूर व्हा नका पुसु मजला ॥ आग लागो त्या प्रेमाळा ॥ सत्राजित० ॥ ४ ॥ आज वरी मी समजत होतें मज वरी बहु प्रीत ॥ होती म० ॥ सोळा सहस्त्र नारीत ॥ हांसुन अमला जीर्ण युवतीला अंतर प्रीतीत ॥ मज० ॥ आमुची गरज आतां सरत ॥ स्वर्ग सुमन तें अमोल्यदिधलें भीमकीला खचित ॥ फु०हेमी० ॥ पट्टराणी ती असे सुरत ॥ हांसुन बोले राजिव नयन कोमजले बहुत ॥ नयन० ॥ दिलें मी न तुजलां या निमित्त ॥ अंका वरति घेउन तिजला वेणी गुंफीत ॥ स्वहस्तें कुंकुम चर्चित ॥ शेल्यानें अश्रु पुशित ॥ समुळ वृक्ष लाविन आंगणी बोले हारि तिजला ॥ भुलउनि एकाचि वचनाला ॥ दुर्गा गाई हारी लीला ॥ सत्राजित० ॥ ५ ॥

गाणे ५७-वें, घांवा द्रौपदीचा.

दिना नाथा दिनोद्धारा ऋषीकेशी, कोठेंतरी गुंतलासी ॥ कशी निद्रा लागली तुसी लुब्धला गोपिसी, विस-

रका बहिणीशी ॥ भक्त वत्सल म्हणती तुला यादि भिद्राला वागवीशी, कनवाळु म्हणती तुशी॰॥ चाल ॥ काय संकट पडले मुरलीधरा ॥ मार्गी भुललासी लक्ष्मीवरा ॥ कैसे काय झाले बा श्रीधरा ॥ कोठे तरी गुंतलासी ॥ पांडवसुना वनवासी ॥ मिळाले सहस्र अठ्यांशी ऋषी ॥ भोजन मागती धर्मासी ॥ उशीर कां तुशी लागला ॥ चा० ॥ २ ॥ लज्जा रक्षी आले महाराज ॥ लज्जा रक्षी चक्रपाणी ॥ क्षण एक टळेनां तुजवाचोनीं ॥ स्थाली पालथी ठेविली धुवूनी ॥ घाल उडी संकट सोडोनिया आया ॥ १ ॥ ये लवकर बंधुराया द्रौपदी करिते धाव धाव बा सखया, ये लवकर बंधुराया ॥ १ ॥ दोन प्रहर रात्र करुनियां, स्वारी घेउनियां, लंकापुरी शत्रु जिंकिला, यश दिले जानकीला ॥ लक्ष्मणाला लागली शक्ती करुनियां मुक्ती द्रोणागिरी आणिला ॥ थोर केले वानराला ॥ नळा हाती जो हूनि शिळा सेतु सागराप्रति बांधिला; लाड भक्ताचा पाळिला ॥ चाल ॥ अघटित करणी अवचित कळा ॥ करता करविता तूं घननीळा ॥ आहेस नामारूपा वेगळा ॥ जगत्र पालका धाव आतां ॥ बळी घालोनिया पाताळीं ॥ होऊनिया तयाचा द्वारपाळ ॥ तयाशी रक्षोनिया गौळी ॥ वेगें वनमाळी

धांवतसे ॥ चा० ॥ २ ॥ ऋषी स्नानासी आले. महाराज ॥ ऋषी स्नानासी आले मिळोनी ॥ जवळ नाही तिळभर अन्न ॥ कसं पाहून केलें कठोरमन ॥ अजुन कां माझी करुणा येईना माया ॥ ये लवकर बंधुराया ॥ २ ॥ धाव्याचा शब्द एकीला, मनीं दचकला, तोची श्रीहरी ॥ केली गरुडावरी स्वारी ॥ हातीं शंख सुदर्शन गदा पितांबर धरी, आले द्रौपदी कैवारीं ॥ सखा ब्रम्हांडाचा धनी, पाहिन निर्वाणी, कुबेर मुरहारी ॥ वळला पर्जन्य शिळाधारी ॥ चाल ॥ अनंत जन्मीचा सोयरा, पार नाहीं तुझ्या उपकारा, धर्म म्हणेगा परात्परा, शारंगधरा नमन तुशी ॥ आलिंगन देई माद्रिसुत, धर्मघाली साष्टांग देंडवत, अर्जुन जोडोनियां हात, आलिंगंन देऊनी भेटतसे, म्हणे कृष्णासी पार्थहासोन ॥ वेगेंद्या बहिणीचे दर्शन ॥ घाबरी झाली तुम्हा वांचून ॥ आधी मन समजावा तिचे जाऊन भेटाया ॥ ये लवकर बंधुराया ॥ आ० ॥ द्रौपदी जवळी येता देखिला, लक्ष्मीरमण, धरती त्याला कवटाळून, माझ्या साठीं धांव घेतली गर्मी झाली नारायणा, घाली वारा पाळवानं ॥ चाल ॥ द्रौपदीशी म्हणे बा जगजेठी, धांवतोची झालो मी कष्टी, आतां

क्षुधा लागली से मोठी, वाढताटी दहिं भात, द्रौपदी म्हणे भगवंता, तुं सकळ जनाचा अन्न दाता, तुंचि आलासी सत्व घेता, शरण कोणासी जाऊं मी चा० ॥ २ ॥ कांहीं तरी पाहे स्थालीत जाऊनी ॥ किती तरी अंत घेसील अर्जुनीं ॥ देखला भाजीचा देठ दृष्टीनीं ॥ घेतला हातावर बसले प्रितीनीं भक्षाया ॥ ये लवकर बंधुराया ॥ ४ ॥ भाजीच्या देठी तृप्त झाले रमाकांत, दिली ढेकर झाले तृप्त ॥ मायेचीं करुनी द्रौपदी जननी बसोंविली पाकांत ॥ दिले मंडप असंख्यात ॥ रांगोळ्या पाट हरोहरी समया चौफिरी केली तरतूद, बसली ऋषीची पैगत ॥ चाल ॥ सहदेव देतसे उटी गंधाक्षता लावूनी किरीटी, नाना तऱ्हेची पुष्पें गोमटी, षोडषोपचारें पुजियेली ॥ करदळी पाट मांडी भिमसेन, द्रौपदी समर्पी नानापरीची पक्वान्नें, घृत वाढी देवकीनंदन, संकल्प सोडूनियां धर्म बोले, करा स्वामी भोजन स्वस्थ बसुनीं, काय रुचेल ते घ्या मागुनीं, करितो प्रार्थना हात जोडूनी, लाभ झाला तुमच्या दर्शना थोर केली दया ॥ ये लवकर बंधु राया ॥ ५ ॥ उभा राहुनीं रमा कांत, हात जोडीतो, दीन होऊनी ॥ झाला विलंब म्हणुनीं ॥ तुम्हा योग्य सेवा न आली, पदार्थ घडुनी ॥ वनवासी एकटी बहिण ॥ तुमचे तुम्हींच

गोड करून घ्या धर्माकडे पाहुन, कृपा दृष्टीनें ॥ आशि-
र्वादें जाईल तरून ॥ चा० ॥ आजपर्यंत भोजन तृप्त
झाले, विडा दक्षणा सर्वांशीं दिधले, पांची जण चर-
णाशी लागले, धन्य पावलो ये स्थळीं ॥ चा० ॥
२ ॥ ऋषी ह्मणे ऐके पंडू सुता, धर्मा घरीं नैवेद्य
झाला आतां, बल्लव ह्मणे गा टवाळी करितां, तिळ-
मात्र ठाव न दिसे अतिसेवाया ॥ ये- लवकर बंधु राया ॥
६ ॥ उशीर झाला ह्मणुनीं रागे न भरावें चला लौकरी,
नेईन बांधून खांद्यावरी, ह्मणे मोठा जुलूम मांडिला
मृत्युला नाटक धारी, बळें बसवीन पात्रावरी, एकाच्या
नाकीं तोंडी शिरले पाणी, पळती बाहेरी, लोळताती
भूमिवरी ॥ चाल ॥ दुर्वास ह्मणे गा ठायासी, काय
उणे गा पदार्थासी, तुज वांचोनिया पृथ्वीसी, कोण
आहे गा रक्षितां ॥ दहा इंद्रियें अकरावें मन, तुंच
आहेस पंचही प्राण, तुंच आहेस सर्वज्ञ, तुंच माउली
तुंची पिता, अण्णा ह्मणे गा व्यंकट नाशा, माझी कां
दशा तुझी काया ॥ येइ लवकर बंधुराया ॥ ७ ॥

गाणें ५८ वें धावा द्रौपदिचा

चाल (नको नको स्त्रीसंग)

श्याम रंग नंद कुमरी धांव झडकरी ॥ कितीमंत

पाहसी आतां त्रिपुरसुंदरी ॥ भीष्म वचन पारिसतांच हृदय पोळलें ॥ कर्ण शकुनि अंधसुतें भाष्य घेतलें ॥ निः पांडवी करिन धरा उदय आवसरी ॥ श्या० ॥ १ ॥ गुंतलीस काय योगी हृदय मंदिरीं ॥ रुक्मिणिचे माहलांत मंचकावरी ॥ कामधेनु वत्स तुझे फोडी हुंबरी ॥ श्याम० ॥ २ ॥ निद्राभरें घोरतअसे सिंधु नापती ॥ जायतया शिबिरीं त्वरीत द्रौपदि सती ॥ कृष्णपद्म अंकीं घेउनि चुरीतसे करी ॥ श्याम० ॥ ३ ॥ दिन वदनी आळविते भगिनी माधवा ॥ मायबहिण श्रमली माझी म्हणत तेधवां ॥ घर्म बिंदु पुसत करीं कबरी सांवरी ॥ श्याम० ॥ ४ ॥ मुखचंद्र शांत पाहत द्रौपदी कडे ॥ घोर रजनीं आलिस आजी काय सांकडे ॥ प्रतिज्ञा दि थोर म्हणे शांतनवकरी ॥ श्याम० ॥ ५ ॥ हृदयीं धरुनि याज्ञसेनी ब्रह्म गहिंवरे ॥ पंडुसुत वाचवी केवी म्हणुनी घाबरे ॥ भीष्म शर जलद जाल-शांत तो करी ॥ श्याम० ॥ ६ ॥

गाणें ८८ वें, धावा द्रौपदिचा.

चाल (हो ज़ानत प्रीति रघुराई०)

गोविंदा धांव पांव या समयीं ॥ हे माधव धांव पांव० ॥

तूं होशी करुणाकर शरणांगत वत्सल झणुन करीं तव पदाचिंतन ॥ धांव पाव० ॥ १ ॥ येइ उपेक्षित ऋषिगण द्वारीं ॥ विमुख दवडिले परतुन त्याजरी ॥ क्वचित् हिरावुन मत्पतिचें यश नेली हाय सख्या करी घाई ॥ धांवपांव० ॥ २ ॥ विमल यशस्वी श्रीकांत युधिष्टिर ॥ होय सह बंधु चिंतातुर ॥ स्मरण तुझे हें हृदयीं करित तरी आतां धांव मुकुंदा घेई ॥ धां० पा० ॥ ३ ॥ श्रवणीं पडता हारी गजबजला पांडव सन्निध येवुन ठेला ॥ षडरस अन्न ऋषि तोषविले नेई गणपती तवपाई ॥ धांवपाव० ॥ ४ ॥

गाणें ८९ वें, धावा द्रौपदिचा.

मंदिरी उभी ऋतुस्नात ॥ तिथें आले कौरव दूत ॥ धरी वेणी अकस्मात नेलिरे नेली दुर्जनांत ॥ अ० क० ॥ यादवराया ॥ भाईयावे सोडवाया ॥ मिळाले वैरी विटंबाया नदिसेकोणी गर्जावया ॥ १ ॥ रंभे पाशी उभागज ॥ तैसा वीर भासतो मज ॥ गेली गेली माझी लाज ॥ झणुन आळंविते हारी तूज ॥ यादव० ॥ २ ॥ धर्मरायें धरिलें मौन ॥ शांती धरिली आर्जुनानं ॥ भीमें केली खालीमान ॥ नकुळ सहदेव झालेदीन ॥ यादव० ॥

कृष्ण आतां सावधान ॥ दूजा कोण राखिल मान ॥ गेलारे गेला माझा प्राण ॥ मग पाहसी काय येवून ॥ यादव० ॥ ४ ॥

गाणें ९१ वें, धावा द्रौपदिचा.

योजिले की दुर्घट ऐसे कौरवें विघ्न पाहा केलें ॥ खेळुनि कारिति पण फासे जिंकिलें पांडव जैसे ॥ दुर्मति शकुनी मग हासे ॥ शिकविलें कपट गुण कैसे ॥ चा० ॥ ही मंजसी पडली चिंता ॥ धांव पाव आतां यदुनाथा ॥ तुजवीण तरी मी आतां जावुं शरण कुणाच्या पायां ॥ अ०क० ॥ धांव धांव बंधुराया झडकरी ये विघ्न हराया ॥ ऋतुवंत मी असतां सदनीं दुःशासन आला कोठानीं ॥ दुष्टातें पाहोन नयनीं झरझरे मनपडे धरणीं ॥ ओढिलें धरुन मज वेणीं आणिले सभें लागोनी ॥ चा० ॥ दुर्योधन-शकुनी कर्णातें पाहोनी हर्षले मज ते ॥ विदूर भीष्म मग तेथें बैसलें कुळ बुडवाया ॥ धां० ॥ २ ॥ वाटतें श्रीहरी मजशीं; ही सभा लपवी व्याघ्रासीं ॥ मध्यें धेनु वेढिली जैशी ॥ गत पाहा आली मज तैशी ॥ सांडोन ह्मणती भर्त्यासी; ये अंकीं बैस मज सरसी ॥ चा० ॥ जसे सिंह स्वरें रणवीर, गर्जती तसे अनिवार ॥ अभिमान धरुनि मनी थोर ॥ करूं ह्मणती

नम्र ही काया ॥ धां० ॥ ३ ॥ करी करुणा मजवरी आतां, चतुरा तूं श्रीयदुनाथा ॥ क्षीर सागरीं अनंता, वससी तूं कमलाकांता ॥ बहु कीर्ति तुझी वर्णिता शेषादि श्रमले गुणगातां ॥ चा० ॥ येथें मज नाहीं, कोणी, एक त्या तुज वांचोनी, ये धांवत शारंगपाणी, दुष्टाचा गर्व हराया ॥ धां० ॥ ४ ॥ श्रीरंगा आतां तुजशी स्मरतां तरले किती भवपाशीं ॥ प्रल्हाद भक्त रक्षिसी, अढळपद दिले त्या ध्रुवसी ॥ जळीं पिडितां गजेंद्रासी, तत्काळ नेलें मोक्षासी ॥ चा० ॥ तूं केशव केशी निर्दलना ॥ भक्तांचे भव भय हरणा ॥ येधांवुन रुक्मिणी रमणा, हें संकट दूर कराया ॥ धां० ॥ ५ ॥ किती वाट पाहुं मज जवळी, आर्जुन कां नये वनमाळी, गहिवरुन ह्मणें पांचळी, नको अंत पाहुं यावेळी ॥ मी बहिण ह्मणुनया दुबळी, कां त्यजिली ममता सगळी ॥ चा० ॥ जरी येशी नां तरी आतां, त्यागिन प्राणतत्वतां ॥ पांडव पावती घाता, कायसे सत्व तवत्राया ॥ धां० ॥ ६ ॥ बहिणीचा भाव पाहोनी, कळवळला मोक्षदानीं ॥ द्रौपदि छळिली दुष्टांनी, अंतरी खुण जाणोनीं ॥ घेतली धांव पुढें चरणीं ॥ गरुडास मागें टाकोनीं ॥ चा० ॥ भक्तिचा देव भुकेला, कैवारी धावुन आला, द्रौपदि हर्ष चित्ताला, उभा पाठिसी वस्त्र पुरवायां ॥ धांव०

॥ ७ ॥ दुःशासन आसुडी नीरी ॥ सोडिली पहिली अंजेरी ॥ पैठणी नवी जरतारी ॥ चंद्रकळा खडिची कुसरी ॥ सोडिलीं चटक भरेजरी ॥ साडी हिरवी पाहा शेलारी ॥ चा० ॥ सोडिला लाल तापता, जांभळा आंत रातता, दोरवा रंग हा पुरता, आता काय उणे वस्त्रां या ॥ धां० ॥ ८ ॥ गुजराथी साडी भिंगाची शेंदरी गडद रंगाची ॥ निळी साडी बहु मोलाची, पेठ आणिली पाहा मथुरेची ॥ गंडेरी भंडक पदराची, वरकला बहुत हौसेची ॥ चा० ॥ पाहा काय प्रभुची लीला, स्वकरानें कृष्ण सांवळा ॥ नेसवी पितांबर पिवळा, केली माव भक्त रक्षाया ॥ धां० ॥ ९ ॥ हें पाहुन लज्जित झालें, सोडिना वस्त्र कर थकले ॥ वसनांचे पर्वत पडले ॥ नमुनि मग दुर्योधन बोले ॥ गरगरा सुदर्शन फिरलें ॥ हें प्रभुने अघटित केलें ॥ चा० ॥ धन्य धन्य द्रौपदि सति ती, पाहा त्रैलोक्यां मध्ये-कीर्ति ॥ मग सर्वहि मिळोंनी येती ॥ श्रीहारीला शरण रिघाया ॥ धांव० ॥ १० ॥ नाटक्या हारिची करणी, नये ती कोणा कळोनी ॥ आवतार दाहादां धरुनीं, रक्षिला भक्त निर्वाणी ॥ चा० ॥ म्हणे राधा ऐक श्रीहरी ॥ आज्ञान मी मजला तारी ॥ दे मति मला गिरिधारी ॥ तुज चरणीं चित्त जडाया ॥ धां० ॥ ११ ॥

गाणें ९१ वें. धावा द्रौपदीचा.

चाल (ये धांवत सत्वर रुक्मिणीच्या वरा)

कौरव पांडव सभा करुन बैसले ॥ पण करून त्यानी कपट दूत खेळले ॥ शकुनी फासे आणुनी धर्मासी जिंकिलें ॥ त्यास्थळीं सभे मधें ओढून मला आणिलें ॥ तो दुःशासन धरून ओढी मला ॥ करुनग्न पाहे दुष्टाच्या सभेला ॥ दोन्हीं ओंठ वाळले कंठ माझा सूकला ॥ झाले लज्जित न्हदयीं चित्ता अग्नीं झोंबला ॥ तुझ्या बहिणीची लज्जा राखे हरी ॥ अ० क० ॥ आतां संकट पडलें ये धांवत लवकरी ॥ द्रौपदी म्हणे श्रीकृष्णा पाव सत्वरी ॥ आतां० ॥ १ ॥ एक दुर्धर बालक कडे माजि पडियेले ॥ तुझें नांव घेतां त्वां गाउन्न काढिलें ॥ दोन पक्षी एका वृक्षावर बैसले ॥ तेथें गेला पारधी त्यानें बाण लाविले ॥ त्यावेळीं उभयतां तुला हांका मारिलें ॥ आता उडून कैसें जावें असें बोलिले ॥ पक्षांचा धावा ऐकुन सर्पागती ॥ दंशीला पारधी जाउन सत्वरगती ॥ आशि दयाकरी रुकमिणी पती मजवरी ॥ आतां० ॥ २ ॥ बहिणीच्या सेवें आला सर्वे धाउनीं ॥ द्या धडया पितांबर हातामधें धेउनी ॥

नेसवलें द्रौपदिला सभे मधें जाउनी ॥ झाले लज्जित हृदयीं चित्ता अग्नी झोंबुनीं ॥ तुझ्या बहिणीची लज्जा राखे श्रीहरी ॥ आतां० ॥ ३ ॥ खिचडि गुलाली खंबायत सुरघटी ॥ कर्णकोर वेष्टी बहिणीच्याही कटी ॥ नेसविली द्रौपदी शामवर्ण गोमटी ॥ तिने हरी देखिले नयनीं कंचुकी तटतंटी ॥ भीष्म द्रोण हंसती-सकळ सज्जन ॥ बंधुला संकेत दावी दुर्योधन ॥ आले पांडव पाळूक खालि पाहती दुर्जन ॥ दोहिं हाती निऱ्या सोडी दुःशासन ॥ वस्त्राचे ढिगारे पडले पृथ्वी वरी ॥ आतां० ॥ ४ ॥ अंजिरी खसखसी केतकिपत्र तसे ॥ किनखाप तापता वर सोनेरी ठसे ॥ त्रिभुवनि-ची वस्त्रें आणीतसे ॥ द्रौपदि वरुन दुर्जबा ओवाळुन देतसे ॥ आमलानंद म्हणे हाची पंढरपुरी ॥ आतां० ॥ ५ ॥

गाणें ९२ वें, धावा द्रौपदीचा.

हे पंचसिंह आकळिले, व्यसनि खोंचिले, कपटे दुष्टानीं ॥ मम करुणा स्तव हा पडो श्रीहरी श्रवणीं ॥ निजला असेल भामेचे श्रीलक्ष्मिचे सुखशयनीं ॥ कीं ताट भोजना वाढिलें रुक्मिणीं ॥ लवकरी धाव, त्वरित पाव आतां

कैंसारी ॥ अ० क० ॥ तुझि बहिण द्रौपदी गांजिली दरबारी श्रीहरी ॥ नरकेसरी, येइ लवकरी, ममकैवारी ॥ तु० ॥ १ ॥ कर्णादिक शकुनी सभे मधे आले ॥ ह्मणे बैसे अंकी दुर्योधन ऐसे बोले ॥ दुःशासन धरुन वेणिसी मला आसडीलें ॥ हें दुःख हरी तुज सांगू मन धाडीलें ॥ श्रीरंगा पुरुषोत्तमा पाव मुरारी ॥ तुझि० ॥ २ ॥ द्रौपदिचे शब्दु मराळ उडुनियां गेले ॥ हरि श्रवण सरोवरि जाउनया बैसले ॥ जसा भ्रमर करी गुंजारव तसे जाणवले ॥ कनवाळु प्रभु त्याचें मन धाबरलें ॥ मनपवन गरुड जाण वेगें टाकलासे दुरी ॥ तुझि० ॥ ३ ॥ कैवारी धाउन आले मनीं हर्षली ॥ श्रीब्रह्मानंदे सुखसागरीं बुडाली ॥ दुःशासन शकुनी मिळून हृदयीं खुण कळली ॥ दुष्टांचा संहार करिल पांचाळी ॥ नेसुनिया पिवळें वस्त्र झाकिली सारी ॥ तुझि० ॥ ४ ॥

गाणें ९३ वें, भगद्ध्यान.

(प्रथम २ चरण आरती भुवन सुंदरीची ही चाल आणिपुढें कटावाची)

हरि हा आनंदाचा कंद ॥ आनंदाचा कंद उभा पुढें

भक्त सखा गोविंद भगवानानंदाचा कंद ॥ हरि ० ॥ सजलनीरदश्यामतनू नवरत्नखचित सौवर्णमुगुट शिरपेंच तुरा वरि कलगी विराजित कुटिलालक निटिलासि कस्तुरीतिलक केशरीगंध ॥ हरि ० ॥ १ ॥ श्रवणीं मनोहर मकरकुंडलें फुल्लगल्ल कर्णांतदीर्घ सुप्रसन्न लोचन इंदुवदन तिलपुष्पनासिका कुंदरदनहनु अधर- बिंबगत हास्य मंदमंद ॥ हरि० ॥ २ ॥ कंबुकंठ कौस्तुभाभरण शुभ पटिरपंक नवद्रवें रूषित पीवरांस केयूर विभूषित कनक कटकसह रत्न तोडर प्रभानुभाषित शंख सुदर्शन गदा सरोरुह लसच्चतुर्भुज ललितांगुलिधृतरत्नमुद्रिकावृंद ॥ हरि० ॥ ३ ॥ विशाळ वक्षस्थळीं रमाकुचकुंभकुंकुमालेपलिप्त श्रीवत्सलांछित सुवर्णयज्ञोपवीत मध्यवलित्रय बंधुर निम्ननाभि तनु रोमराजि लुठ दुत्तरीयपट पारिजातनवकुसुमतुलसिकामिश्रहार पादाग्रचुंबि नभ भरलि जयाचा मधुर सुटला गंध ॥ हरि० ॥ ४ ॥ कटीतटीं जरिकांठि पीत कौशेयवास वटवास सुवासित विचित्र शृंखल अगणित मणि झणिझणित मंजुळ क्वणित किंकिणी विपुळ तरोरु द्वंद्व विराजित जानुजंघ सुकुमार सरलतर कनक वलययुत रत्नतोडरें मंजुमंजु सिंजान हरिमंजीर परिष्कृत सहजरक्त मृदुवक्र अंकुश

ध्वजांबुजांकित वृत्तवृत्त उत्तुंगरक्त नखचक्र बाल सत्पुण्य चंद्रिका ध्वंस्त महद्धृद्धृदयांधतमस मंदाकिनी माहेर चरणयुग धृत रणरणि क जयाच्या क्षणिक ध्यानें तुटती झटिति सर्व भवबंध ॥ हरि ० ॥ ५ ॥ कोटिकोटि कंदर्परूप लावण्य दर्पहर ध्यान मनोहर अनंतजन्म मनोमल पटली निर्मूलनकर भक्तिगम्य तापत्रयभंजन असिंचनक ध्यानि पहातां वाटे जणु नयनांत भरावे हुंगावे दृढ आलिंगावे की चुंबावें विसरतसे संसार सर्वही संतत याचा पंतविठ्ठला सहज लागला छंद ॥ हरि दा ० ॥ ६ ॥

गाणीं शंकराची.



गाणे १ लें, शंकर पार्वती विनोद.

नेटकि पद्मिण वनितां सुंदरी केवळ बिंबाधरी ॥ नसांग तां मजप्रति वाटतें तूंच ठेविली शिरी ॥ कोमलआंग लावण्य सांवळी मूर्ति बहुत गोजिरी ॥ नेत्र मृगांसारखे

चमकती विद्युल्लतेचे परी ॥ निढळ धनुष्याकृति भोंव-
या शोभा देति बरी ॥ ळांहो चोरितां मला दक्षक्रतुदलना
सांगातरी ॥ रत्नमाणिकें जडित सुशोभित सुरत कंकणें
हातीं ॥ तेज सकळां कारिउणे आणिती नक्षत्राप्रती
॥ अ० क० ॥ भाललोचना नागभूषणा नीलग्रिवापशुप-
ती ॥ भ्रुकुटि जटेंत कोठुंन दिसतीललनोचि आकृति ॥ १ ॥
शिरि अपूर्व वाहतसें तें गंगाजळ निर्मळ सुंदरें ॥ जळा-
वरितें कमळ नव्हें मुख पाहतां न्याहाकुनयाबरें ॥ कम
लांतिल मकरंदसेवती मिलिंद प्राणेश्वरे ॥ म्हणुन सांवळे
तेज तुलादिसेते हिमनगकुमरे ॥ नेत्रनव्हे ते मीन तळपती
जिवनां मध्यें एक सरें ॥ नव्हें भोंवया सलिल लहरा
उदकांच्या प्रियकरे ॥ रत्नमणिकें नव्हेत जळावरते
तरंग उठती ॥ वृष्टिकरितां मेघबिंदु नक्षत्र वत् झळकती
॥ भाललो० ॥ २ ॥ विश्वव्यापका विश्वपते. विश्वेशा
विश्वंभरा-नं ॥ विश्वोद्धारका परात्परेशा जगदिश्वरा ॥
त्रिपुरांतका त्रिविधतापहरणा आंहो त्र्यंबकेश्वरा ॥
भवभंजना भयहरणा भूतादिपते अपर्णावरा ॥ नाग
नाथा नागेंद्रभूषणा वृषभध्वजा शंकरा ॥ मदन-
दहना हेपंचवक्रा भालिंचंद्र शेखरा ॥ कुंडलवत क-
मंडलु दोन्हीं कुच कलश भासती ॥ अति बारिक चिर
कंचुकी हिरमुजी प्रभा दाविती ॥ भाललो० ॥ ३ ॥

णवरूपिणी परशांकुशकरमंडित सुखवर्धनें ॥ चित्‌विलासिनि हे जगदंब महिषासुरमर्दने ॥ दाक्षायणि अहो दुर्गे हिमनगनंदिने, शुंभनिशुंभादिक दैत्यदानव कुळ निकंदनें ॥ कुचनव्हे ते गंगातीरि चक्रवाक शुभवर्धनें ॥ नव्हें चीर कंचुकी जळीशेवाळ मुनी शोधणें ॥ वदेगिार जाशुंभवा बोल हें आप्रमाण वाटलें ॥ हे नाजिबाळ ह्मणे उभयतांपदि वसोचित्तवृत्ती ॥ भालले० ॥ ४ ॥

गाणें २ रें, काशी.

विश्वेश्वर जगाचापीता ॥ अन्नपुर्णा सर्वांची माता ॥ धुंडिराज सखाभाऊ ॥ अ० क० ॥ चलमना काशिला जाऊं ॥ विश्वेश्वर राजापाहूं ॥ च० ॥ १ ॥ मन करणीका सरखी मावशी ॥ काळभैरव काका आह्मांसी ॥ दंडपाणि म मापाहूं ॥ च० ॥ २ ॥ दुर्गाघाटि राज-मंदीर ॥ तेहतिस कोठी देवथोर ॥ दुर्गा देविचें दर्शन घेऊं ॥ चल० ॥ ३ ॥ बिंदुमाधव मूर्त सांवळी ॥ सुंदर मनोर शोभती जवळी ॥ मंगळागौरिचे दर्शन घेऊं ॥ च० ॥ ४ ॥ मंगळागौर गभस्तेश्वर ॥ आधिकेश्वर त्यासमोर ॥ ज्ञान वापिचें दर्शन घेऊं ॥ च० ॥ ५ ॥ सप्तपुन्यः आहेत ज्याठायी ॥ बार ज्योतिलिंग-

पाही ॥ खड्ग विनायकाचें दर्शन घेऊं ॥ च० ॥ ६ ॥ रेवढी यात्रा होइना ज्याशीं ॥ त्यानीं कराविं पंचकोशी ॥ छपन्न विनायकाचे दर्शन घेउं ॥ च० ॥ ७ ॥ आशि वरची गंगा भरली ॥ वाटपंच क्रोशिची धरली ॥ पहिला मुकाम, कर्दमेश्वरी राहूं ॥ च० ॥ ८ ॥ दुसरा मुकाम भीम चंडेशी ॥ वृद्धानारि होती अस्पर्शी ॥ नाम स्मरणें मार्गी जाऊं ॥ च० ॥ ९ ॥ तिसरा मुकाम रामेश्वर ॥ पुढें आहे तीर्थ सुंदर ॥ गंगा रामेश्वराला वाहूं ॥ च० ॥ १० ॥ चौथा मुकाम कपिला धारी ॥ नर दमुचि येतिल भारी ॥ गणपतिचें दर्शन घेऊं ॥ च० ॥ ११ ॥ पुढें आहे वरुण संगम ॥ तेथुन जावें जव पेरित ॥ साक्षि विनायक साक्षि ठेऊं ॥ च० ॥ १२ ॥

गाणें २ रें शंकराचे.

चाल (सखयानों तो हरि आमुचा०)

त्रिलोकि तुमचें गमन, भक्ताचि कामें करितां ॥ साक्षात सत्य तूं स्वामी दत्तात्रय श्रीआवधूता ॥ सर्वांगी भस्म-चर्चून भूजंग वेष्टिला वर्ता ॥ आणि कंठावर मृगचर्म बगलेंत दिसते झोळी ॥ प्रीय फार कृपेचा धर्म दर्शन

हें मजला व्हावें ॥ अ० क० ॥ देखिले रुप तेजाळ, शिव योगिराज दयाळ ॥ १ ॥ ऐकुनि नाद शंखाचा, पातकें जळतीं सारी ॥ हस्तकि त्रिशुळ हा साचा वाजे श्रृंगी डमरु भारी ॥ मस्तकि जटेचा भार, रुद्राक्ष धारणा केली ॥ रुद्राक्ष मुगुट हासाव्वा, कर्णात दिव्य कुंडल ॥ पादुका चरणि आधार दर्शन हें मजला झालें ॥ देखि० ॥ २ ॥ लाभलें तुझे दर्शन, अभयाचि धरितो इच्छा ॥ ह्मणविसि पतित पावन, यास्तव ध्यास लागला ॥ तुझापायीं ठेउंदे माथा, नको अंत पाहूं भगवंता ॥ तूं गुरु पिता तूं माता ह्मणवितो तुझा मी बाळ ॥ देखिलें० ॥ ३ ॥ अपराधि पुत्र जरी असतां, तरीक्षमा करिती मरता ॥ साक्षांब सत्य तूं स्वामी ॥ शंकराच्यार्य सिद्धांता ॥ आतां मजला तारि ऐसा, त्रिभुवनांत दुसरा नाहीं ॥ देखिलें० ॥ ४ ॥

गाणें ४ थें, शंकराचें.

पार्वति ह्मणे शंकराकीं, तुजविण नगमें एक घडी ॥ कोण्या मोहनिने लाविली गोडी ॥ चंद्र राहिला भाळी त्यासी पुसे ॥ शैल्य बाळि, आवडी ॥ सांग मशी गुह्य गोष्ट येवढी ॥ चंद्र ह्मणे कळ कळाट वाहे

स्त्रीशिरीं ॥ हें गुज कळलें नीरांतरी ॥ अ० कृ० ॥ सहस्त्र वर्षे रुसून गेले शंकर गौरी वरी ॥ राहिले ब्रह्म गिरीं पाटरी ॥ १ ॥ पार्वति ह्मणे गणपति माझी आज्ञा मान्य करी ॥ राहावें ब्रह्म गिरी पाठरीं ॥ सदाशिवाचे जटें मध्यें राहते एक नारी ॥ ती तूं काढावि बाहेरी ॥ आवश्य ह्मणोनि गणपति मस्तक ठेवि चरणावरी ॥ पार्वति हस्तक ठेवि शिरी ॥ सहस्त्र० ॥ २ ॥ पार्वति ह्मणे गणपातियाचे कांय मला संकट ॥ केला मायेचा गणेश भट ॥ गौतम ऋषिच्या गृहासि जाउनी आश्रम केला नीकट ॥ पुढें काय झाली खटपट ॥ पार्वतीचि सखी होति ती गायत्री झाली ॥ गेली गौतमऋषिच्या साळी वरी ॥ सहस्त्र० ॥ ३ ॥ गौतम ऋषि प्रातः काळीं नित्य पेरितो साळी ॥ रोज पिकेंवी भोजन वेळीं अन्न दान ऋषि भोजन अन्न छत्र तो पाळी ॥ तिथें गाय आलि वरुढाळी ॥ थेक ह्मणतां दिधला प्राण तिनें वरच्या वरी ॥ गौतम ऋषि पडले विचारी ॥ सहस्त्र० ॥ ४ ॥ तेथें होतां गणेश भटजी त्यानें डांगोरा केला ॥ गौतमें गाइचा वध केला ॥ ऋषि बोलति ब्रह्म विचारें प्रायःश्चित घ्यायाला ॥ मग गणेश भट काय बोलला ॥ सांभसदाशिवाची गंगा आणा

गोदावरी ॥ स्नान केल्या पातक दुरी ॥सहस्र० ॥५॥ दोन सहस्र वर्षे तप केलें गौतम ऋषि ॥ सांभ प्रसन्न झाले त्याशी ॥ स्नानांसी दिधली गोदावरी जटा आपटली कशी ॥ देव गेले पूर्व दिशीं ॥ ब्रह्म गिरीवर गुप्त झाली ॥ उमटलि गंगा द्वारी ॥ निघाली कुशा वर्ता वरी ॥ सहस्र० ॥ ६ ॥ कार्य सिद्धि झाल्या वरी उठुन आले गणपती ॥ मनी मध्यें हर्षली पार्वती ॥ गोविंदराव कवन करितो राहतो शहर जुन्नरी ॥ सवाई झेंडा काशिंमगिरी ॥ सहस्र० ॥ ७ ॥

गाणें ५ वें, शंकराचें.

चाल (काय दयाळा संशय गमला०)

व्याघ्र कडासन गज चर्मांबर, वासुकी कंठी भूषणरे ॥ जटा जुटिं तुन गंगा वाहे, भाळी चंद्र अर्धरे ॥ अ०क० ॥ या भवातुन पार करी दयानिधे, गिरिजा रमणारे ॥ अ० क० ॥ १ ॥ त्रिशुळ डमरु आयुध शोभती अंकी गिरजा गणपतिरे ॥ जटा पिंगळा भस्म दारुण योगि दिसे बहू मोठारे ॥ याभ० ॥ २ ॥ लंका नाथें साम गायनें प्रसन्न केलें तुजलारे ॥ आत्म

लिंग हें काढुन देशी ऐसा शंभुभोळारे ॥ याभ० ॥ ३ ॥ शिव शिव ह्मणतां त्रिवार वाचें 'हरति दोष नराचेरे ॥ ऐसे नाम पतित पावन येवो. गुरु कृपें वाचेरे ॥ याभ० ॥ ४ ॥

गाणें ६ वें, भिल्लीण.

चाल (हेरें काय कृष्णा)

कोपुनि मजवरि झालासे जोगी ॥ गेला वनी मज करुनि वियोगीं ॥ अ० क०॥ पती साठीं साजणी भिल्लिण झालें ॥ स्तवुनपरोपरी मंजूळ बोले॥ १ ॥ तन-मन सर्वाहि व्यर्थे तयाविंण ॥ विरहांत प्रेमें मनमाझें भ्रमलें ॥ पति० ॥ २ ॥ कर जोडुनियां विनवीते ऋषिला ॥ आतां मज भेटवा त्रिशुळ पाणी ॥ पति० ॥ ३ ॥ सखे कोठें शंकर आजपाहुं सांगा ॥ मदनारि वीणे श्रमहोति अंगा ॥ पति० ॥ ४ ॥ नको छळु मजला किती पाहसी अंत ॥ मीपणं माझें सर्वहि गेलें ॥ पति० ॥ ५ ॥ शंकर बोले गिरजा नारी ॥ चल जाऊं आतां कैलासावरी ॥ पति० ॥ ६ ॥

गाणें ७ वें, भिल्लिण.

कुज्य देशीं श्याम बाळा ॥ मंद चाले हदनीळा ॥ चंद्र

चूडा शब्द सुत्रें मोहिलें त्या मंगला ॥ अ० क० ॥
जाई मुजशी बोलशी कां ॥ येकटी मी हे वनीं हो ॥
स्वामी माझा उग्र आहे जाण त्याची कामिन ॥ जा० ॥
१ ॥ तापसीसांभास सिगा नावरेचि काम वेगा ॥
आवरितां आवरेना क्षण जातो वायुगा ॥ जा० ॥ २ ॥
इच्छिसी तूं आंगनेला ॥ कां स्त्रियेचा त्यागकेला ॥
जाई कांता सांगते मीं हिंडसी तूं एकला ॥ जा० ॥
३ ॥ सुंदरी हें नांव पूसे ॥ सांगताना येरी हांसे ॥
चांड नसता पूससीकां विश्वमय हें होतसे ॥ जा० ॥ ४ ॥
आंगनेचा वेग भारी ॥ मोहिले त्यामनूरूधारी ॥
कामभावें खेवंदेतां शक्ति देखे सुंदरी ॥ जा० ॥ ५ ॥
सुंदरी हें बोल बोले ॥ शंकराचें चित्त डोले ॥ आंवरीतां
सावरेना ज्ञान वाक्यां दाविले ॥ जा० ॥ ६ ॥ मन्मथे-
सि वैर केलें ॥ वरतु याचे काय नेलें ॥ भासतेचि
आज मजशी मोहपाशी गोविलें ॥ जा० ॥ ७ ॥
शंभु आंबे सौख्य झालें ॥ त्यानें तीला आलिंगीलें ॥
शंभु राधा पूर्ण भावें, दंपतिसी वंदिलें ॥ जा० ॥ ८ ॥

गाणें ८ वें, भिल्लिण.

चाल (पावे त्वरितें चक्रपाणी, करुणांर्णवा मोक्षदानी)

पाहा कैलासि शिव जाया ॥ बैसले दूत खेळाया ॥ तव पातले ब्रह्म तनया ॥ उभय वंदिति मुनि पायां ॥ नारद बोलले देवराया ॥ बोला पण डाव जिंकाया ॥ चा० ॥ हरांच्या पदिचे पांचजण ॥ नेमिलें उत्तर उभयानं ॥ कळ लाउनि नारदानं ॥ गेले स्वस्थाना ब्रह्मपुरीं ॥ त्रिगुण फासा घे शिवनारी ॥ अ० क० ॥ भिल्लिणि वेष नटे गौरी ॥ लाविलें वेड मदनारी ॥ १ ॥ उभय खेळति प्रतिज्ञेनं ॥ डाव मांडिला शंकरानं ॥ प्रथम टाकिलें तीनं कानं ॥ त्रिभुवन जिंकिलें गौरिनें ॥ चार मुक्तिचे चार काने ॥ रणपंच तत्व एक करणें ॥ चा० ॥ साहा दर्शन सागर होती ॥ सप्तहि सागर झाले आहे ती ॥ आष्टगण भैरव जिंकीले स्तुति ॥ जिंकीलें नव विध नव भक्ति ॥ जिंकिले नव रंग नवसारी ॥ लाविलें० ॥ २ ॥ साहा युग दशविध अवतार ॥ रुद्र बारा अलंकार ॥ तेरा राण्यांचा विस्तार ॥ चौदा भुवन विचासार ॥ तिथि पंधराची आकार ॥ सत्ताविस जिंकिलें वरघ्यावर ॥ चा० ॥ देविनें जिंकिली सोळावी कळा ॥ सत्रावि त्याचि जिवन कळा ॥ आठरा त्याच्या पद्धतीगळा ॥ नागविला भोळा पुरुषार्थी ॥ पिंड ब्रह्मांड रूप धरी ॥ लावि० ॥ ३ ॥ गंगे सहित सांभ हारिला ॥ म्हणुन देव अनु-

तापें गेला ॥ कुठ स्वामिनी त्रास केला ॥ पार्वति ह्मणें
शिव अंतरला ॥ अनंता तपें प्राप्त झाला ॥ कसा नारदें
विघड केला ॥ चा० ॥ पतिच्या वियोगें दुःखित
गिरीजा ॥ कधि भेटेल त्र्यंबक राजा ॥ नेत्रीं घालु-
निया पैजा ॥ आणिन ह्मणें सहधर्मे सहजची हा ॥
उमा भिल्लिणीचा वेषधरी ॥ ला० ॥ ४ ॥ दाक्षाय-
णिनें पण केला ॥ क्षणांत मोहिन ह्मणें हराला ॥ वसन
नेसलि ही धटी ॥ घातिला पचांग शत कोटी ॥ चिरि
कुंकुवाची ललाटी ॥ नेत्र विशाल शोभे भृकुटी ॥
चा० ॥ ठायीं ठायीं गोंदणें ल्याली ॥ तेणें सर्वांगी
शोभा आली ॥ भांगीं शेंदुर चर्चिली ॥ मृगनयना
निघालि शोधाया ॥ भेटले सांभ महिधरी ॥ ला० ॥ ५ ॥
चर्णीं नेपुरें रुणझुणती ॥ वनीं चालिली हंसगती ॥
कोकिळशब्दें बहु बोले ॥ ऐकुनु शंकर मनि डोले ॥ चा० ॥
तनु जिंकिली चंद्रपरी ॥ नभ मंडळिची वीज बरी ॥
मोहित झाले त्रिपुरारी ॥ ला० ॥ ६ ॥ कारि धरुनि ह्मणे
तीला ॥ कोणाचि तूं सांगमला ॥ ह्मणे मी भिल्लाची
कांता ॥ कां मज पुसतां दिना नाथा ॥ तापासि तुह्मीं
तप तपतां ॥ अनुष्ठान वृथा. कां करितां ॥ चा० ॥
सोडुन सजाणि तव जाया ॥ परनारि भ्रमवाया ॥
शक्तिनें पुरें बहु मारी ॥ लावि० ॥ ७ ॥ करी धरुनि

ह्मणें तिला ॥ हिमालयावर जाऊं चला ॥ कुठे भिल्ल तो सांग मला ॥ क्षणांत मोहिन ह्मणे त्याला ॥ चा० ॥ तमोगुणि भिल्ल अनिवार ॥ ह्मणें भिल्लिणी निर्धार ॥ अंकी-घेउन प्रभु बसला ॥ पार्वति पाहुन मनीं हंसला ॥ शक्तिनें आणिला त्रिपुरारी ॥ लाविलें० ॥ ८ ॥

गाणें ९ वें, भिल्लिण.

कोणें एके दिवशीं देव आले खुषिशीं ॥ शारंगपाट खेळत बसले होते गिरिजेशीं ॥ तेव्हां ती गिरिजा काय बोलली शंभुसी ॥ तुह्मी नका जाऊं रडी मी खेळन तुह्मासीं ॥ तो नंदी ढवळा माळा आणिल्या शंभुनीं भिक्षेची आणविली झोळी केली मोकळी नेली गिरजेनं ॥ भांग घोटायाचा गोटा आणि फट्टा सोटा नेला गिरिजेनं ॥ चा० ॥ मुनिहो आले शंभूपाशीं ॥ पार्वती श्रमली गेली सदनासी ॥ मग त्या नारद मुनिनें भरले देवाचे कान ॥ तुह्मीं कोणे एके दिवशीं राहा गिरीकंप्राटी जाऊंन ॥ अ०क० ॥ शंभुसाठीं गिरिजा झाली भिल्लीण ॥ हातांत तीर कमान धुंडिते रान ॥ शं० ॥ १ ॥ मोठ्या प्रातः काळीं उठुनि, नारदमुनीं ॥ लगबगलगबग बोले तिसी जाउनं ॥ धन्य माते तूं गिरिजा

अघटित तुझी गे करणी ॥ शंभुदेव बसले गिरिकपाटीं जाउनी ॥ आतां तुम्हाला कोण पुसेल देवा बांचुनी ॥ मोठया खेळ्या नारद मुनी ॥ पार्वती ह्मणे आतां चिंता प्राप्त झाली मशी ॥ घेउन भिल्लिणीचें सोंग मोहिन शंकराशी ॥ पळुनी गेला हो ठायाशीं ॥ नेसली चुनडी पिवळी ॥ आंगी काचोळी ल्याली मोत्याची ॥ कपाळीं बिंदी हिऱ्यांची ॥ भिल्लिण बनली कुंकुम कोर चंद्राची ॥ जडिताचे बांजुबंद लटकती गेंद चुडे हातीं भरले ॥ चा० ॥ नवसरहार सरज्याची नथणीं ॥ चितंगपींचपेटी झळकती हिरकणी ॥ जडिताचा कंबर पट्टा दिला चढवोनी ॥ तीरकटार कमान कंबरेसी खोवून ॥ शंभु० ॥ २ ॥ चंदन गाळुन ल्याली उटी ॥ रंगलाल विडा बदनांत रंगला ओठी ॥ गिरिजा निघाली शंभुचे भेटी॥ तीर कटार कमान बाण चालली झळकत॥ आहे रान कोंकण् स्थान डोंगर मोठमोठे पर्वत ॥ गिरिजा-चालली त्वरित ॥ मध्ये संकट पडलें शंभु देखिले तिनं॥ इथं कां बसला बोले हांसून ॥ लावण्य रूपाकृति देखिल्या शक्ति भुलोनी गेला ॥ कोणाची कोण आहेस आतां जुलदिनें सांग तूं मजला ॥ चा० ॥ मी आहे भिल्लिण भिल्ल गया उस घडी ॥ शंकरजी कहे जरा रहो तुम खडी ॥ काय तुमचें आमचें वचन जोगडया

है जंगल की हैवान ॥ शंभु० ॥ ३ ॥ असें बोलत बोलत गेलें गिरि शिखराला ॥ चालवी करचार गडे पुण्यघडेल तुजला ॥ मगबोले मारवती ऐक सांगतें तुजला ॥ बोलेधीट शेवट नाहीं इकीचा केला ॥ कोणमाय कोण पिता कोण भ्रतार तुजला ॥ ज्यानें मारिला ज्यालंदर चित्त केलें स्थिर रणांमध्यें वधिला ॥ इतकावृत्तांत ऐकुन क्रोधायमान झाला ॥ चा० ॥ जटा आपटुनी तुंबा तो फोडिला ॥ शंभुचा गिरिवरीच्या ठावउठला ॥ मग त्या जटेंतुन गंगा आली धांवून ॥ नाशिक त्र्यंबक तिचेठिकाण ॥ शंभु० ॥ ४ ॥ नंदी येउन म्हणें तुह्माविण कशी भूल पडली ॥ तूज वांचुन काया माझी पाहा सुकुन गेली ॥ तुज वांचुन परदेशी कोणा पाशीं राहूं एकली ॥ मग आले नारद मुनी गिरजेला मोहनी घातली ॥ चा० ॥ शंकर पार्वती गेली हो सुख शयनां ॥ नागिनाथ स्वामी करिती प्रार्थना ॥ हे सरळ चरित्र ध्या तुह्मी ऐकून पार्वतिनें शंकर आणिला समजावुन ॥ शंभू० ॥ ५ ॥